

◀ राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे
◀ नाशिक आज


उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी




◀ काळाराम मंदिरात नेत्यांची मांदियाळी
◀ नाशिक आज


■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १९३ ■ नाशिक, सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे

### नाशिकचा पारा ४० अंशावर

**नाशिक : प्रतिनिधी** चैत्र महिन्यामध्ये पुन्हा एकदा नाशिक तापलं असून नाशिकचे तापमान चाळीस अंश डिग्री सेल्सिअस पर्यंत गेले आहे. यामुळे या हंगामातला सगळ्यात जास्त गरम असलेला रविवार नाशिक वासियांना सहन करावा लागला आहे. चैत्र महिन्यामध्ये सुरुवातीला तापमान वाढले होते त्यानंतर मागच्या आठवड्यात चार दिवस बेमोसमी पावसाने हजेरी लावली होती . त्यानंतर तापमानामध्ये काहीसा बदल झालेला होता पण आता पुन्हा एकदा नाशिक शहराचे तापमान हे ४० अंश डिग्री सेल्सिअस पार केले आहे रविवारी रामनवमीच्या दिवशी नाशिकचे तापमान हे ४० अंश डिग्री सेल्सिअस वरती पोहोचले होते तर मालेगावचे तापमान हे ४२अंश डिग्री सेल्सियस पर्यंत पोहोचले होते. त्यामुळे या हंगामातील सगळ्यात गरम रविवार हा ६एप्रिल रोजी नोंदविला गेला आहे.

### शहांचा ३ दिवसीय जम्मू-काश्मीर दौरा

**श्रीनगर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जम्मू आणि काश्मीरच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आले आहेत. या भेटीदरम्यान, ते नियंत्रण रेषेवरील चौक्यांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी करतील. सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतील आणि विकासकामांबाबत बैठका घेतील.

### पुणे शहरात ड्रोन उडवण्यास बंदी

**पुणे :** दहशतवादी,राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट कंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राप्ट, पॅराग्लायडरचा वापर करुन त्यांचे हल्यामध्ये आणि त्याद्वारे व्हीव्हीआयपींना लक्ष्य करु शकतात. त्यामुळे पुणे पोलिसांनी ड्रोन उडविण्यास बंदी घातली आहे.

### राज्यात तापमानाचा पारा पुन्हा वाढला

**पुणे :** आठवडाभरापासून वातावरणात बदल झाल्याने तापमानात घसरण झाली होती. तर चाळीस अंशापर्यंत पोहोचलेले तापमान ३५ अंशापर्यंत खाली गेले होते. मात्र आता यात पुन्हा वाढ होण्यास सुरवात झाली असनू धुळ्यात तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक ४२.४ अंश सेल्सिअस इतक्या उचांकी तापमानाची नोंद आज धुळ्यात करण्यात आली आहे. त्यानुसार जळगावमध्ये देखील तापमान ४० अंशापर्यंत पोहचले आहे.

### देवस्थांनाकडून पालखी मार्गाची पाहणी

**पुणे :** महाराष्ट्राचा वैचारिक सोहळा म्हणून वारकऱ्यांच्या वारीकडे पाहिले जाते. वर्षानुवर्षे ही भक्तीची पालखी आणि पताका मिरवून वारी सुरु आहे. आता पुणे जिल्ह्याला आषाढी वारीचे वेध लागले आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याला आता दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी उरला आहे. पालखी मार्गावरील सर्वांत मोठा मुक्काम असलेल्या सासवडमधील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाची देवस्थानकडून पाहणी करण्यात आली. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे २२ जून रोजी सासवडमध्ये आगमन होत असून २३ रोजी दुसरा मुक्काम झाल्यावर २४ जूनला सासवडमधून पंढरपूरच्या मार्गावरील जेजुरीकडे मुक्कामासाठी प्रस्थान सुरु होणार आहे.

## रामलल्लाचा सूर्य तिलक

**अयोध्या :** अयोध्येत रामनवमीला दुपारी ठीक १२ वाजता रामलल्लाचा सूर्य तिलक झाला. प्राणप्रतिष्ठेनंतर रामलल्लाचा हा दुसरा सूर्य तिलक आहे. अभिजित मुहूर्तावर दुपारी १२ वाजता रामलल्लाच्या सूर्य तिलकदरम्यान कपाळावर ४ मिनिटे किरणे पडली.

त्यानंतर मंदिरात आरती झाली. सूर्य तिलकच्या आधी रामलल्लाचे दरवाजे काही काळ बंद होते. सूर्य तिलक स्पष्टपणे दिसावा म्हणून गर्भगृहातील दिवे बंद करण्यात आले होते. सूर्य तिलकसाठी अष्टधातु पाईप्सपासून एक प्रणाली बनवण्यात आली. यामध्ये, ४ लेन्स आणि ४ आरशांमधून गर्भगृहातील रामलल्लाच्या मस्तकावर किरणे पाठवण्यात आली. आतापर्यंत ५ लाख भाविक अयोध्येत पोहोचले आहेत. रामजन्मभूमी संकुलात लांबच लांब रांगा आहेत. राम मंदिराबाहेर एक किलोमीटर लांब रांग आहे.



## कृषिमंत्री कोकाटेंकडून शेतकऱ्यांची माफी

**नाशिक : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानावरून वादग्रस्त विधानामुळे टीकेचे धनी झालेल्या राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी अखेर काल आपले वक्तव्य मागे घेत शेतकऱ्यांची माफी मागीतली. आपल्या वक्तव्यामुळे शेतकऱ्यांचे मन दुखावले गेले. त्याबद्दल माफी मागतो, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. काल रामनवमीनिमित्त काळाराम मंदिरात



दर्शनासाठी आलेल्या कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना आपले वक्तव्य चुकीचे होते. असे कबूल करत शेतकऱ्यांचा जो अवमान झाला त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. नाशिक मध्ये बेमोसमी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करताना एका शेतकऱ्याने नुकसान भरपाई अनुदान मिळेल का? असे विचारले असता कोकाटे यांनी शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचा शेतकरी गैरवापर करतात. असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यामुळे सर्वदूर त्यांच्यावर टीकेची झोड उठली होती. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कोकाटे यांच्या वक्तव्याबद्दल शनिवारी /-...४

/-...४

# वक्फ दुरुस्तीवर राष्ट्रपतींची स्वाक्षरी

## सरकार ठरविणार अंमलबजावणीची तारीख

**नवी दिल्ली :** राज्यसभा आणि लोकसभेत प्रदीर्घ चर्चेनंतर दोन्ही सभागृहाने मंजूर केलेल्या वक्फ दुरुस्ती विधेयकावर काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वाक्षरी केली. आता या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणार आहे. नवीन कायद्याबाबत राजपत्र अधिसूचना जारी केली. आता केंद्र सरकार नवीन कायद्याच्या अंमलबजावणीच्या तारखेबाबत स्वतंत्र अधिसूचना जारी करणार आहे. २ एप्रिल रोजी लोकसभेत आणि ३ एप्रिल रोजी राज्यसभेत १२ तासांच्या चर्चेनंतर हे विधेयक (आता कायदा) मंजूर करण्यात आले.काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद, एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी आणि आपचे आमदार अमानतुल्ला खान यांनी स्वतंत्र याचिकांमध्ये नव्या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. वक्फ दुरुस्ती कायदा मुस्लिम /-...४-




### सर्वोच्च न्यायालयात तिसरी याचिका

आपचे आमदार अमानतुल्ला खान यांनी या विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याआधी शुक्रवारी सुप्रीम कोर्टात दोन याचिका दाखल झाल्या होत्या. बिहारमधील किशनगंजमधील काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद आणि एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी ही याचिका दाखल केली आहे. गुरुवारी राज्यसभेत विधेयक मंजूर झाल्यानंतर काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनी काँग्रेस सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे सांगितले होते. तामिळनाडूच्या द्रमुकनेही याचिका दाखल करण्याबाबत बोलले होते.

### मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचा विरोध

ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने शनिवारी संध्याकाळी वक्फ विधेयकाच्या निषेधार्थ दोन पानी पत्र जारी केले. एआयएमआयएमने सांगितले की आम्ही सर्व धार्मिक, समुदाय-आधारित आणि सामाजिक संघटनांच्या सहकार्याने देशव्यापी आंदोलन करू. सुधारणा पूर्णपणे रद्द होईपर्यंत ही मोहीम सुरूच राहणार आहे.



## किमान तमीळमध्ये सही तरी करा

### मोदींचा स्टॅलिन यांना सल्ला : पंबन पुलाचे उद्घाटन

**रामेश्वरम्** तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन आणि केंद्र सरकारमध्ये नवीन शिक्षण धोरण आणि त्रिभाषेवरून वाद सुरू आहे. भाषेच्या वादाचा उल्लेख न करता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्रमुक नेत्यांना आणि मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांना सल्ला दिला. तमिळ भाषेत वैद्यकीय शिक्षण द्यावे. मला तामिळनाडूच्या अनेक नेत्यांकडून पत्रे येतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे कोणताही नेता तमिळमध्ये सही करत नाही. तमिळ भाषेचा अभिमान बाळगण्यासाठी, या लोकांनी स्थानिक भाषेत सही करावी, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे आशियातील पहिल्या उभ्या लिफ्ट स्पॅन रेल्वे पंबन पुलाचे उदघाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

२.०८ किमी लांबीचा हा पूल भारतातील तामिळनाडूमधील रामेश्वरम (पंबन बेट) ते मंडपम यांना जोडतो. पंतप्रधान मोदींनी स्वतः नोव्हेंबर २०१९ मध्ये याचा पायाभरणी केला. भविष्य लक्षात घेऊन, ते दुहेरी ट्रॅक आणि हाय-स्पीड ट्रेनसाठी डिझाइन केले आहे.रामेश्वरमला दक्षिण भारताशी जोडण्यासाठी १९१४ मध्ये पंबन पूल पहिल्यांदा बांधण्यात आला होता. हा पूल समुद्रावर बांधलेला भारतातील पहिला रेल्वे पूल होता. १११ वर्षांनंतर, /-...४



## अनंत अंबानींची १७० किमी पदयात्रा पूर्ण

**मुंबई :** रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी यांनी रविवारी १७० किमी लांबीचा पदयात्रा पूर्ण केली. अनंत अंबानी सकाळी लवकर श्री द्वारकाधीश मंदिरात पोहोचले. अनंत अंबानी यांनी भगवान द्वारकाधीशांचे आभार मानले. ते म्हणाले, 'हा माझा स्वतःचा आध्यात्मिक प्रवास आहे.' मी तो देवाच्या नावाने सुरू केला आणि त्यांच्या नावानेच संपवीन. अनंत अंबानी यांचा वाढदिवस १० एप्रिल रोजी आहे. अनंत त्यांचा ३० वा वाढदिवस द्वारकेतच साजरा करणार आहे. अनंत यांनी २८ मार्च रोजी जामनगरमधील मोती खावडी येथून आपला प्रवास सुरू केला. शेवटच्या दिवशी पत्नी राधिका मर्चंट आणि आई नीता अंबानी देखील पदयात्रेत सहभागी झाल्या. अनंत अंबानी यांना पदयात्रेदरम्यान ज्यांनी त्याला साथ दिली त्यांचे आभार मानले. रहदारी आणि सुरक्षेमुळे लोकांना होणाऱ्या त्रासापासून वाचवण्यासाठी अनंत बहुतेकदा रात्री प्रवास करत.

### आईसाठी खूप अभिमानाचा क्षण : नीता अंबानी

नीता अंबानी यांनी त्यांच्या मुलाच्या या आध्यात्मिक प्रवासाबद्दल सांगितले की, 'ही एका आईसाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. माझा मुलगा अनंत द्वारकाधीशांच्या या पवित्र ठिकाणी त्यांची पदयात्रा यशस्वीरित्या पूर्ण करण्यात यशस्वी झाला. अनेक आरोग्य समस्या असूनही अनंतने आपला प्रवास पूर्ण केला. त्याला कुशिंग सिंड्रोम, लठ्ठपणा, दमा आणि श्वास घेण्यास त्रास अशा समस्या आहेत. यात्रेदरम्यान त्याने हनुमान चालीसा, सुंदरकांड आणि देवी स्तोत्राचे पठण केले.

## महिला आयएएस अधिकाऱ्याशी महाजनांचे संबंध

### एकनाथ खडसेंचा सनसनाटी आरोप

**जळगाव** : एका पत्रकाराच्या व्हायरल क्लिपचा धागा पकडत एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांचे एका महिला आयएएस अधिकाऱ्यासोबत संबंध असल्याचा सनसनाटी आरोप केला. त्यांच्या या आरोपामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

एकनाथ खडसे म्हणाले की, गिरीश महाजन यांचे एका महिला आयएएस अधिकाऱ्यासोबत संबंध आहेत. तिचे नाव मला माहित आहे. पण ते सांगणे उचित होणार नाही. अमित शहा यांच्याकडे ज्यावेळेस मंत्रिमंडळाच्या विस्तारासाठी चर्चा झाली. त्यावेळेस अमित शहा यांनी गिरीश महाजन यांना बोलावून घेतले होते. त्यांना सांगितलं की, महिला आयएएस अधिकाऱ्यांशी संबंध आहे. यावेळी महाजनांनी सांगितले की, नाही, माझे अनेकांशी कामानिमित्त संबंध आहेत. कामानिमित्त मी बोलतो. अमित शाह यांनी त्यांना सांगितलं की, कॉल डिटेल रिपोर्ट आमच्याकडे आहे. रात्री एक वाजेनंतर दिवसभरात शंभर शंभर कॉल झालेले आहेत. रोज बोलण्याचं काय कारण आहे? असे प्रश्न शहा यांनी उपस्थित केले, असल्याचे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.



### लोक त्यांना जोड्याने मारतील : महाजन

**वाशिम :** एकनाथ खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर केलेल्या आरोपाला गिरीश महाजन यांनीसुद्धा जोरदार उत्तर दिलं असून. मी जर त्यांच्याबद्दल तोंड उघडले तर लोक त्यांना बाहेर आल्यावर जोड्याने मारतील. एक नंबरचे महाचोर आहेत. कमरेच्या खाली वार केल्याशिवाय त्यांना दुसरं काही जमत नाही असा पलटवार गिरीश महाजन यांनी केला. आपल्यावर झालेल्या आरोपांवर एक तरी पुरावा दाखवावा, सक्रिय राजकारणातून बाहेर पडेन असे आव्हानही त्यांनी दिले. मी जर एका गोष्टीचा खुलासा केला तर खडसे तोंड काळे करतील. घरातलीच गोष्ट आहे पण मी बोलणार नाही, मला बोलायला लावू नका अशा स्पष्ट शब्दात महाजन यांनी खडसेंना इशारा दिला. 'कमरेच्या खाली वार केल्याशिवाय त्यांना दुसरं काही जमत नाही. त्यांची अवस्था किती वाईट आहे हे महाराष्ट्राला माहीत आहे. त्यामुळे मी इतक्या खालच्या पातळीवर जाऊ शकत नाही. मला बोलायचं असेल तर त्यांना बाहेर पडणं मुश्किल होईल.

### अमित शाहांना भेटणार

एकनाथ खडसे पुढे म्हणाले की, मला वाटते की, खरोखर गिरीश महाजन यांचे दहा वर्षांचे सीडीआर तपासले तर खरी वस्तुस्थिती समोर येईल. गिरीश महाजनांच्या रंगलेल्या रात्री थत्तेंनी म्हटल्याप्रमाणे मी देखील अमित शहांना भेटणार आहे. अमित शहा आणि माझी भेट होतच राहते. त्यावेळी मी त्यांना विचारणार आहे की, हे जे चाललं आहे ते काय आहे? असेही एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.

### माझा अंत पाहू नका

'गेल्या अनेक वर्षांपासून वारंवार घाणेरडी भाषा करायची. काही सिद्ध करता येत नाही. काहीतरी चरित्रहणन करायचं, याशिवाय त्यांच्याकडे दुसरं काही राहिलेलं नाही. त्यांनी एक पुरावा दाखववा, मी सक्रिय राजकारणातून बाहेर पडेन. अमित शहा यांना काय पुरावा दाखवता? तुमच्याकडे पुरावा असेल तर तो लोकांना दाखवा. यांना दिले, त्यांना दिले माझ्या मोबाईलमध्ये होते, डीलिट झाले, मोबाईल हरवला हे खोटं बोलताना लाज वाटत नाही का? माझं आव्हान आहे त्यांनी एक पुरावा दाखववा. माझा अंत बघू नका.'

# भाजपच्या दावणीला बांधण्यासाठी सेना फोडली

## खा. संजय राऊत यांची टीका

**नाशिक : प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडली ती फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी आणि भाजपाच्या दावणीला बांधण्यासाठी. पण त्यातून शिवसेनेचे कोणतेही नुकसान झाले नाही. ते होणार पण नाही. आता त्यांचे मनसुबे पुरे होत नाही त्यामुळे त्यांचे महत्त्व संपले आहे. अशी टीका खा. संजय राऊत यांनी केली.

नाशिकमध्ये खा. राऊत हे शिबिराच्या आढाव्यासाठी आले असता ते बोलत होते.

येणाऱ्या काळामध्ये एकनाथ शिंदे यांना अजून काही अनुभव येतील असा विश्वास उबाठाचे ज्येष्ठ नेते खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला. राऊत यांचे स्वागत उपनेते सुधाकर बडगुजर, जिल्हाप्रमुख डीजी सूर्यवंशी, महानगरप्रमुख विलास शिंदे, उपनेते दत्ता गायकवाड, देवानंद बिरारी, अन्य नेते व शिवसैनिकांनी केले.

राऊत पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, शिंदे यांचे स्वप्न पूर्ण होत नाही आणि शिंदेंचे राजकारणही पुरे होत नाही. आणि त्यामुळे त्यांच्या राजकारणाला येणाऱ्या काही दिवसांमध्ये विराम मिळेल.

भाजपा हिंदुत्वापासून लांब चाललेली आहे. आज देशभर



वफ बोर्डाचा विषय सुरू आहे यापासून गोरगरीब जनतेला काय मिळालं तर काहीच नाही आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे वफ बोर्डाचा आणि हिंदुत्वाचा संबंध काय असा प्रश्न उपस्थित करून राऊत पुढे म्हणाले की, या सर्व प्रश्नांवरून शिवसेने बाबत वेगळी भूमिका व्यक्त केली गेली पण ती चुकीची आहे. असे मत व्यक्त करत संजय राऊत म्हणाले की, आतापर्यंत देशातील अनेक संस्था या सरकारने विकले आहेत. वफ बोर्डाची जमीन विकायची आहे. आणि ती आपल्या उद्योगपती मित्रांना मिळावी यासाठी म्हणूनच हा सर्व घाट घातल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे.

अशी सर्व परिस्थिती असताना कोण केसकर आणि त्यांनी स्वतःला एवढं मोठं का समजावे. आम्हाला शिवसेना म्हणून मोदी ओळखतात आणि मोदींची ओळख ही शिवसेनेला आहे अशा शब्दांमध्ये उत्तर देऊन संजय राऊत पुढे म्हणाले की, भाजप पेक्षा शिवसेना हा मोठा भाऊ आहे. शिवसेनेची स्थापना ही भाजपच्या आधी झाली आहे, असे सांगून राऊत पुढे म्हणाले की आजची भाजपा आहे. ती हायजॅक केलेली भाजपा आहे. जुनी भाजपची पद्धत वेगळी होती राजकारण वेगळे होतं आज जुन्या भाजपातील जे नेते आहे ते बंदी वासात आहे याची शोकांतिका वाटते.

### केसरकर कोण?

दीपक केसरकर यांनी मोदींना भेटण्यासाठी शिवसेनेला आमची गरज लागते असे म्हटल्यावर त्याला उत्तर देताना संजय राऊत म्हणाले की केसकर यांना माहिती नाही की मोदी आणि उद्धव ठाकरे यांच्यामध्ये अतिशय चांगले संबंध आहेत एकमेकांना ते फोन करून चर्चा करत असतात.

## जैन मुनी शांतीसागर यांना दहा वर्षांचा तुरुंगवास

**सुरत :** बलात्कार प्रकरणी दिगंबर जैन मुनी शांतीसागर महाराज यांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. १९ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. सुरत सत्र न्यायालयाने याबाबत त्यांना दोषी ठरवले.

दिगंबर जैन मुनी शांतीसागर महाराज यांनी २०१७ मध्ये, एका १९ वर्षांच्या श्राविका (महिला जैन भक्त) हिच्यावर बलात्कार केला होता. २०१७ मध्ये, जैन मुनी सुरतमधील नानपूर येथील उपाश्रयात राहत होते. म्हणूनच मूळ मध्य प्रदेशातील १९ वर्षांची मुलगी आणि तिचे कुटुंब, जे त्यांना आपले गुरु मानत होते, त्यांची शांतीसागरवर खूप श्रद्धा होती. शांतीसागर यांनी त्यांना पूजाविधीच्या बहाण्याने सुरत आश्रमात बोलावले होते. रात्री कुटुंब आश्रयस्थानात राहिले. यावेळी, रात्री ९.३० च्या सुमारास, शांतीसागर यांनी मुलीला पूजेचे निमित्त करून त्यांच्या खोलीत बोलावले आणि कुटुंबातील सदस्यांना खोलीबाहेर उभे राहण्यास सांगितले. यावेळी, पूजेच्या बहाण्याने धमकी देऊन मुलीवर बलात्कार करण्यात आला.

सुरुवातीला कुटुंब सामाजिक आदर गमावू नये म्हणून गप्प बसले, परंतु नंतर, इतर मुलींसोबत असे घडू नये असे वाटून, कुटुंबाने घटनेच्या १३ दिवसांनी सुरतमधील अथवलाइन्स पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून जैन मुनी शांतीसागर यांना अटक केली होती.

## महत्त्वाचे

### निफाड नगरपंचायततर्फे प्लास्टिक जप्तीची कारवाई



**निफाड:** स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा आणि एकल वापर प्लास्टिक बंदी अंमलबजावणी मोहिमेंतर्गत निफाड शहरात प्लास्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली. नगरपंचायतद्वारे शहरातील विविध ठिकाणी धडक कारवाई तब्बल ५८ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या. शुक्रवार आठवडे बाजाराच्या दिवशी मुख्याधिकारी अमोलचौधरी यांच्या आदेशान्वये प्लास्टिक पिशव्या विक्रेते यांच्यावर स्वच्छता निरीक्षक विनोद त्रिभुवन, शरद काकुळते, सुनील गांगुर्डे, प्रवीण पठाडे, बिलाल पठाण, झाल्टे, भोसले, जगताप, पवार व शिंदे या पथकाने प्लास्टिक पिशवी विक्रेते यांच्यावर धडक कार्यवाही केली व त्यांना दंड देखील करण्यात आला. इतर व्यापारी वर्गाकडून विक्रेत्यांनकडून ३२ किलो इतके विक्री साठी आणलेले प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या. ही मोहीम नियमितपणे सुरू राहणार असून, प्लास्टिक वितरण व वितरक दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अमोल चौधरी यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांनी वाटल्या कापडी पिशव्या



**निफाड :** कार्यानुभव विषयांतर्गत वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी कापडी पिशव्या तयार केल्या आणि या पिशव्यांचे निफाड येथील शुक्रवारी भरणाऱ्या आठवडे बाजारात दुकानदारांना वाटप करून प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन करून पर्यावरण पूरक संदेश देण्याचा प्रयत्न केला. प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, डॉ. उत्तम डेर्ले, मालती वाघवकर, बाळासाहेब कापसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. निफाडचे माजी नगराध्यक्ष मुकुंद होळकर, मोरे महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश जाधव, माजी प्राचार्या मालती वाघवकर, माजी सरपंच भारती कापसे, श्री माणकेश्वर वाचनालयाचे चिटणीस बाळासाहेब कापसे, डॉ. सीमा डेर्ले, प्रा. अभय वडघुले, वैनतेय विद्यालयाचें प्राचार्य बी. आर. सोनवणे, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, वाय. बी. ठोके, वैभव कर्डीले, भूषण सोनवणे, साहिल शेख आदी यावेळी उपस्थित होते.

### निफाड अर्बन को-ऑप. बँकेला १ कोटींचा नफा

**निफाड :** येथील दि निफाड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला चालू





आर्थिक वर्षात एक कोटी आठ लाख रुपये नफा झाला असून बँकेने५१ व्या वर्षात पदार्पण केल्याचे बँकेचे अध्यक्ष राजेंद्रकुमार राठी यांनी म्हटले आहे. निफाड अर्बन बँकेकडे ३१ मार्च २०२५अखेर ३कोटी १९ लाख रुपये भागभांडवल असून रिझर्व फंड १३ कोटी ४६ लाख रुपये आहे. बँकेकडे १०३ कोटी ७० लाखाच्या ठेवी असून बँकेने ६१ कोटी २५ लाख रुपये कर्ज वाटप केले आहे तर बँकेची गुंतवणूक ४८ कोटी ६९ लाख इतकी असून बँकेकडे खेळते भाग भांडवल १२१ कोटी ४५ लाख इतके आहे. बँकेचा एनपीए १.६८% इतका असून सीडी रेपो ५९ २६% इतका आहे. बँकेला नफ्यापेक्षा बँकेची संपत्ती स्थिती जास्त मजबूत करण्याकडे प्रयत्न राहील बँकेने मोबाइल सेवा देण्यास सुरुवात केली असून आय एमपीएसची सुविधा चालू केली आहे. लवकरच यूपीआयची सेवा चालू करण्यात येणार असून बँकेची लवकरच विंचूर येथे शाखा सुरू होत आहेत सुरू होत असून बँकेच्या या यशात सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा असल्याचे बँकेचे चेअरमन राजेंद्रकुमार राठी, उपाध्यक्ष विलास निरभवणे, संचालक नंदलाल बाफना, विजयकुमार बोरा, रामदास व्यवहारे, परमानंद गोसावी, प्रवीण कराडे, कृष्णाशेठ नागरे, संजयकुमार पोफळीया, आनंद दायमा, सचिन गीते, मनोहर सांगळे, अजय सोनी, संकेत डोखळे, प्रवीण ठाकरे, वैशाली दुधाडिया, हेमलता चोरडिया, रवीकुमार राठी, केशरचंद रुणवाल, व्यवस्थापक मोहनलाल सुराणा आदींनी म्हटले आहे.

### थकबाकी वसुलीसाठी कारवाई करावी



**दिंडोरी :** दिंडोरी येथे नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी, कर्मचारी, सचिव यांची आढावा बैठक नाशिक सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक फयाज मुलाणी यांच्या अध्यक्षतेखाल घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेच्या थकबाकीबाबत आढावा घेण्यात आला. थकबाकीबाबत ज्या संस्थाच्या अधिकारी कर्मचारी सचिव यांनी कामकाज केलेले नाही,किंवा चुकीचे कामकाज केलेले आहे. त्यांच्यावर सक्त कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या. थकबाकी वसुलीसाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात यांवी अशाही सुचना देण्यात आल्या.



**दिंडोरी : ना. झिरवाळ याच्या निवासस्थानी दिंडोरी नगरपंचायत सर्वपक्षीय नगरसेवकांच्या भेटीप्रसंगी दीपक जाधव, नितीन गांगुर्डे, अनिकेत बोरस्ते, सुजित मुरकुटे, हेमंत पगारे व विजय कराटे आदी. (छाया: प्रमोद ठेपणे)**

### दिंडोरीत आज डोळे तपासणी शिबिर

**दिंडोरी :** ना. नरहरी झिरवाळ चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने व युवा नेते गोकूळ झिरवाळ यांच्या संकल्पेतून आज सोमवार (दि. ७) सकाळी ९ ते ५ वाजेपर्यंत दिंडोरी, पेठ, वणी ग्रामीण रुग्णालयात डोळ्यांची तपासणी व मोतिबंदु शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डोळ्याची तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी दिंडोरी व पेठसाठी राजेंद्र खांडवी, संदीप चौधरी, पिनु मोंढे, संदीप गोतरणे, दिपक पाटील, सुरेश चौधरी तर पेठ तालुक्यासाठी सुयोग गवळी, बाळू गवळी, जितेंद्र जाधव, गणेश गवळी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नरहरी झिरवाळ चॅरिटेबल ट्रस्ट व युवा नेते गोकुळ झिरवाळ मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# निफाड तहसीलदारांना मनसेचे निवेदन



**निफाड : प्रतिनिधी/ वि.प्र**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून आक्रमक होत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शासनाच्या धोरणाचा निषेध केला. तसेच संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना कठोर शासन करावे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अशी मागणी करत निफाडच्या तहसीलदारांना निवेदन दिले.

प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली व प्रकाश गोसावी जिल्हा उपाध्यक्ष, तुषार गांगुर्डे जिल्हाध्यक्ष (रोजगार), केशव वाघ (तालुका उपाध्यक्ष), अब्दुल शेख (तालुका सरचिटणीस), सुयोग गायकवाड (जिल्हा उपाध्यक्ष मनविसे), आशुतोष सूर्यवंशी (जिल्हा संघटक मनविसे) आदींसह पदाधिकाऱ्यांनी यात सहभाग घेतला.

राज्यातील दररोज मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढत आहे.निष्पाप कार्यकर्त्यांचा जनसामान्यांचा बळी जात आहे. राज्य सरकारला शेतकरी बंधू व जनतेच्या महत्त्वाच्या सुरक्षेतेकडे लक्ष देणे जमत नाही की काय असा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आला.

राज्यातील शेतकरी बंधूंना जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत असेच मोठे आंदोलन सुरू राहील राज्यभरातून समस्त शेतकऱ्यांना घेऊन मोठे आंदोलन उभारू असा इशारा देखील देण्यात आला.

यावेळी जयेश ढिकले, किरण मोगल, निलेश सोनवणे, गणेश कदम, अमोल निचित, योगेश पाटील, किरण चव्हाण, व शेतकरी प्रवीण मोगल, विष्णू मोगल, बाळासाहेब मुरकुटे, अशोक आंधळे, सुदाम राजोळे, मोतीराम नाना पाटील, दत्तात्रेय गवळी, संतोष आहेर, दत्तात्रेय सुडके, विनायक अनारशे, रामचंद्र आहेर, नारायण आहेर, भास्कर गोराने, बाळासाहेब ढोमसे, साहेबराव पानगव्हाणे, केशव पानगव्हाणे, स्वप्निल गुरगुडे, रामदास आहेर, बाळासाहेब चौधरी, किसन ढगे, शेतकरी नेते सुधाकर मोगल उपस्थित होते.



## विविध मागण्यांबाबत मनसेचे तहसीलदारांना निवेदन

**दिंडोरी : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नाशिक सरचिटणीस दिनकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष मनोज ढिकले, मनसे तालुकाध्यक्ष अमोल उगले यांच्या उपस्थितीत तहसिलदार मुकेश कांबळे, दिंडोरी यांना तहसिल कार्यालय येथे निवेदन देऊन लक्षणीय आंदोलन करण्यात आले,

महाराष्ट्र शासनाने २० मार्च २०२५ रोजी च्या बैठकीतील निर्णयानुसार,शेतकऱ्याची एक रुपयात प्रधानमंत्री पिक विमा योजना बंद करण्याचा निर्णय घेतला असून,त्याच प्रकारे ऐनवेळी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यास नकार दिला यामुळे शेतकऱ्यांवर मोठा अन्याय झाला आहे,

शासनाने शेतकऱ्याबाबत असलेली एक रुपया प्रधानमंत्री पिक विमा योजना त्वरित चालू करावी, शेतकऱ्यांचा सातबारा त्वरित कोरा करावा,यामुळे राज्यातील गंभीर परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या बळीराजाला मोठा दिलासा मिळेल, मस्साज-ोग येथील दिवंगत सरपंच संतोष देशमुख व आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींवर कठोर कार्यवाही झाली पाहिजे,राज्यातील सुरक्षा सुव्यवस्था बाबत जनसामान्यांमध्ये आता प्रश्न उभे राहू लागलेले आहे,

राज्यातील दररोज मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढत असून,निष्पाप कार्यकर्त्यांचा जनसामान्यांचा बळी जात आहे. राज्यातील शेतकरी बंधूंना जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत असेच मोठे आंदोलन सुरू ठेवणार असून, राज्यभरातून समस्त शेतकऱ्यांना घेऊन मोठे आंदोलन उभारू असा इशारा देखील मनसे पक्ष तर्फे देण्यात आला,

त्याच प्रकारे संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा झाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही असा इशारा ही देण्यात आला आहे,

सदर निवेदन देता वेळी मनसे जनहित कक्ष तालुकाध्यक्ष प्रफुल्ल कलवले,रोशन दिवटे,बाळु उदार, दिलीप जाधव, चेतन वडजे, किरण माळेकर, शुभम गायकवाड, धनंजय महाले यांसह पदाधिकारी, महाराष्ट्र सैनिक शेतकरी बांधव उपस्थित होते,



# अभोण्यात कांदा आवक घटली
## बाजारभाव ५० रुपयांनी वधारले!

**अभोणा : प्रतिनिधी**

कळवण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अभोणा उपबाजारात शेतकऱ्यांनी गुरूवारी सुमारे ७०० ट्रॅक्टर मधून १५ हजार क्विंटल कांदा आणला होता. त्यात दर २०० रूपयांनी घसरले होते. शनिवारी कांदा आवक ७ हजार क्विंटलने घटली, ३०० ट्रॅक्टरमधून ८ हजार क्विंटल कांद्याची आवक झाली. त्यात ५० रूपयांची दर वाढ झाल्याचे दिसून आले.

शनिवारच्या उप बाजारात कांद्याला सरासरी १४०० ते १५०० रूपये दर मिळाला. गुरूवारी सरासरी १२०० ते १४५० रूपये दर मिळाला होता. त्यात ५० रूपयांची वाढ झाल्याचे दिसून आले. यावेळी कांदा दर कमीत कमी १२००, गोल्टी गोलटा ४५० ते १२७५, खाद ७०० ते ९०० रूपये प्रति क्विंटलने विकला गेला.

अभोणा व परिसरात बुधवारी पाऊस पडला होता, आता दुपारी कडक ऊन सायंकाळी पावसाळी वातावरण असा खेळ सुरू असल्याने ज्यांचा कांदा जमिनीत आहे, त्यांची चिंता वाढली आहे. शेती कामांसाठी पैशांची गरज असल्याने ताजा उन्हाळ कांदा विक्रीसाठी आणावा लागतो. भाववाढीची अपेक्षा असल्याने कांदा चाळींमध्ये साठवणूकीस प्राधान्य दिल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

> **कांद्याचे रोख पैसे घ्या !**
>
> शेतकरी बांधवांनी योग्य ती प्रतवारी करून कांदा मोठ्या प्रमाणात अभोणा उपबाजारात विक्रीसाठी आणावा, व्यापाऱ्यांकडून कांद्याचे रोख पैसे घ्यावेत. शेतकऱ्यांच्या काही तक्रारी असल्यास लेखी किंवा तोंडी कार्यालयात कराव्यात.
>
> – **धनंजय पवार,** सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती कळवण

# पीक विमा योजना बंद करणे अन्यायकारक
## तहसील कार्यालयासमोर मनसेचे धडक आंदोलन

**चांदवड : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील महत्त्वाचे घटक वगळून योजना बंद करण्याचा घेतलेला निर्णय अन्यायकारक ठरवत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक पवित्रा घेतला होता. ही योजना त्वरित पुन्हा सुरू करावी आणि राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज तत्काळ माफ करावे, या मागणीसाठी चांदवड तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने चांदवड तहसील कार्यालयासमोर धडक आंदोलन पार पडले.




यावेळी आंदोलकांनी शासनाच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला होता. आंदोलनानंतर तहसीलदार मंदार कुलकर्णी यांना मनसेच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने खरीप हंगाम २०२३ पासून 'एक रुपयात प्रधानमंत्री पिक विमा योजना' सुरू केली होती. मात्र, २० मार्च २०२५ रोजी झालेल्या बैठकीत ही योजना गुंडाळण्याचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच, शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले प्रतिकूल हवामानामुळे पेरणी न होणे, हंगामाच्या मध्यभागी उद्भवणारी प्रतिकूल परिस्थिती, स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणीपश्चात नुकसानभरपाई यांसारखे अत्यावश्यक चार जोखीम घटक योजनेतून वगळण्यात आले आहेत.

मनसेने या शासनाच्या भूमिकेवर तीव्र असंतोष व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा मूळ उद्देश नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे हा आहे. परंतु, महत्त्वाचे घटक वगळल्याने या योजनेचा शेतकऱ्यांना कोणताही प्रत्यक्ष लाभ मिळणार नाही. काही ठिकाणी पिक विमा योजनेत गैरप्रकार झाल्याच्या कारणास्तव ही योजना बंद केली जात असल्याचे शासनाकडून सांगण्यात येत असले, तरी केवळ काही जिल्ह्यांतील त्रुटींसाठी शेतकऱ्यांना या फायद्यापासून वंचित ठेवणे पूर्णपणे चुकीचे आहे, असे मनसेने निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे. या आंदोलनात नाना विसपुते, नितीन थोरे, जोजो कोतवाल, रोहित शिंदे, पंकज गोसावी, मयूर माळी, दत्ता पानसरे, गोविंद कोतवाल, दत्ता जाधव, नवनाथ ठोंबरे, ज्ञानेश्वर गाडे, येतो गांगुर्डे, गोरख हिरे, नवनाथ जाधव, लक्ष्मण गायकवाड, अजय जाधव, ओंकार कर्डिले उपस्थित होते.

# ग्रामीण पोलीस दलातर्फे तक्रार निवारण दिन

**लासलगाव : वार्ताहर**

ग्रामीण पोलिस दलातर्फे दर शनिवारी तक्रार निवारण दिन साजरा करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यामध्ये शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी "क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा" निश्चित केला आहे.

तक्रार निवारण दिनाचे अनुषंगाने नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण आदित्य मिरखेलकर व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव तेगबिर सिंह संधु यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये व पोलीस ठाण्यांमध्ये वरिष्ठ अधिकारी यांनी भेटी देऊन पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या तक्रारींमधील फिर्यादी व तक्रारदार यांना पोलीस ठाणेस बोलावून गुन्हा व तक्रारीच्या अनुषंगाने मार्गदर्शन व समुपदेशन केले. क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडयाचे कामकाज सुरू झाल्यापासून नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे यापूर्वी राबविण्यात आलेल्या एकुण ११ तक्रार निवारण दिनाअंतर्गत ६७८२ तकारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. तसेच दि. ०५ रोजी १२ व्या तक्रार निवारण दिनानिमित्त ३१८ तकारी निकाली काढण्यात आल्या. आजपर्यंत एकूण ७१०० तक्रारींचे निरसन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे नोंद करण्याची कार्यवाही सुरू असून, काही तकारी दिवाणी स्वरूपाच्या असल्याने महसुल विभाग / दिवाणी न्यायालयात दाद मागण्यास सांगण्यात आले.

## आ. भुजबळांच्या उपस्थितीत येवल्यात कव्वाली महफिल

**येवला : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध गायक कव्वाल मुज्तबा अजिज नजा यांच्या कव्वालींने येवल्यात रसिक मंत्रमुग्ध झाले. निमित्त होते राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या कडून रमजान ईद सणाच्या निमित्ताने येवला मतदारसंघातील मुस्लीम बांधवासाठी आयोजित ईद मिलन समारोहाचे. यानिमित्ताने येवला शहरातील अंबिशा बाबा शादिखाना फंक्शन हॉल येवला येथे कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी आ. छगन भुजबळ, आ. पंकज भुजबळ, समीर भुजबळ उपस्थित होते.

यावेळी प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य हुसेनभाई शेख,दत्ता निकम, दीपक लोणारी, मुश्ताक शेख, शफीक शेख, अमजद शेख, मलिक मेंबर, सोहेल मोमीन, मतीन अन्सारी, राजू पहिलवान, जावेद लखपती, रौफ शेख, डी के जगताप, डॉ. श्रीकांत आवारे यांच्यासह कार्यकर्ते व मुस्लिम बांधव उपस्थित होते. छगन भुजबळ उपस्थित मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

# कासवगतीच्या रस्ता कामामुळे अपघातांत वाढ
## एकेरी वाहतूक ठरतेय डोकेदुखी; प्रत्यक्ष नवीन कामाला मुहूर्त लागेना

**निफाड : प्रतिनिधी**

गेल्या महिनाभरापूर्वी निफाड ते नैताळे पर्यंतच्या रत्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी एकाच बाजूने खोदकाम करीत या मार्गावरील वाहतूक एकाच बाजूने वळविल्याने अपघाताचे प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच धुळीच्या प्रादुर्भाव सामना वाहन चालक, प्रवाशी यांना करावा लागत आहे. त्यातच रस्ता खोदून ठेवल्याने कासवगतिने होणऱ्या कामास प्रत्यक्ष कामाची प्रतीक्षा असून, रस्त्याचे काँक्रिटीकरण होणार तरी कधी असा प्रश्न पडला आहे.

येवला लासलगाव मतदार संघाचे आमदार छगन भुजबळ यांनी नाशिक ते छत्रपती संभाजीनगर हा महामार्ग पिंपळस रामाचे ते येवला पर्यंतच्या रस्ता काँक्रिटीकरणासाठी ५६० कोटी रुपये मंजूर केले आहे. हे काम घेतलेल्या सबंधित ठेकेदाराने हा रस्ता निफाडपासून ते शिवरे फाट्यापर्यंत एका बाजूने खोदून ठेवला असल्याने या ठिकाणी येणारी आणि जाणारी वाहने एकाच मार्गाने मार्गक्रमण करीत असल्याने अनेकवेळा अपघाताला सामोरे जावे लागत आहे. त्यातच सुरू झालेला लग्न समारंभाचा हंगाम आणि यात्रा उत्सव यामुळे वाहनांच्या कोंडीत अधिकच भर पडू लागली आहे. त्यातच रस्ता खोदकाम करताना उडणारी धूळ आणि वाहनांची उडणारी धूळ यामुळे प्रदूषणात मोठी वाढ होऊन परिसरातील व्यवसायिक शेतकरी प्रवाशी यांना स्वसनाचे विकार होवू लागले आहेत. गेल्या महिनाभरापासून या रस्त्याचे खोदकाम सुरू असून आता प्रत्यक्षात रस्ता काँक्रिटीकरणाचे कामाला सुरवात कधी होणार असा प्रश्न वाहन चालक प्रवाशी यांना



पडला आहे.

त्यातच जेथे जेथे काँक्रिटीकरण करण्यात आले. ते देखील निकृष्ट दर्जाचे झाल्याने त्यावर देखील खड्डे पडू लागले आहेत. त्यामुळे केवळ ठेकेदार पोसण्यासाठीच आणि टक्केवारी साठीच कामाचा फार्स उभा केला जात आहे काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. नाशिक ते संभाजीनगर या महामार्गला पुढे निफाडजवळ सुरत, वणी, वघई हा राज्य मार्ग जॉइंट होतो. तसेच याच मार्गाने सुरतचे साईभक्त शिर्डी येथे पायी जात असतात. याबरोबरच पिंपळगाव, निफाड, विंचूर, येवला वैजापूर, संभाजीनगर या मोठ्या बाजारपेठा याच महामार्गावर असून परिसरात कांदा, द्राक्ष, ऊस, भाजीपाला आदी पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. त्यामुळे बाराही महिने या मार्गाने शेतमालाची वाहतूक होत असते. तसेच शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, चाकरमानी, व्यापारी यांचाही नित्याचा राबता असतो. मात्र रस्ता खोदकामामुळे उडणारी धूळ अन् एकेरी वाहतुकीमुळे वाहनांची होणारी कोंडी यामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

> **अचोळा नाला दरवर्षाचीच डोकेदुखी**
>
> नाशिक ते छत्रपती संभाजी नगर या रस्त्यावरील निफाड जवळील अचोळा नाल्यावरील पुलाची उंची कमी असल्याने उत्तर बाजूच्या शिवारातून पावसाचे पाणी रस्त्यावर वाहत येवून हा मार्ग काही काळ बंद पडतो. या मार्गावर प्रवास करणाऱ्यांना दरवर्षीच या समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे या नवीन रस्त्याचे नूतनीकरण करताना अचोळा नाल्यावरील असणाऱ्या पुलाला उंची देवून रस्त्यावर येणाऱ्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा अशी मागणी होत आहे.

> एका बाजूची वाहतूक पूर्ण बंद करून रस्ता मोठ्या प्रमाणात खोदण्यात आला असल्याने व्यवस्याय पूर्ण ठप्प झाले आहेत. तसेच एकाच बाजूने जाणारी आणि येणारी वाहने धावत असल्याने अपघात वाढले आहेत. त्यामुळे खोदलेला रस्ता पावसाळा सुरू होण्यापूर्वी दुरुस्त करून देवून तो वाहतुकीसाठी खुला करावा.तसेच रस्त्यावर उडणारी धूळ कशी कमी करता येईल यासाठी प्रयत्न व्हावे.
>
> – **दत्तात्रय शिरसाठ,** ट्रॅक्टर स्पेअर पार्ट विक्रेते, निफाड

## महत्त्वाचे



### अशोकनगरच्या मुलाचा तापाने मृत्यू चौकशीसाठी आ.सीमा हिरेंना निवेदन

**नाशिक :** केवळ ताप आला म्हणून तीन दिवस उपचारासाठी नाशिकच्या अशोका हॉस्पिटलमध्ये दाखल दोन वर्षाच्या बालकाच्या पालकांकडून साडेपाच लाख रूपयांचे बिल उकळून बालकाचा मृतदेहच ताब्यात देणाऱ्या अशोका हॉस्पिटल व्यवस्थापनाची आरोग्य विभागाच्या उच्चस्तरीय तज्ञ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी होऊन न्याय मिळवून द्यावा, असे निवेदन नाशिक पश्चिम मतदार संघातील आमदार सीमा हिरे यांना देण्यात आले. अशोकनगर येथील विवेक गांगुर्डे हे परिवारासह रहातात.त्यांचा २ वर्षाच्या मुलगा भार्गव यास केवळ ताप आला म्हणून दि.५ मार्च रोजी विश्वेश हॉस्पिटल डॉ. मिलींद भराडिया व नंतर दि.८ तारखेला पूर्ण शुध्दीत व बोलत असलेला भार्गवला नाशिकच्या अशोका हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.९ मार्च रोजी डॉक्टरांनी अचानकपणे यकृत सुजल्याचे आणि मूत्रपिंड निकामी होण्यास सुरुवात झाल्याचे सांगितले. त्यानंतर डायलिसिस सुरु करण्यात आले.दि.११ मार्च रोजी मध्यरात्री १२.३० वाजता भार्गवचा आकस्मिक मृत्यू झाला.या आकस्मिक मृत्यूची सखोल चौकशी करण्याबाबत विनंती करण्यात आली असून दुर्दैवी घटनेमागील कारणांबाबत पालकांना अनेक गंभीर शंका आहे. त्याच्यावर झालेल्या उपचारांबाबत अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत भार्गव हा शेवटपर्यंत पुर्ण शुध्दीत आणि बोलत होता.तो शारीरिकदृष्ट्या देखील सामान्य अवस्थेत होता.डेंग्यू आणि इतर संसर्ग जन्य आजार नकारात्मक असतांनाही त्याची प्रकृती इतक्या वेगाने बिघडली कशी? अनावश्यक किंवा जास्त प्रमाणात हेवी औषधे दिली गेली का? दिली असल्यास, ती औषधे योग्य प्रमाणात आणि प्रमाणित दर्जाची होती का?, सुरुवातीला कोणतीही गंभीर लक्षणे नसतानाही व्हेंटिलेटर आणि डायलिसिसची आवश्यकता कशासाठी पडली? फक्त ३ दिवसांत अशोका हॉस्पिटलने साडेपाच लाखाचे अव्वाच्या सव्वा बिल का आकारले?डॉक्टरांनी योग्य निदान केले होते का? त्यांच्या उपचारात हलगर्जीपणा किंवा वैद्यकीय निष्काळजीपणा झाला का? मुलाचा वापर वैद्यकीय प्रयोगांसाठी तर करण्यात आला नाही ना? या प्रकरणाची तज्ञ व उच्चस्तरीय वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे.अशी मागणी निवेदनाद्वारे पालकांनी केली आहे.निरागस भार्गवच्या आकस्मिक मृत्युच्या या दुर्दैवी घटनेने गांगुर्डे परिवार सुन्न झाला असून, सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### भारतीय जनता पार्टीतर्फे स्थापना दिन साजरा



**नाशिक:** भारतीय जनता पार्टी,नाशिक महानगर च्या वतीने भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिन व रामनवमी उत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भाजपा महाराष्ट्र राज्यात प्राथमिक सदस्य नोंदणीचे दीड कोटीचे उद्दिष्ट पार करून १ कोटी ५१ लाख भाजपा प्राथमिक सदस्य नोंदणी उदिष्ट पुर्ण झाल्याबद्दल व भाजपा वर्धापनदिनामित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले होते. हा कार्यक्रम बघण्यासाठी भारतीय जनता पार्टी नाशिक महानगर कार्यालय वसंतस्मृती येथे भव्य स्क्रीन लावून व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमात माजी केंद्रीय मंत्री भारती पवार, शहराध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस काशिनाथ शिलेदार, भाजपा प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे, भाजप प्रदेश अनुसूचित जाती मोर्चा उपाध्यक्ष गणेश कांबळे, अजिंक्य साने, सुरेखा निकम, नंदकुमार देसाई, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर, भाजप माजी सरचिटणीस योगेश भगत, शैलेश जुन्नरे, सुजाता करजगीकर, डॉ.प्रशांत भदाणे, हेमंत शुक्ल, महेंद्र गर्गे, संगीता जाधव, प्रदीप पाटील, ऋषिकेश डापसे, दिनेश जाधव, सुरेश पाटील, रविंद्र गांगुर्डे, प्रतीक शुक्ल, सचिन मोरे, डॉ.दिगंबर संनान्से, सतिष निकम, निखील सरपोतद्दार, पराग शित्रे, वैशाली जोशी, अनिल जाधव, मयुर गैल, इशान नेरे, पीयूष अमृतकर, रोहन जगताप, वक्रतुंड कसबे, देवेंद्र चुंभळे, विजय कुलकर्णी, सदानंद तायडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रामनवमीनिमित्त प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी पुष्पांजली वाहून पूजन केले. यानंतर दादासाहेब वडनगरे यांच्या स्मतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

### डॉ. रामचंद्र जाधव यांना विद्याभूषण पुरस्कार



**नाशिक :** नाशिक विभागाचे माजी शिक्षण उपसंचालक डॉ. रामचंद्र जाधव यांना माजी कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते विद्याभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे संविधान हक्क समिती व मंत्रालय वार्ता या संस्थेच्या वतीने डॉ. जाधव यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माजी मंत्रीतथा खा.चंद्रकांत हांडोरे, महेश तपासे, गायिका निशा भगत, अनिल आहिरे आदींची उपस्थिती यावेळी होती. शिक्षण उपसंचालक असताना शैक्षणिक क्षेत्रात समाजातील गोर-गरीब वंचित घटकांतील मुलांसाठी डॉ. जाधव यांनी विशेष काम केले आहे. शैक्षणिक क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याने त्यांचा हा सन्मान करण्यात आला आहे. दरम्यान उपसंचालक म्हणून कार्यरत असताना नाशिक विभागात इयत्ता अकरावीचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया त्यांच्यावेळी लागू झाली. सदर प्रक्रिया तांत्रिक अडचणी दूर करुन राबवली. शिवाय कनिष्ठ महाविद्यालयामधील प्राध्यपकांचे प्रश्न सोडवून विविध शैक्षणिक संस्थांना त्यांनी सहकार्य केले आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतरही जाधव यांचे आंबेडकरी चळवळीत योगदान असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा हिरारीने सहभाग असतो. याचीच दखल घेऊन त्यांना विद्या भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून त्यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

# नाशिकरोड परिसरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

**नाशिकरोड: वार्ताहर**

अवधमे राम आये, मन मन में बसे राम, विसरू नको श्रीरामा मला अशा रामभक्तीपर गीतांमध्ये काल सकाळपासुन दुपारपर्यंत नाशिकरोड परिसर राममय झाला होता.

नाशिकरोडमधील बिर्ला मंदिर, मुक्तिधाम, मथुरा रोडवरील जय दादा दरबार, देवळाली गावमधील देशमुखांचे राम मंदिर, देवी चौकातील श्रीराम मंदिर मध्ये दुपारी बारा वाजता 'राम जन्मला ग सखे राम जन्मला' असा पाळणा गात महिलांनी राम जन्मोत्सव सोहळा साजरा केला.

देवळाली गावात दिवंगत माजी खा.बाळासाहेब देशमुख यांचे पन्नास वर्षांपूर्वीचे श्रीराम मंदिर आहे. त्या मंदिराची देखभाल पूजा अर्चा देशमुख परिवारातील व्यक्तीच करत आलेले आहेत. यावर्षी बाळासाहेबांच्या स्नुषा श्रीमती दिपलक्ष्मी देशमुख यांनी महापूजा करून श्रीरामाची आरती केली. प्रसादही वाटला. यावेळी देवळालीगाव पंच कमिटी अध्यक्ष विधीज्ञ शांतारामबापु कदम, बाळनाथ सरोदे, प्रदीप देशमुख, मनोहर कोरडे, डॉ.के.डी.बुवा, दिलीप भोसले, धैर्यशील तनपुरे, बाळासाहेब ढेरिंगे, योगेश गाडेकर, महेश देशमुख, महेश पवार आदी उपस्थित होते. निलेश ठाकूर, नीरज शर्मा, राजु कोटमे, बंटी कोरडे, कुंदन चौधरी, राजेंद्र कोटमे, संतोष शिंदे, संजय जोशी, मनोज जोशी, बंटी तनपुरे, दत्ता वराह, प्रविण कुलथे, मंगेश लांडगे आदींनी भाविकांसाठी खिचडी व फळे वाटप केली. सकाळी ११ ते १२ पर्यंत गावातील महिला भजनी मंडळाने भजनही म्हटले. दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.



विहितगाव मथुरा रोडवरील गिरीष गुप्ता यांच्या जय दादा दरबार मंदिरात गुप्ता यांनी राम, लक्ष्मण, सिता यांच्या मुर्तीला आकर्षक वस्त्रे परिधान करून फुलांची सजावट केली होती. सकाळी हवन, अभिषेक करून महाप्रसाद वाटप करण्यात आला. यात दिपांश, राजन दलवाणी, अनिल साधवानी, चंद्रशेखर दंदणे, रमेश भिमानी, दुर्गेश दंदणे, अनंत दंदणे, अनिल कोठूळे, तरूण गुप्ता आदींनी उत्तम नियोजन केले होते.

दत्तमंदिर चौकात श्री सत्यनारायण पूजा व प्रतिमा पूजन सुनिल जाधव, मनिषा जाधव यांचे हस्ते झाले. महाप्रसाद वाटण्यात माजी नगरसेवक अंबादास पगारे, अनिल ताजनपुरे, सुदाम ताजनपुरे, संतोष भामरे, सुनिल मेंढेकर, मंगेश पगार, आनंद कावळे, शरद घुगे, स्वराज ताजनपुरे, गोविंद विश्वकर्मा, उदय थोरात, किरण साळवे, राजु मोरे, विलास कांबळे, अंकुश बोचरे, संग्राम फडके आदींनी पुढाकार घेतला. मुक्तिधाममधील श्रीराम, लक्ष्मण, सीता यांची चौहाण कुटुंबातर्फे महापूजा झाली. कृष्णानंद मिश्रा, अजय मिश्रा, दामोदर वाघमारे यांनी मंत्रोपचारात पुजा केली. बिटको ट्रस्टचे हिरालाल चौहाण, इंदिराबेन चौहाण, विजय चौहाण, नटवरलाल चौहाण तसेच माजी नगरसेवक रमेश धोंगडे, गोपाल लाल आदींच्या हस्ते महा आरती करण्यात आली.

महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. बिर्ला राम मंदिरात रामाच्या मुर्तीला सकाळी अभिषेक करण्यात आला. महिला मंडळांचे भजन रामरक्षा आणि भक्ती संगीताचा कार्यक्रमही पार पडला. बिर्ला ट्रस्टचे व्यवस्थापक ठाकूर परिवाराने हे आयोजन केले होते.

देवी चौकातील लक्ष्मी नारायण मंदिरात फुलांनी सजविलेल्या मुर्तीला पाळण्यात ठेवून श्रीरामाची विधीवत पूजा करून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. व्यापारी पेठेतील या पुरातन मंदिरात रात्री उशिरापर्यंत भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

## पळसेत प्रभू रामचंद्रांचा जन्मोत्सव सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा

**नाशिकरोड: प्रतिनिधी**

नाशिक तालुक्यातील पळसे गावात विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे,शिवसेना शिंदे गट ,भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या सर्वच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी श्रीराम नवमी जन्मोत्सव प्रभू रामचंद्राचे विधिवत पुजन जेष्ठ नागरिकांच्या हस्ते करत फटाक्यांची आतिषबाजी करुन जन्मोत्सव मोठ्या थाटात साजरा करुन भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले.तर गावातील विठ्ठल मंदिरात भजन करत वारकरी संप्रदायाने प्रभू रामचंद्राचा जन्म सोहळा साजरा केला.

गावातील सर्वच आजचे आणि कालचे विरोधक प्रभू रामचंद्राच्या जन्मोत्सवानिमित्ताने एकत्रित दिसले. सकाळी ८ वाजता श्रीरामाच्या प्रतिमेला मोठा पुष्पहार शिवसेनेचे (उबाठा)तालुकाप्रमुख दिपक गायधनी, शिवसेना (शिंदेगट) उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी याच्या हस्ते अर्पण करण्यात आला तर श्रीरामाचे रामनवमीचे औचित्य साधत पुजन शिवसेना उबाठाचे उपजिल्हाप्रमुख जगन्नाथ आगळे, नासाकाचे माजी चेअरमन तानाजी गायधनी, भाजपाचे सुनील गायधनी, शरद कासार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाकार्यध्यक्ष गणेश गायधनी याच्या हस्ते करण्यात आले. नासाकाचे माजी चेअरमन तानाजी गायधनी, शिवसेना उबाठाचे उपजिल्हाप्रमुख जगन्नाथ आगळे, शिवसेना तालुकाप्रमुख दीपक गायधनी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी, रा. काँ.शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाकार्यध्यक्ष गणेश गायधनी, उपसरपंच भाऊसाहेब गायधनी, यासिन शेख, भाजपाचे सरचिटणीस शरद कासार, सुनील गायधनी, नंदु नरवडे, पोलीस पाटील सुनील गायधनी, कामगार नेते नामदेव गायधनी, दत्ता सरोदे, राजेंद्र गायधनी, पांडुरंग गायधनी, समाधान गायधनी, मोतीराम तिदमे, सुभाष ढेरिंगे, किरण नरवडे, दत्ता आगळे, विलास आगळे, शिवाजी टावरे, माधव गायधनी, मधूकर पगार, गायधनी, संदीप गायधनी आदी उपस्थित होते.

**जय श्रीराम..म्हणत आम्ही एक..**

मागील दोन वर्षापासून एकमेकांच्या विरोधात बोलणारे आणि टिका टिप्पणी करणारे सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी काल रामनवमी निमित्ताने प्रभू रामचंद्राचा जय जयकार करत एकत्रित आले आणि एकदम कटूता गेली की काय अशी जणू अनुभूती हेची देही हेची डोळा दिसली.. प्रसंग कोणताही असो किमान श्रीरामांनी तरी याना एकत्र आणले हे नाकारुन चालणार नाही



**पळसे : येथे प्रभू रामचंद्राच्या जन्मोत्सवानिमित्ताने प्रतिमेच्या पूजन प्रसंगी सर्व पक्षीय पदाधिकारी व नागरिक (छाया- सुनील पवार)**

## भगूरला श्रीराम जन्मोत्सवानिमित्त भक्तांची मांदियाळी

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

भगूर-देवळालीत श्रीरामजन्मरात्सवानिमित्त मंदिरांवर विद्युत रोषणाई व विविध धार्मिक कार्यक्रमासह सप्ताहाचे आयोजन करण्यात येऊन भक्तांच्या दर्शनाने दुमदुमले होते.

भगूरला गत आठ दिवसांपासून दि. ३० ते दि. ६ रोजी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमासह कीर्तनाने भक्तांना मंत्रमुग्ध केले. शेवटच्या दिवशी रामजन्मोत्सवप्रसंगी ह.भ.प. दिगंबर सोनवणे (बेळगाव तऱ्हाळे) यांनी अभंगवाणीतून राम जन्माची कथा, काव्य यांची सांगड घालत उदाहरणे देत भक्तांना मंत्रमुख केले. यावेळी श्री रामजन्मोत्सवासाठी पाळणा हार, फुले, फुगे यांनी सजविण्यात येऊन महिला पाळण्याला झोका देत श्रीरामनामाचा जयघोष, हनुमानचा जयघोष करत परिसर दुमदूमन गेल्याचे बघण्यास मिळाले. मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. दर्शनासाठी आलेल्या भक्तांना सावरकर भजनी मंडळाच्या वतीने खिचडी आणि थंडगार मठ्ठा तर राठोड परिवाराकडून बुंदीच्या लाडूंचे वाटप करण्यात आले. यावेळी दीपक बलकवडे, शिवाजी गायकवाड, शांताराम शेटे, तानाजी भोर, प्रभाकर गायकवाड निलेश हासे आदीसह भक्तांनी विशेष परिश्रम घेतले.



## जयभवानी रोडला श्रीराम रथ मिरवणूक

### सार्वजनिक रथ यात्रा उत्सव समितीतर्फे आयोजन

**नाशिकरोड: प्रतिनिधी**

सार्वजनिक रामनवमी रथ यात्रा उत्सव समितीच्या वतीने जय भवानी रोड येथे श्रीराम रथ मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आयोजक हितेश रामपुत, करण पारचे,माजी नगरसेवक प्रताप मेहेरोलिया, नगरसेवक रमेश घोंगडे, माजी नगरसेविका ॲड. कोमल मेहरोलिया, शरद जगताप यांच्या हस्ते रथाचे पूजन करण्यात आले.

मिरवणूक जाचक मळा, लवटे नगर,आडके नगर, भालेराव मळा,आटीलरी सेंटर रोड,अनुराधा चौक आदी परिसरातून काढण्यात आली. मिरवणुकीत प्रभु श्रीराम यांची मुर्ती भगवान शंकर, भगवान वाल्मिकी यांचे चित्ररथ होते.यावेळी दत्तु जाचक, प्रदिप जाचक,जगन लवटे, देविदास बैराणी, प्रादिप बेहवाल, देवराज गोहरे, अशोक चिडीवाले, माधुरी पालवे,कोकीळा वाघ, रंजनाबाई धनवटे, मिरा धाकेफळे अशोक जाचक, पोपटराव जाचक, दिनकर डावखर आदी उपस्थित होते.



## रामनवमीनिमित्त इरा सेंटरतर्फे गोदा संवाद वारसा फेरी

**नाशिक: प्रतिनिधी**

रामनवमीनिमित्त इरा सेंटर फॉर इंडिक स्टडीज तर्फे आयोजित गोदा संवाद ही विशेष वारसा फेरी नाशिककरांच्या उत्स्फूर्त सहभागातून शनिवारी पार पडली. गोदावरी किनाऱ्यावरील राममंदिरांचा व ऐतिहासिक स्थळांचा समावेश असलेल्या या निःशुल्क फेरीत शहरवासीयांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

सकाळी ६:३० वाजता रोकडोबा मारुती पटांगण येथून फेरीची सुरुवात झाली. त्यानंतर बायकांचा राम, पद्मनाभे गोराराम, पटांगणातील राम, अहिल्याराम, मुठेंचा गोराराम, रामरथ अशा विविध स्थळांना भेट देत फेरीचा समारोप काळाराम मंदिरात झाला. या फेरीत सहभागी लोकांना नाशिकमधील राममंदिरांचा इतिहास, नाशिक आणि भगवान राम यांचे नाते, श्री काळाराम मंदिराचा जन्मोत्सव, रथयात्रा यांसारख्या विविध विषयांवर माहिती देण्यात आली. फेरीदरम्यान मंदिरांच्या स्थापत्यशैलीपासून ते स्थानिक परंपरांपर्यंत विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण संवाद साधण्यात आला.



इरा सेंटरच्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, अशा प्रकारच्या वारसा फेऱ्यांमधून शहराचा सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचतो अशी भावना यावेळी सहभागी नागरिकांनी भावना व्यक्त केल्या.

## जिल्ह्यात आरोग्य दिनापासून वर्षभर विविध उपक्रम

**नाशिक: प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य दिन जगभरात दरवर्षी सात तारखेला साजरा करण्यात येत असतो. जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य सुविधा अधिकाधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि निरोगी आयुष्यातून आशादायक भविष्य निर्माण करण्यासाठी शासन अविरत कार्य करत आहे.


जागतिक आरोग्य दिनाचे सन २०२५ वर्षांसाठीचे घोषवाक्य निरोगी आयुष्यातून, आशादायक भविष्य असे आहे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे यांच्या मार्गदर्शनानुसार जागतिक आरोग्य दिनापासून विविध कार्यक्रम जिल्हाभरात वर्षभर साजरे करण्यात येणार आहेत. जिल्हयातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेत दि. ७ जागतिक आरोग्य दिनापासून वर्षभर आरोग्य जनजागृतीचे कार्यक्रमांचे नियोजन आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग मार्फत आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. राजेंद्र बागूल यांनी दिली. महात्मा फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत योजना, आरोग्य विमा योजना, पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, मंदिर/देवस्थान वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच इतर सेवा भावी संस्थाच्या वैद्यकीय सहाय्यता निधीची माहिती, अर्ज करण्याची पद्धत, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे आदीबाबत सविस्तर माहिती गावा-गावात पोहचवून जनजागृती करणे, गर्भधारणा, बाळंतपण आणि प्रसूतीनंतरच्या कालावधीशी संबंधित उपयुक्त आरोग्य माहिती महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्र मार्फत आरोग्य सेवक, सेविका, आशा कार्यकर्ते यांच्यातर्फे विशेष गृह भेटी देऊन जनजागृती करणे, आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थाचा विनामुल्य अधिकाधिक सहभाग वाढवून निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य कार्यक्रमात जनजागृतीस प्रोत्साहित करणे आदी उपक्रम राबविण्यात येतील. जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहेते, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक लोणे, डॉ युवराज देवरे यांनी आरोग्य अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत यासंदर्भात माहिती देत वर्षभर जनजागृती कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना केल्या.

## पळसे परिसरात बेमोसमी पावसामुळे पिकांचे नुकसान

**नाशिकरोड: प्रतिनिधी**

नाशिक तालुक्यातील पळसे पंचक्रोशीत सलग मागील दोन दिवसापूर्वी झालेल्या पाऊस व गारपिटीमुळे अनेक भागांत शेतक-यांची दाणाफाण उडाली होती. रब्बी हंगामातील कांदा, गहू, द्राक्ष व भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. अशी माहिती शेतक-यांनी महसूल अधिकारी व कुषी अधिकारी यांना दिली असून नुकसानीचे पंचनामे करा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

अचानक झालेला बेमोसमी पाऊसाने गहू द्राक्ष भाजीपाला आदी पिकांना गारपिटीने मोठा फटका बसला आहे.काही ठिकाणी काढणीला आलेला कांदाला जमिनीवर मध्यम सोयाबीन आकाराच्या गारांचा खच पडला होता. शासनाने शेतक-यांना मदतीचा हात पुढे करावा अशी मागणी शेतक-यांनी केली असून तातडीने संबधितांनी नुकसानीची पाहणी करून पंचनामे करावी अशी मागणी होत आहे.



पावसामुळे कांदाचे नुकसान आहेच. कांदात करपा रोग वाढून नुकसान होणार असल्याने उत्पान्नवरही संभाव्य परिणाम होणार आहे कृषी विभागाने नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

**–संजय गायधनी, कृषी मित्र पळसे**

# निफाड तालुक्यात नसबंदीला पुरुषांचा 'ठेंगा'

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

तालुक्यातील एक हजार पाचशे सतरा महिलांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करून घेतली. मात्र, एका वर्षांत केवळ दहा पुरुषांची शस्त्रक्रिया झाली आहे. यावरून पुरुषांनी नसबंदीला ठेंगा दाखविल्याचे चित्र आहे.

कुटुंब नियोजनाबाबत पुरुषांच्या मनात गैरसमज असून, आरोग्य विभागाला अजून जनजागृती करावी लागणार आहे.तालुक्यातील आरोग्य विभागाचे कुटुब नियोजन शस्त्रक्रियेचे उदिष्ट २ हजार ५८२ इतके होते

'छोटे कुटुंब, सुखी कुटुंबा'ची सर्वस्वी जबाबदारी महिलांवरच सोपवली जात आहे. महिला व पुरुषांच्या नसबंदीसंदर्भात आरोग्य विभागाकडून सातत्याने प्रबोधन केले जाते. पुरुष नसबंदीचे प्रमाण महिलांच्या तुलनेत नगण्य आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमांतर्गत नसबंदी करणाऱ्या पुरुषाला पंधराशे रुपये अनुदान दिले जातात. शस्त्रक्रिया झाल्यानंतर पैसे खात्यात जमा होतात. पुरुषांची नसबंदी महिलांच्या नसबंदी शस्त्रक्रियेपेक्षा सोपी आहे. स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रातही ती केली जाते. शस्त्रक्रियेनंतर एका तासात घरी जाता येते. केवळ गैरसमजामुळे पुरुषांचा नसबंदी शस्त्रक्रियेला प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले जाते .निफाड तालुक्याच्या आरोग्य विभागाने मार्च एन्ड अखेर ५० पुरुषांच्या नसबंदी शस्त्रक्रियेचे उदिष्ट ठेवले होते मात्र त्यात आरोग्य विभागाला अपयश आले.

गर्भधारणा रोखण्यासाठी पुरुष नसबंदी पर्याय सोपा आहे. नसबंदी केल्यास काहीही विपरीत परिणाम होत नाहीत. शस्त्रक्रियेसाठी पुरुषांनी आग्रही असले पाहिजे.गर्भधारणा रोखण्यासाठी निरोध आणि पुरुषांची नसबंदी हे पर्याय आहेत. त्यासाठी प्रबोधनाची व समाज जागरूकतेची गरज आहे.

**– डॉ. सुजित कोशिरे, तालुका वैद्यकीय अधिकारी निफाड**

## अनैसर्गिक लैंगिक अत्याचाराच्या आरोपातून महेंद्र पंडित यांची मुक्तता

**नाशिक: प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपातून महेंद्र पंडीत यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता करण्यात आली. दि. २६ फेब्रुवारी २०२२ रोजी भारतीय दंड संहिता कलम ३७७ व पोक्सो कायदा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण ८ साक्षीदार तर बचाव पक्षातर्फे एक साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपीच्या वतीने ॲड. प्रसन्न शिवप्रसाद पंडित यांनी काम पाहिले. पीडितेचे वय १८ वर्षाखाली असल्याचे ठोस पुरावे सिद्ध करता आलेले नाही. वैद्यकीय अहवाल पीडिताने दिलेल्या कथनास पूरक ठरले नाही. साक्षीदारांच्या जबानीत महत्त्वाच्या विसंगती आढळून आल्या. सरकार पक्षाकडून सादर झालेल्या पुराव्यात त्रूटी आढळून आल्याने न्या. प्रीतीकुमार घुले यांनी आरोपी महेंद्र गोविंद पंडित यांची सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्तता केली.

# येवल्यात पैठणी क्लस्टर औद्योगिक वसाहतींचा आढावा

## छगन भुजबळ, प्रधान सचिव डॉ. पी. अन्बल्गन यांची उपस्थिती



**येवला : प्रतिनिधी**

येवला पैठणी क्लस्टरच्या १२ कोटींच्या प्रस्तावास लवकरच मंजुरी देण्यात येईल तसेच आगामी काळात येवला शहरात नावीन्यपूर्ण पैठणी मेगा क्लस्टर उभारण्यासाठी तातडीने शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा अशा सूचना राज्याच्या उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बल्गन यांनी येवला संपर्क कार्यालयात माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

यावेळी आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, उद्योग विभागाच्या सहसंचालक वृषाली सोने, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील, उद्योग महाव्यवस्थापक संदीप पाटील, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता जे.पी.पवार, उपअभियंता चंद्रकांत सुरकार, रचनाकार चौधरी, प्रवीण पहिलवान, राजेश भांडगे यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व उद्योजकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

येवला शहरात पैठणी उद्योगासाठी प्रसिद्ध असलेल्या येवला शहर व तालुक्यातील १५ हजाराहून अधिक विणकर व ४० ते ५० हजार कुटुंबातील सदस्यांचा रोजगार अवलंबून आहे. त्यामुळे याठिकाणी मेगा पैठणी क्लस्टर उभारण्यात यावे अशा सूचना माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केल्या.

# बारागावपिंप्री शाळेत संविधान शिकण्याचा अनोखा प्रयोग!

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील बारागावपिंप्री येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा समिती अध्यक्ष सुंदर डेंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपक्रमशील शिक्षक गोरक्ष सोनवणे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांसाठी संविधान शिकण्यासाठी अनोखा प्रयोग राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांना संविधानाची महत्त्वाची कलमे सहज आणि प्रत्यक्ष जीवनात लागू करता यावीत, यासाठी सर्व शिक्षकांनी संविधानातील महत्त्वाची कलमे कार्डशीटवर लिहून शालेय वऱ्हांड्यात चिकटवली. त्यामुळे विद्यार्थी येता-जाता ही कलमे वाचतात, आणी समजून घेतात आणि पाठ करतात.

मुख्याध्यापक नवनाथ हांडगे, शिक्षक राजेंद्र पाटील, रोहिणी पगार, मनीषा शेळके, गोरक्ष काकड, अनिता बडदे आणि साक्षी उगले यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. संविधान ही फक्त परीक्षा पास करण्यासाठी नव्हे, तर उत्तम नागरिक घडवण्यासाठी आहे, असे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावले. संविधान केवळ पुस्तकात बंद न राहता प्रत्यक्ष जीवनात उतरणे गरजेचे आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्ये समजून घेण्यास आणि जबाबदार नागरिक बनण्यास मदत करेल. बारागाव पिंप्री शाळेचा हा उपक्रम इतर शाळांसाठी दिशादर्शक ठरेल असे गौरवोद्गार गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे यांनी काढले. विस्तार अधिकारी मंजुषा साळुंके, कैलास सांगळे, विजय बागुल, केंद्रप्रमुख इरफान पटेल, सरपंच संध्या कटके, उपसरपंच योगेश गोराडे आणि पालक-शिक्षक संघानेही या अभिनव उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.



# वाजे विद्यालयात इको क्लब, हरित सेनाअंतर्गत बक्षीस वितरण उत्साहात

**सिन्नर : प्रतिनिधी**

शालेय जीवनात झालेले पर्यावरण संवर्धनाचे संस्कार विद्यार्थ्यांना आयुष्यभर पर्यावरण संवर्धनासाठी काम करण्याची उर्जा प्रदान करतात. जंगले, वने, वन्यजीव, जमीन, पाणी यांकडे बघण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन सकारात्मक करण्यासाठी शाळांतून राबविण्यात येणारे कार्यक्रम महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन नाशिकचे वनविभागिय अधिकारी गणेश रणदिवे यांनी केले.

लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली इको क्लब आणि हरित सेना अंतर्गत बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपिठावर सिन्नरचे वनविभागीय अधिकारी निलेश पाटील, वनरक्षक श्रीमती सुचिता राठोड, वन परीमंडळ अधिकारी महेश वाघ, राजेंद्र भोकरे, उपमुख्याध्यापिका सौ. मंगला हांडे, पर्यवेक्षक राम ढोली आदी उपस्थित होते. विद्यालयाच्या उपशिक्षिका श्रीमती सविता घोरपडे यांनी वन्यजीव चारापाणी व्यवस्थापन या कार्यशाळेची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन करण्यासाठी सीडबॉलचा उपयोग करावा असे आवाहन मुख्याध्यापक देशमुख यांनी अध्यक्षीय मनोगतात केले. पर्यवेक्षक राम ढोली यांनी प्रास्ताविक केले. पर्यावरण संवर्धनासाठी वर्षभर राबविण्यात आलेल्या हरित सेना समितीच्या अंतर्गत पर्यावरणसंबंधी विविध उपक्रम राबवले गेले. त्यामध्ये पर्यावरण दिन, वनमहोत्सव, जागतिक ओझोन दिन यांसारख्या दिनविशेषांच्या निमित्ताने विविध स्पर्धा व कार्यशाळा आणि जनजागृती यामध्ये भाग घेऊन उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हरित सेना समितीतील विकास बैरागी, प्रिती पवार, मनीषा बनकर, सुनिता चव्हाणके, मनोहर सोनवणे, गणेश धनवटे, अश्विनी वारुंगसे, पल्लवी नवले, मंगेश जाधव, प्रवीण कोकाटे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन उपशिक्षक राहुल दौंड यांनी केले, मिलिंद डावरे यांनी आभार मानले.

# सुरक्षा रक्षक कायद्याचे जनक माधवराव भोसले यांची जयंती



**नाशिकरोड: प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षक कायद्याचे जनक कै.माधवराव भोसले यांची ७२ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कामगार उपायुक्त तथा नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे अध्यक्ष विकास माळी यांच्या हस्ते कै.भोसले यांच्या प्रतिमेचे अनावरण करून, पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमराव भोसले हे होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सहाय्यक कामगार आयुक्त चंद्रकांत बिरार, सरकारी कामगार अधिकारी तथा मंडळाचे सचिव सुर्यवंशी मॅडम, मंडळाचे निरिक्षक विशाल जोगी, उपस्थित होते. जिल्हा सुरक्षा रक्षक संघर्ष समितीचे ज्ञानेश्वर गांगुर्डे,राजेश गायकवाड,किरण चंद्रमोरे, विजय केदारे, बापूसाहेब जावळे, योगेश स्वामी, सागर मुठाळ तसेच इतर संघटनेचे प्रतिनिधी शैला वसईकर, ज्वल निकाळजे आदी कार्यकर्ते, मंडळातील सर्व अधिकारी कर्मचारी व सुरक्षा रक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'राम आयेंगे' कार्यक्रमात रमले रामभक्त

**नाशिक: प्रतिनिधी**

राम नवमीच्या पवित्र दिवशी नाशिक शहरातील सुज्ञान इंटरटेनमेंट निर्मित रोटरी क्लब ऑफ नाशिक यांच्या सौजन्याने रावत परिवाराच्या वतीने उदोजी महाराज संग्रहालय येथे मृगतृष्णा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात भैरव रागातील बंदीश प्रभू दाता रे भज रे मना या बंदीशीने झाली, त्यानंतर राग अहीरभैरव मधील अलबेला सजन आये ही ताल - तीनतालात सादर करण्यात आले व त्यानंतर श्री राम नामाच्या गजराने भजनाची सुरुवात करण्यात आली. सर्व श्रोत्यांसह ध्यानधारणा करण्यात आली आणि त्यानंतर राम का गुणगान करिये या भक्तिगीतापासून पासून भक्तिमय कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि रामा रघुनंदना, पायोजी मैंने राम रतन धन, राम आयेंगे, हे शीव शंकर हे करुणाकर, रामा रघुनंदना, विश्वाचे आर्त, अवचिता परिमळू, श्रीरामचंद्र कृपालू, ठुमक चलत, पायौजी मैने, बाजे रे मुरलीया, ठुमक चलत रामचंद्र, माई मेरे निर्धन को धनराम यासारख्या भक्ती गीतांमध्ये यावेळी उपस्थित रामभक्तमंडळी भक्तीगीतात रमले. यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष ओमप्रकाश रावत रोटरी क्लब ऑफ नाशिक च्या सहपरीवार उपस्थित होते. रोटरी क्लब अध्यक्ष. अवतार सिंग पनफेर, सौ. बरडीया, ग्रंथ तुमचे दारी चे प्रणेते. विनायक रानडे उपस्थित होते. चिमण्यांच्या चिवचिवाटात, पक्ष्यांच्या मधूर चहकेत सूर्योदय होताना खुल्या रंगमंचावर वडाच्या पारावर हा कार्यक्रम संपन्न झाला. गायिका विजयालक्ष्मी मणेरिकर (लक्ष्मी मंगेश) एकेक गीत सादर करताना प्रेम, भक्ती मुक्तीचा प्रवास विविध उदाहरणे देऊन उलगडून सांगत होत्या. प्रत्येक सकारात्मक गोष्टीचा आधार प्रेमच असते. प्रेम जेव्हा दृढ होते त्यानंतर ते भक्तीची वाट धरते. भक्ती जेव्हा जीवापाड होते तेव्हाच मुक्तीचा मार्ग गवसतो. अशी संकल्पना विस्तृत करत करत त्यांनी एकेक अभंगरचना सादर केली. त्यांना वाद्यवृंदातून साथ मिळीली ती अशी-कीबोर्ड-विधान बैरागी, तबला वादक-हितेश्वर पाटील, ऑक्टो पॅड रोहित जाधव, बासरी - इशिता गाडे, साईड रिदम - मकरंद देवरे व नृत्यागना - श्रीप्रिया बाहेकर इत्यादी कलावृंद उपस्थित होते.



# दहेगावला महिलेस मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील दहेगाव शिवारात एका महिलेला मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आमच्या पाईपावर का थुकली या क्षुल्लक कारणावरून आरोपींनी महिलेला मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. १ एप्रिल रोजी रात्री साडेनऊ वाजता दहेगाव येथे राहणाऱ्या दिवेकर नामक महिलेला राहुल खुशाल क्षिरसागर, खुशाल क्षिरसागर आणि त्यांच्या इतर दोन साथीदारांनी घेरले. तू आमच्या पाईपावर का थुकली असा आरोप करत त्यांनी महिलेला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यानंतर आरोपींनी महिलेला मारहाण करत धमकी देखील दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे.घडलेल्या प्रकारानंतर दिवेकर यांनी चांदवड पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी राहुल खुशाल क्षिरसागर, खुशाल क्षिरसागर व इतर दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार चित्ते करत आहेत.

# हिरवी मिरची, भुईमूग शेंग, कैरीच्या दरात घट झाली

**पुणे** : आवक वाढल्याने हिरवी मिरची, शेवगा भुईमूग शेंग, कैरीच्या दरात घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली.


**ग्रामपंचायत कार्यालय खेडेगाव ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय खेडेगाव ता. दिंडोरी जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०४/०४/२०२५ पासून ते ११/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय खेडेगाव, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत कार्यालय खेडेगाव ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय मावडी, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय मावडी ता. दिंडोरी जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०४/०४/२०२५ पासून ते ११/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय मावडी, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत कार्यालय मावडी ता. दिंडोरी जि. नाशिक**


पान १ वरून

## वक्फ दुरुस्तीवर राष्ट्रपतींची मोहर!

समाजाशी भेदभाव करतो, असे या याचिकांमध्ये म्हटले आहे. हा कायदा मुस्लिमांच्या मूलभूत अधिकारांचेही उल्लंघन करतो. यावर केंद्रीय मंत्री रिजिजू म्हणाले की, या कायद्याचा उद्देश वक्फ मालमत्तेतील भेदभाव, गैरवापर आणि अतिक्रमण थांबवणे हा आहे. या विधेयकाला (आता कायदा) राज्यसभेत १२८ सदस्यांनी पाठिंबा दिला, तर ९५ सदस्यांनी विरोध केला. २ एप्रिल रोजी रात्री उशिरा लोकसभेत ते मंजूर करण्यात आले. या काळात २८८ खासदारांनी समर्थन तर २३२ विरोधात मतदान केले.

**आणखी काय होतील बदल?**

एखादी मालमत्ता ही वक्फअंतर्गत येते की नाही, हे ठरवण्याचा अधिकार वक्फ बोर्डाला नसेल. अस्तित्वात असणाऱ्या त्रिसदस्यीय वक्फ लवादाची सदस्यसंख्या आता दोन असेल. या लवादाचा निर्णय अंतिम असणार नाही. लवादाने दिलेल्या निर्णयाविरोधात ९० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात दाद मागता येणार आहे. १२ वर्षांहून अधिक काळ एखाद्या व्यक्तीकडे वक्फच्या जमिनींचा ताबा असेल किंवा त्याने त्यावर अतिक्रमण केलं असेल तर ती व्यक्ती या नव्या विधेयकाच्या आधारे त्या जमिनींचे मालक होऊ शकते.

## कोकाटेंकडून शेतकऱ्यांची माफी

राज्यातील शेतकऱ्यांची माफी मागीतली होती. त्यानंतर काल कोकाटे यांनी काळाराम मंदिरात जाऊन प्रभू श्री रामचंद्रांचे दर्शन घेतले प्रभू रामचंद्रांच्या चरणी लीन झाल्यानंतर काळाराम मंदिराबाहेर पत्रकारांशी बोलताना माणिक कोकाटे म्हणाले की शनिवारी शेतकऱ्यांशी चर्चा करत असताना जे वक्तव्य करण्यात आले होते ते चुकून करण्यात आले कोणाच्या भावना दुखण्याची इच्छा अजिबात नव्हती त्यामुळे कोणी गैरसमज करून घेऊ नये असे सांगून त्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत समस्त शेतकरी बांधवांची माफी मागितलेली आहे. यानतर त्यांनी अन्य कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास स्पष्टपणे नकार दिला.

## किमान तमीळमध्ये सही तरी करा

हा पूल आता नवीन रूपात तयार आहे.या पुलाचे वैशिष्ट्य म्हणजे या पुलावरून जहाजेही जाऊ शकतात. या पुलाची लांबी २.०८ किलोमीटर आहे. १८.३ मीटर लांबीचे ९९ स्पॅन आणि १७ मीटर उंचीपर्यंत वाढणारा ७२.५ मीटरचा उभ्या लिफ्ट स्पॅन आहेत. नवीन पांबन पूल जुन्या पुलापेक्षा ३ मीटर उंच आहे. यामुळे मोठ्या जहाजांना मोठ्या पाण्यातून जाणे सोपे होईल आणि रेल्वे वाहतूक अखंडित होईल. द्रमुक सरकार हिंदी लागू करू इच्छित नाही. तामिळनाडू सरकार गेल्या दोन महिन्यांपासून नवीन शिक्षण धोरणांतर्गत राज्यात त्रिभाषा धोरण लागू करण्यास विरोध करत आहे. या धोरणांतर्गत, तमिळ आणि इंग्रजी व्यतिरिक्त हिंदी भाषेचा शिक्षण माध्यम म्हणून समावेश करण्याचा प्रस्ताव आहे. द्रमुक प्रमुख आणि मुख्यमंत्री स्टॅलिन याचा विरोध करत आहेत. पंतप्रधान म्हणाले- कधीकधी, जेव्हा मला तामिळनाडूच्या काही नेत्यांकडून पत्रे येतात तेव्हा मला आश्चर्य वाटते. कोणताही नेता कधीही तमिळ भाषेत सही करत नाही. तमिळ भाषेचा अभिमान बाळगा, किमान तमिळमध्ये तरी सही करा. पंतप्रधान म्हणाले- आज जगात भारताबद्दल आकर्षण वाढले आहे. लोकांना भारतात यायचे आहे, भारताला समजून घ्यायचे आहे. तमिळ भाषा आणि वारसा जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. सरकार यासाठी प्रयत्न करत आहे. २१ व्या शतकात ही महान परंपरा आणखी पुढे नेली पाहिजे असे मला वाटते. मला विश्वास आहे की रामेश्वरम आणि तामिळनाडूची ही भूमी आपल्याला नवीन प्रेरणा देत राहील.

# चांदवडमध्ये श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

**चांदवड : वार्ताहर**

येथील श्रीराम रोडवरील पुरातन श्रीराम मंदिरात श्रीराम नवमी निमित्त रविवार, दिनांक ०६ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यानिमित्त, वे.शा.सं. डॉ. श्री प्रसाद महाराज भागवत (पुराणाचार्य, श्रीक्षेत्र पैठण) यांचे रविवार सकाळी ९:३० वाजता रामजन्म पर सुमधुर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर चांदवड-देवळा मतदारसंघाचे आमदार डॉ. राहुल आहेर यांचा ॲड. सचिन कुलकर्णी व सौ. कल्याणी कुलकर्णी यांच्या हस्ते श्रीरामाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या हस्ते महाआरती झाली.राम जन्म उत्सवाच्या कार्यक्रमासाठी हजारो भाविकांनी आणि महिलांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. श्रीराम मंदिराच्या गाभाऱ्याला ॲड. सचिन कुलकर्णी, किरण कुलकर्णी, तुषार जगताप, गोविंद बरदे, वैभव मेतकर व श्रीराम भक्त मंडळाच्या सदस्यांनी आकर्षक फुलांची सजावट केली होती. दरम्यान, मंदिराचा मुख्य उत्सव चैत्र गुढीपाडवा ते रामनवमी असा नऊ दिवसांचा चैत्र नवरात्र उत्सव होता. गुढीपाडव्याला श्रीरामांचा अभिषेक होऊन घटस्थापना झाली, तर दररोज सायंकाळी महिलांचा रामायण पठण कार्यक्रम होत होता. सायंकाळी सहा ते सात वाजेच्या सुमारास सामुदायिक रामरक्षा पठण आणि सायंकाळी सात वाजता महाआरती झाली. त्यानंतर श्रीराम मंडळाचे पुजारी किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली भजनाचा कार्यक्रम रंगला. चैत्र नवरात्रामध्ये मंदिरात मोठी गर्दी झाली होती.


**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे.
**संपर्क-९८६०१३६५३६**

--------------------

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे. श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

--------------------

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

--------------------

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

--------------------

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७** ९७६३७३२४२४

--------------------

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

MATUNGA (EAST), NEAR VJTI COLLEGE/ ITC INSTITUTE/DON BOSCO SCHOOL. 2BHK 700' to 1000'/ 3 BHK 950' to 1350'. 4BHK 1600' to 2000' – 9136655744, 9638387574.

**हरवले आहे**

प्रतिनिधीचे नाव कार्तिक कांबळे कर्मचारी आयडी - २४११३६००३२०१४२३ एजन्सीचे नाव - ashpa global services pvt. एचडीएफसी बँकेचे ओळखपत्र हरविले आहे तरी सदरील आयकार्ड कुणाला आढळून आल्यास कृपया **अभिजीत खरात** ९७३०२१७९०७ या क्रमांकावर संपर्क साधावा

**Lost & Found**

Representative Name Karthik Kamble Employee ID - 241136003201423 Agency Name - ashpa global services pvt. HDFC Bank Identity Card is lost but if anyone finds the said I Card please contact Abhijit Kharat on 9730217907

**Name changed**

I have changed my name from RAJENDRA Yadav KALE to **RAJARAM YADAV KALE**

--------------------

My Old Name Munir Ahmed Khan is a Change to My New Name **Munir Ahmed Khan Husain Khan Pathan** as per Aadhar

--------------------

My Old Name Nadira Khatoon Khan is Change to My New Name **Nadira Khatoon Pathan** as per Aadhar

--------------------

My Old Name Parveen ShabbirAli is Change to My New Name **Parvin Begum Shabbir Ali** as per Aadhar

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**



**टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस**

तमांम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन:** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे आगर टाकळी** या गांवचे शिवारातील भुमापन क्रमांक व उपविभाग २१/२/१ मधील **प्लॉट नंबर १**, यांसी **क्षेत्र ५५८.९५० चौ. मी.** भुमापन क्रमांक व उपविभाग ३१/२, **प्लॉट नंबर २ यांसी क्षेत्र ५५५,६६० चौ. मी..** भुमापन क्रमांक व उपविभाग ३१/२, **प्लॉट नंबर ३ यांसी क्षेत्र ५५५.६६० चौ. मी.,** भुमापन क्रमांक व उपविभाग ३१/२, **प्लॉट नंबर ४ यांसी क्षेत्र ५५५.६६० चौ. मी.** या प्लॉट मिळकतींवर बांधकाम करण्यात आलेली **दत्तप्रसाद बिल्डींग नंबर १** मधील फ्लॅट मिळकती खालीलप्रमाणे :- अ. **फ्लॅट नंबर १२,** दुसऱ्या मजल्यावरील यांसी चटई क्षेत्र **३८.५६ चौ. मी.** व बांधीव **क्षेत्र ४८.३२ चौ. मी. म्हणजेच ५२०.०० चौ. फुट.** यांसी चतुः सिमा मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे, व. **फ्लॅट नंबर १३** दुसऱ्या मजल्यावरील यांसी **चटई क्षेत्र ३९.९६ चौ. मी.** व बांधीव **क्षेत्र ५०.१८ चौ. मी. म्हणजेच ५४०.०० चौ. फुट.** यांसी चतुः सिमा मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे. वर नमूद केलेल्या फ्लॅट मिळकती हया **सौ. मनोरंजना प्रशांत साठे मे. एम. एस. कॉन्ट्रॅक्टर ॲण्ड डेव्हलपर्स** यांच्या स्वकष्टार्जित खरेदी मालकीच्या मिळकती असून, त्यांचे कब्जा वहिवाटीतील आहे. सदर मिळकती हया निर्वेध व बिनबोजाची आहे असे मिळकत मालकांचे म्हणणे आहे. सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशन कामी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. सबब, सदरच्या मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, करार, मदार, बोजा, वाद असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ **(सात)** दिवसांचे आंत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती नोंदवाव्यात. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया निर्वेध व बिनबोजाच्या आहेत असे समजण्यात येईल व तसा दाखला देण्यात येईल.कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस.

**नाशिक, दिनांक : ३१/०३/२०२५** **सौ. मनोरंजना प्रशांत साठे**
**मे. एम. एस. कॉन्ट्रॅक्टर ॲण्ड डेव्हलपर्स**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. आनंद अशोक मोरे**
**चेंबर नंबर १५ मारुती चेंबर जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक. मो.नं. ८६२४०९९४६६**

**जाहीर नोटीस** नि.नं:६ प्रोसेस जमा **ॲड.श्री.राजेंद्र नारायण बागूल.**

**दि.चौ.अर्ज नंबर १०७/२०२५**
**नाशिक येथील मे. सिव्हील जज्ज सो. सि. डि. नाशिक यांचे कोर्टात.**
**श्री. संदीप बाळकृष्ण मेटकर, वैगेरे** **अर्जदार**
**विरूध्द**
**कोणी नाही** **सामनेवाला**
**अर्ज. वारसा मिळणेसाठीचा दाखला लिगल हेअरशिप प्रमाणपत्र**

ज्याअर्थी अर्जदार नंबर १ ते ४ यांची आई नामे **सावित्रीबाई बाळकृष्ण मेटकर** यांचे नाशिक येथे घरीच वृध्दापकाळाने **दिनांक २०/११/२०२४** रोजी मयत झाली आहे. मयताचे नावे पवनगर, सवितानगर सिडको, नाशिक येथील **घर मिळकत नंबर एन/४२/व्ही/अे/१/०२/०८** अशी मिळकत आहे. अर्जदार यांनी शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादीत सिडकोचे प्रशासन/प्रशासक यांचे कार्यालयात जावून प्रशासकाकडे अगर संबंधीत आधिकारी यांचेकडे मयत आई नामे **सावित्रीबाई बाळकृष्ण मेटकर** हिचे नाव कमी होवून वरील मिळकती सदरी अर्जदारांची नांवे मयताचे कायदेशीर वारस म्हणून दाखल होण्यासाठी अर्ज केला असता अर्जदारांनी मे. कोर्टाकडून वारस दाखला घेवून येणेस सांगितले. त्यामुळे अर्जदारांनी वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज हा या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार यांना वारस दाखला देण्यास कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात **दिनांक ०६/०५/२०२५** रोजी **सकाळी ११.०० वाजता** स्वत अगर वकिलांमार्फत हजर राहून लेखी म्हणणे दयावे. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांना तसा वारस दाखला देण्यात येईल. कळावे ही जाहीर नोटीस.

**नाशिक दिनांक ५/०४/२०२५**

**सही/-सहाय्यक अधीक्षक** **सही/-अधीक्षक जिल्हा न्यायालय, नाशिक** (शिक्का)

**जाहीर नोटीस** नि.नं:७ प्रोसेस जमा **श्री. राजेंद्र नारायण बागुल.**

**जा.नं. ८६०/२५ दि. ५/४/२०२५, वारस.चौ.अर्ज. नंबर ३८/२०२५.**
**सटाणा येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्यु.. डि. यांचे कोर्टात.**
**श्री. गोविदा येसा बच्छाव, वैगेरे.** **अर्जदार.**
**विरूध्द्**
**कोणी नाही** **सामनेवाला**
**अर्ज- वारसा दाखला लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेसाठीचा.**

ज्याअर्थी अर्जदार नंबर १ ते ५ यांचे वडील नामे **येसा देवाजी बच्छाव** यांचे **मौजे फुलेमाळवाडी**. ता. देवळा जि.नाशिक. घरीच वृध्दापकाळाने **दिनांक ०८/०६/१९८९** रोजी मयत झालेले आहेत. मयताचे नावे **फुलेमाळवाडी** येथील **गट/शेत मिळकत नंबर ३८२** अशी मिळकत आहे. अर्जदार यांनी मे. तलाठी सो. फुलेमाळवाडी. ता. देवळा.जि.नाशिक यांचेकडेस **दिनांक २२/१/२०२५** रोजी मयत वडील नामे **येसा देवाजी बच्छाव** यांचे नाव कमी होवून मिळकत **गट नंबर ३८२** संदर्भात वारस चौकशी होवून अर्जदारांचे नाव सदरील मिळकतीस कायेदशीर वारस म्हणून नाव लावणे कामी अर्ज केला असता मे. तलाठी यांनी अर्जदारांना **दिनांक २८/१/२०२५** रोजी लेखी कळवून अर्जदारांनी मे. कोर्टाकडून वारस दाखला घेवून येणेस सांगितले. त्यामुळे अर्जदारांनी वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज हा या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार यांना वारस दाखला देण्यास कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी मे.कोर्टात **दिनांक ९/०५/२०२५** रोजी **सकाळी ११.०० वाजता** स्वत अगर वकिलांमार्फत हजर राहून लेखी म्हणणे द्यावे. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांना तसा वारस दाखला देण्यात येईल. कळावे ही जाहीर नोटीस.

**सटाणा दिनांक, दि.५/४/२०२५**

**सही/-सहाय्यक अधीक्षक** **सही/-सहाय्यक अधीक्षक न्यायालय, सटाणा** (शिक्का)

**जाहीर नोटीस** नि.नं:०६ प्रोसेस जमा **शिवाजी वामनराव गायकवाड, (ॲडव्होकेट)**

**दिवाणी चौकशी अर्ज न.१३-२०२५**

**दिंडोरी येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर नाशिक यांचे न्यायालयात**

**१.श्रीमती. यमुना मनोहर दळवी**, वय-५८, धंदा-घरकाम, **२.श्री.चंद्रशेखर मनोहर दळवी**, वय-३७,धंदा- शेती, **३.श्री.विशाल मनोहर दळवी**, वय-३६, धंदा-शेती सर्व रा.मोहपाडा, ता.सुरगाणा, जि.नाशिक **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही.** **सामनेवाले**
**अर्ज: बॉम्बे रेग्युलरेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये... वारस दाखला मिळणेबाबत..**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मनोहर भवान दळवी** हे **ता.०६/०३/२०२५** रोजी मोहपाडा, ता, सुरगाणा, जि. नाशिक येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यू पश्चात ते नोकरी करीत असलेले फॉरेस्ट खात्याकडून मिळणारी सेवानिवृत्ती वेतन अर्जदार नं.१ ला मिळणेकामी तसेच अन्य शासकिय लाभ मिळणेकामी अर्जदार यांनी **मनोहर भवान दळवीचे** मृत्यू पश्चात अर्जदार हे कायदेशिर वारस आहे,असा वारस दाखला मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जदारांना ते मयत **मनोहर भवान दळवी** यांचे कायदेशिर वारस आहेत असा वारस दाखला अर्जदारास देणेबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी स्वतःअगर वकीलामार्फत **ता. ०७/०५/२०२५** रोजी **सकाळी १०.३० वाजता** या न्यायालयात उपस्थितीत राहून म्हणणे मांडाव. आपण हजर राहीला नाही. अथवा कोणाचीही हरकत आली नाही तर सदरचे अर्जदारांना त्यांचे मागणीप्रमाणे, वारस दाखला देणेस कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदरचे वारस दाखल्याबाबत आवश्यक ते हुकुम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. आज **दि. ०५/०४/२०२५** रोजी मे.न्यायालयाचे आदेशान्वये व शिक्क्यानिशी दिली असे.

**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, दिंडोरी** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक कनिष्ठ स्तर, दिंडोरी**

## महत्त्वाचे

### ॲड.सुनील बोराडे यांचा सत्कार



**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या जनता विद्यालयात शालेय समितीचे अध्यक्ष ॲड.सुनील बोराडे यांची पुणे येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद संस्थेच्या नियमक मंडळावर नाशिक विभागातून नियुक्ती करण्यात आली. त्यांचा शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली उकिरडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शालेय समिती सदस्य नामदेव आढाव यांचे चिरंजीव शिवम आढाव यांने चार्टर्ड अकाउंटंट (सी. ए.) परिक्षेत प्रथम प्रयत्नात यश मिळवल्याबद्दल त्यांचाही कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड बोराडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षिका कटाळे एस. एस. यांची जनता विद्यालय गांधीनगर येथे. पर्यवेक्षक पदावर पदोन्नतीबद्दल शालेय समितीच्या वतीने सत्कार केला. प्रमुख पाहुणे म्हणून तानाजी पाटील आरिंगळे, शालेय समिती सदस्य नामदेव आढाव, वसंतराव बोराडे, साहेबराव बोराडे, जयप्रकाश गायकवाड, प्रकाश बोराडे, ॲड शरद आढाव, शंकरराव बोराडे,कैलास बोराडे तसेच पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष ज्ञानदेव चोपडे साहेब, माता पालक संघाच्या सदस्य आदीसह उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खैरनार व आभार पगार यांनी मानले.

### म्हसरुळ येथे सभा मंडपाचे लोकार्पण



**पंचवटी :** आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या याहा मोगी कणसरा माता ठाण, बोरगड म्हसरूळ येथील मंदिर परिसरात ५० लक्ष रुपये खर्च करून भव्य सभा मंडप उभारण्यात आला.या मंदिराची मूर्ती स्थापना व सभा मंडपाचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नामदार नरहरी झिरवाळ यांच्या शुभहस्ते पार पडला. आमदार अँड.राहुल ढिकले पोलिस उपायुक्त मुख्यालय वाहतूक चंद्रकांत खांडवी माजी महापौर रंजना भानसी माजी गटनेते अरुण पवार भाजपा शहर सचिव अमित घुगे, राहुल पवार माजी नगरसेवक वसंतराव मोराडे, एन.डी. गावित आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.मंदिराच्या कलशाचे पूजन आमदार अँड. राहुल ढिकले यांच्या हस्ते झाले दिनांक पाच व सहा एप्रिल २०२५ दरम्यान हा सोहळा संपन्न झाला यावेळी मांडव, मिरवणूक, तेलवण, ढाकवादन तसेच पूर्वजांची आळवणी, याहामोगी कणसरा माता प्रतीकाची स्थापना व कलश, ध्वजारोहण, पुष्पांजली आणि सभामंडप लोकार्पण झाल्यानंतर महाप्रसाद संपन्न झाला. यशस्वीतेसाठी माजी महापौर रंजना भानसी रमेश भोये, दत्तोबा साबळे, पोपटराव भानसी, राहुल गावित, अतुल भानसी, गणेश आहेर, ललित राऊत, मनोज झिरवाळ, मनोज पवार, किरण महाले, दुर्वदास गायकवाड, पांडुरंग गायकवाड, मोतीराम चव्हाण, सचिन पवार आदींनी परिश्रम घेतले.

### भारती ताजनपुरे यांची नियुक्ती

**नाशिक :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नाशिक



ज़िल्हातील संघटन अधिक मजबूत करण्यासाठी व येत्या काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत पक्षाला नावीन्यपूर्ण यश मिळवण्याच्या दृष्टीने खा. संजय राऊत यांच्या आदेशानुसार ज्येष्ठ शिवसैनिक, माजी सभापती भारती ताजनपुरे यांची नाशिक ज़िल्हा कोअर कमिटी सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. नाशिक ज़िल्हातील ग्रामीण व शहरी भागात ताजनपुरे कुटुंबाच गेल्या ३०-३५ वर्षापासून पक्षाकरिता मोठे योगदान दिले आहे. त्याचे पती अंबादास ताजनपुरे याची शहरी भागातील कार्य व त्याचे चिरंजीव युवासेना ज़िल्हाप्रमुख राहुल ताजनपुरे यांचा ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात जन-संपर्क आहे. या निवडीमुळे पक्षाच्या पडझडतीच्या काळात व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये त्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल असेही मत सद्या व्यक्त करण्यात येत आहे.

### मानवसेवा वृद्धाश्रमात शांतीचा धम्म संदेश

**सिडको :** प्रियदर्शी सम्राट अशोका वेल्फेअर फाऊंडेशनच्या



वतीने सम्राट अशोक जयंती महोत्सव आज मानवसेवा केअर सेंटर वृद्धाश्रमात साजरा करण्यात आला.याप्रसंगी सम्राट अशोक यांच्या धम्मविचारांवर आधारित जीवनकार्याचा, गौरव करत, कार्यक्रमातून करुणा, समता, अहिंसा आणि शांततेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद सदस्य व इगतपुरी तालुक्याचे गोरख बोडके आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यश शिंदे यांनी आपल्या भाषणातून दिला.सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका ललिता नवसागर यांनी प्रस्तावना सादर करत संस्थेच्या नावामागील प्रेरणा स्पष्ट केली. आपले संपूर्ण आयुष्य लोककल्याणासाठी समर्पित करणाऱ्या त्यांच्या कार्याची प्रेरणा घेतच आमच्या संस्थेचे नाव 'प्रियदर्शी सम्राट अशोका वेल्फेअर फाऊंडेशन' ठेवण्यात आले असल्याचे नवसागर यांनी सांगितले. रमेश मसुरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. संस्थेचे उद्दिष्ट तेजस नवसागरनी मानले भगवान सावंत, शेख खलील, कृष्णा गव्हाणे, ईश्वर गव्हाणे, आदित्य दोंदे, तसंच रूपेश नवसागर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते

# नाशकातील शिवसैनिक जागेवरच : खा.संजय राऊत

## पक्षप्रमुख उद्धव ठाकरे १६ मे रोजी नाशिकमध्ये शिवसैनिकांशी संवाद साधणार

**नाशिक : प्रतिनिधी**

**गेल्या तीन चार महिन्यांपासून हा तिकडे चालला तो तिकडे चालला अशा अफवा शिवसेनेच्या बाबतीत उठवल्या जात आहेत.उद्धव ठाकरे व संजय राऊतही चाललेत एवढीच अफवा उठवणे बाकी आहे. अशा बातम्या येत असल्यातरी नाशकातील शिवसैनिक हा जागेवरच आहे.संघर्ष करत घाव झेलत आहे. अशी स्थिंती तर बाळासाहेबांनीही बघितली आहेत. त्यामुळे आता चर्चा न करता पक्ष मजबुतीसाठी सर्वांनी १६ तारखेला होणाऱ्या मेळाव्यातून आपली ताकद दाखवून द्या असे आवाहन शिवसेना नेते खा.संजय राऊत यांनी केले.**




येत्या १६ तारखेला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे नाशिकमध्ये येणार असून ते शिवसैनिकांशी संवाद साधणार आहेत.त्या मेळाव्याच्या पार्श्वभुमीवर शिवसेना कार्यालयात शिवसैनिक व पदाधिकाऱ्याना मार्गदर्शन करताना खा.राऊत बोलत होते. व्यासपीठावर उपनेते सुनिल बागुल, सुधाकर बडगुजर, अद्वय हिरे, अशोक धात्रक, संपर्क प्रमु जयंत दिंडे, खा.राजाभाऊ वाजे, सह संपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, राज्य संघटक विनायक पांडे, जिल्हाप्रमुख डी.जी. सूर्यवंशी, नितीन आहेर, गणेश धात्रक, कृणाल दराडे, महानगरप्रमुख विलास शिंदे, वसंत गीते, आनिल कदम, लोकसभा प्रमुख बाळासाहेब पाठक, उपजिल्हा प्रमुख केशव पोरजे, महेश बडवे, सचिन मराठे, कृलदिप चौधरी, मामा राजवाडे, दिलीप मोरे, युवासेना जिल्हाधिकारी राहूल ताजनपुरे, भाविसे जिल्हा संघटक वैभव ठाकरे, बागलान संपर्कप्रमुख विकास गिते, शिवसेना पदाधिकारी राहूल दराडे, संजय चव्हाण, आजिम सैय्यद, मसूद जिलानी, संजय थोरवे, नितीन जाधव आदी उपस्थित होते.

संजय राऊत पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीच्या वेळेस नाशिक जिल्ह्यातील जागा शिवसेना व आघाडीचे उमेदवार जिकणार असा जनतेचा कौल होता. त्यामुळे जिल्ह्यातील जागांसाठी खेचाखेची सुरू होती. सुधाकर बडगुजर व वसंत गिते हे ए प्लस मध्ये होते. त्यांचे काम चांगले होते पण यश आले नाही याची कारणे आहेत. मात्र आता यातून बाहेर पडावे लागणार आहे.पुन्हा उभारी घ्यावी लागणार आहे. कारण नेते हातपाय गाळतात शिवसैनिक कधीच हातपाय गाळत नाही. आपल्या मताच्या चोऱ्या झाल्यात. आपल्यात भ्रम निर्माण करण्याचे काम केले गेले. त्यामुळे आता सावध होण्याची वेळ आली आहे, असेही राऊत म्हणाले.

भारतीय जनता पक्षाकडून गरिबांचा कैवारी म्हणून प्रचार केला जात असला तरी भाजप हा कधीच गरिबांचा कैवारी नाही. हा पक्ष केवळ पैशासाठी काम करतो. ते पैशाच्या जोरावरच निवडून आलेले आहेत. असे सांगत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आंदोलन सुरू करण्याचे मनसेसैनिकांना सांगितले आणि अवघ्या २४ तासात आंदोलन मागे घेतले. त्यांच्या लोकांनी कोणाला मारले तर वॉचमनला. राज ठाकरे आज जे आदोलन करत आहेत हे आंदोलन बाळासाहेबांनी सुरू केले आहे .त्यावेळी आम्ही वॉचमनला नाही तर चेअरमनला मारले त्यामुळे आज एअर इंडियात जय महाराष्ट्राचा नाद घुमतो आहे. असेही राऊत म्हणाले.

येत्या १६ तारखेला शिवसैनिकांचा होणारा मेळावा हा पुढच्या राजकीय कारकीर्दीसाठी महत्वाचा आहे. सर्वात चंचल काय असेल तर ते राजकारण आहे. कधी कोण आयाराम व गयाराम होईल याचा काही विश्वास नाही.त्यामुळे आता शिवसैनिकांनी तयार रहावे, नाशिक कायम शिवसेनेचच राहणार आहे असा विश्वास राऊत यांनी शेवटी व्यक्त केला.

यावेळी उपनेते सुधाकर बडगुजर, खा. राजाभाऊ वाजे, जिल्हाप्रमुख डी.जी. सूर्यवंशी यांनीही मार्गदर्शन केले. बैठकीचे प्रास्तविक महानगरप्रमुख विलास शिंदे यांनी केले

# भाजपाचा पद्मनाभ मंदिरातील सोन्यावर डल्ला मारण्याचा डाव

## हर्षवर्धन सपकाळ: काँग्रेस कार्यकर्ता मेळावा

**नाशिक : प्रतिनिधी**

वक्फ सुधारणा विधेयक पास करून जमीन ताब्यात घेण्याचा भाजपा सरकारचा प्रयत्न असला तरी त्याआडून पद्मनाभ मंदिरातील प्रचंड मोठ्या प्रमाणात असलेल्या सोन्यावर त्यांना डल्ला मारायचा आहे. त्यासाठीच हा सर्व खेळ सुरु असल्याची घणाघाती टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर केली आहे.

सपकाळ यांनी नाशिक दौऱ्यात काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळावा काँग्रेस भवन येथे घेतला.

सपकाळ म्हणाले की, देशात महागाई प्रचंड वाढलेली आहे, मराठी शाळा बंद होत आहेत, रोजगार नाहीत पण केंद्र सरकारने एक खेळणे हाती दिले असून आपण हातावर हात ठेवून पहात बसलो आहोत ते म्हणजे



वक्फ बोर्ड. इंग्रजांनी दिल्लीत राजधानी वसवण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी भू संपादन करताना प्रार्थनास्थळे सुरक्षित रहावित अशी मागणी झाली, त्यासाठी १९१३ साली पुनर्वसनासाठी बनवलेल्या कायद्यातून वक्फ बोर्ड बनले. सर्व धर्मियांची प्रार्थनास्थळे सुरक्षित रहावीत यासाठी ते बनवले होते, त्यात मंदिर, मशिद, गुरुद्वारा यांना विशेष अधिकार दिले होते. यावेळी प्रदेशाध्यक्षांसोबत खा. डॉ. शोभाताई बच्छाव, नाशिक शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष आकाश छाजेड, माजी आ. शिरीष कोतवाल, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष गणेश पाटील, शरद आहेर, राजाराम पानगव्हाणे, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस व नाशिकचे प्रभारी ब्रीज दत्त यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोरटकर, सोलापूरकरवर कारवाई करा

छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या राहुल सोलापुरकरच्या घराला पोलीस संरक्षण दिले जाते, प्रशांत कोरटकरनेही महाराजांचा अपमान केला आता त्याच्यावर कारवाईचे नाटक सुरु आहे पण या प्रवृत्तींना कोणाचे पाठबळ आहे ते सर्वांना माहित आहे. आता भाजपाचा कोणी केंद्रीय मंत्री रायजगडाला भेट देणार आहे असे समजले. भाजपाला जर खरेच छत्रपतींबद्दल अभिमान असेल तर कोरटकर, सोलापुरकरवर कठोर कारवाई करा आणि 'बंच ऑफ थॉट'वर बंदी घाला, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

# तेजोदीप नवविचार फाउंडेशनतर्फे भव्य रोजगार मेळावा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

तेजोदीप नवविचार फाउंडेशन तर्फे ११ एप्रिल रोजी सकाळी ९ वा.रोजगार मेळाव्याचे आयोजन व १२ एप्रिल रोजी उद्योग, व्यवसाय, करियर मार्गदर्शनाचे आयोजन भोळे मंगल कार्यालय, शुभम पार्क, नवीन नाशिक येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश नेहते यांनी दिली. रोजगार मेळाव्यात नाशिक, पुणे, मुंबई ,छत्रपती संभाजी नगर येथील पन्नासहून अधिक कंपन्या सहभागी होणार आहेत. बँक, ऑफिस, सुपरवायझर, हेल्पर, डिलिव्हरी बॉय, मशीन ऑपरेटर, प्रोडक्शन सुपरवायझर, ट्रेनिं, क्वालिटी कंट्रोल, बँकिंग, अकाउंट, डाटा एन्ट्री ,ज्युनिअर इंजिनिअर, टीम लीडर, सर्विसेस, नर्सिंग हाऊस, कीपिंग, लॉजिस्टिक, आयटीआय सर्व ट्रेड, दहावी, बारावी सर्व प्रकारचे तसेच डिप्लोमा सर्व फॅकल्टीज ,पदवीधरांसाठी या मेळाव्यातून रोजगार उपलब्ध होण्याची संधी मिळणार आहे . या संदर्भात डोळे जळगाव भागातील तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली असून नाशिक येथेही जनजागृती करण्यात आली आहे. १२ एप्रिल ला स्टार्टअप म्हणजे काय. मार्केट रिसर्च कशी करावी. फंडिंग कशी मिळवता येते ,महिला स्वयंरोजगार संधी, उद्योग संबंधित सरकारी योजना, बँकांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा, याबाबतीमध्ये करिअर मार्गदर्शन सकाळी नऊ ते पाच वेळेत उपलब्ध करून देण्यात आलेले असून जास्तीत जास्त युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# अंबडमधील चोरी उघडकीस; युनिट दोनची कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

गेल्या आठ दिवसांपुर्वी अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या जनावरांच्या चोरीचा गुन्हा गुन्हे शाखा युनिट-२ ने उघडकीस आणत दोन चोरट्यांना अटक केली असून, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली अंदाजे ७ लाख रुपये किंमतीची चारचाकी गाडी जप्त करण्यात आली आहे.

नाशिक शहरात वाढत असलेल्या जनावरांच्या चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कठोर पावले उचलण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट २ चे अधिकारी व कर्मचारी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत असताना, सपोउनि. सुहास क्षिरसागर यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, काही दिवसांपूर्वी अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीतून शेळ्या व बोकड चोरी करण्यात आले होते. संबंधित आरोपी सध्या बालभारती, लेखानगर, इंदिरा गांधी वसाहत परिसरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर युनिट-२ च्या पथकाने तत्काळ कारवाई सुरु केली. सपोनि. हेमंत तोडकर (प्रभारी अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली सपोउनि. सुहास क्षिरसागर, प्रेमचंद गांगुर्डे, पोहवा संजय सानप, चंद्रकांत गवळी, पो.अं. प्रविण वानखेडे, चा.पो.अं. सुनील खैरनार आदींनी लेखानगर परिसरात सापळा रचून पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीसह दोन इसमांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे तोहिद उर्फ अमन आतीष खाटीक, वय २३ वर्षे, रा. एन-९ पीजी, लेखानगर, सिडको व मनी बहादुर रामजस यादव, वय ३८ वर्षे, रा. हनुमान चौक, शिवाजी चौक नाशिक अशी सांगितली. दोन्ही आरोपींनी पोलिसी तपासात गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी काही दिवसांपूर्वी अंबडगाव येथील एजन्सीच्या शेडलगत असलेल्या रस्त्यावरून शेळ्या व बोकड चोरून स्विफ्ट गाडीत टाकून चोरी केल्याची माहिती दिली. आरोपींच्या कबुलीच्या आधारावर गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची स्विफ्ट गाडी (अंदाजे किंमत ७,००,००० रुपये) जप्त करण्यात आली.या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंदुकीचा धाक दाखवत हॉटेल व्यावसायिकाचे एक कोटींच्या खंडणीसाठी अपहरण

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिकमधिल हॉटेल व्यवसायिक निखिल दर्यानानी यांचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या भागीदाराकडून १५ लाख रुपयांची खंडणी घेतली. विशेष बाब म्हणजे निखिल यांच्याच गाडीमध्ये बंदुकीचा धाक दाखवून त्यांचे अपहरण करण्यात आले. नाशिकच्या काठे गल्ली सिग्नलवर ही घटना आहे. पैसे दिल्यानंतर निखिल हे स्वतः अपहरणकर्त्यांच्या ताब्यातून पळाले. त्यांनी संपूर्ण घटनेची माहिती मुंबईनाका पोलिसांना दिली. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली.

नाशिकमध्ये एका मोठ्या जबरी चोरीच्या प्रकरणात तीन अनोळखी व्यक्तींनी एका युवकाला बंधक करून त्याच्याकडून मोठ्या रकमांची मागणी केली. ५ एप्रिल २०२५ रोजी रात्री १२:४८ वाजता या प्रकरणी निखील प्रदीप दर्यानाणी (वय २७, रा. टाकळी रोड, नाशिक) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, ४ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३:१५ वाजता फिर्यादी त्यांची क्रेटा कार (क्रमांक एम एम १६ सी ई २०२० )घेऊन काठे गल्ली सिग्नल, पुणे-नाशिक रोड येथून जात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या कारचे खिडकीला टकटक करून बोलायचे आहे असे सांगितले. ते कारमध्ये बसले आणि त्यांना नासर्डी नदीवरील पुलाजवळ आणून बंदुक दाखवून त्यांना मारून टाकण्याची धमकी दिली. या धमकीनंतर त्यांच्याकडून १ कोटी रुपये मागितले.

फिर्यादीला तात्काळ मुंबई हायवेवर घेवून जात असताना, तिथे त्यांच्या एका साथीदाराने बलेनो कारमध्ये येऊन फिर्यादीच्या क्रेटा कारला जबरदस्तीने घेवून गेला. नंतर त्यांना कळसुबाई शिखरकडे घेऊन जात असताना गाडीच्या खाली उतरवून हवेत आणि जमिनीवर दोन गोळ्या फायर करून त्यांना धमकावले. पुढे, फिर्यादींनी घाबरून त्यांच्या भाऊ नवीन यास पंधरा लाख रुपये देण्यास सांगितले. यानंतर आरोपींनी पंधरा लाख रुपये घेतल्यानंतर, फिर्यादीला मारुती सुझुकी शोरुमच्या जवळ आणले आणि तेथे फिर्यादीने संधी साधून त्यांची तावडीतून सुटका केली. आरोपींनी पंधरा लाख रुपये आणि क्रेटा कार चोरल्याने, फिर्यादी यांनी या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार केली आहे. याबाबत पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास पुढील तपास मुंबई नाका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# सटाण्यात रामनवमी उत्सव उत्साहात साजरा

**सटाणा : प्रतिनिधी**

पिंपळेश्वर रोड मित्र मंडळाच्या वतीने श्री रामनवमी निमित्त भगवान श्री प्रभू रामचंद्र जन्मोत्सव सोहळा पार पडला. गावातील प्रमुख रस्त्यावरून भजनी मंडळ टाळ मृदुंगाच्या गजरात व डीजेच्या तालावर शोभायात्रा काढण्यात आली. शहरातील सर्व भाविक मोठ्या संख्येने यात्रा मिरवणुकीत सहभागी झाले होते.

पिंपळेश्वर रोड मित्र मंडळ व भाविक एकत्र येऊन प्रभू श्री राम मंदिरापासून सजविलेल्या रथाद्वारे प्रभू श्री रामचंद्रांची प्रतिमा सजीव देखावा सादर करण्यात आला. या सजीव देखाव्याची परिसरातून शोभायात्रा व भव्य मिरवणूक काढण्यात आली.

शहरातील नाशिक नाका, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून पोलीस चौकी, चावडी चौक, महालक्ष्मी मंदिर, देव मामलेदार यशवंतराव महाराज मंदिर, कॅन्टन चौक, बस स्टॅन्ड चौफुली, या प्रमुख मार्गावरून टाळ मृदुंगाच्या गजरात व डीजेच्या तालावर रामनामाच्या गजरात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत ही मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणूकीत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस निरीक्षक बाजीराव पोवार, व पोलीस कर्मचारी यांनी कडक बंदोबस्तात ठेवला होता.

# अभिनव बालविकास मंदिरमध्ये प्रमाणपत्र वाटप

**सिडको :** मविप्र समाज संचलित उत्तमनगर येथील अभिनव बालविकास मंदिरमध्ये कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांची जयंती प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

यानिमित्त कबबुलबुलच्या गोल्डन ॲरो परीक्षेतील २८ मुले व २८ मुली या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सर्वप्रथम मुख्याध्यापिका ज्योती पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. उपशिक्षिका सीमा शेवाळे यांनी डॉ. वसंतराव पवार यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. उपशिक्षक मनोहर गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी नीलिमा बच्छाव, अर्चना आहेर, सारेखा चौधरी, आशा अहिरे, गायत्री काकडे, दिपाली बागुल, वैशाली घोटेकर, शितल सोळुंके उपस्थित होते.

# नाशिक मनपावर राष्ट्रवादीचा झेंडा फडकविण्यासाठी सज्ज व्हा

## सभासद नोंदणी प्रसंगी रंजन ठाकरेंचे आवाहन

**नाशिकरोड : वार्ताहर**



आगामी महापालिकेच्या निवडणुकीत सत्ता आणण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घरोघरी जावून सभासद नोंदणी करावी. नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी संघटीत प्रयत्न करावे. नाशिक महापालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकवायचा आहे याची सर्वांनी खुणगाठ बांधुन जोमाने कार्यरत व्हावे असे आवाहन शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांनी केले.

बिटको चौकात राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) पक्षाच्या वतीने सभासद नोंदणी व पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र वाटपाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पक्षाच्यावतीने नवीन सभासद नोंदणी करण्यात आली. पक्षाची संघटना बांधणी त्याचबरोबर मनपा क्षेत्रातील नागरिकांच्या समस्या, ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, दररोज सरासरी एक खुन होत आहे. त्यामुळे नागरीक दहशतीखाली वावरत आहेत. नागरिकांना दिलासा देण्यासाठी कार्यकर्त्यांनी संघटीत प्रयत्न करण्याची गरज आहे असेही यावेळी विचार मांडण्यात आले.


पक्षाचे ज्येष्ठ नेते निवृत्ती अरिंगळे, शहर सरचिटणीस संजय खैरनार, अंबादास खैरे, माजी नगरसेवक जगदिश पवार, सुरेखा निमसे यांनीही पक्ष संघटनेवर भर देणारे मार्गदर्शन केले. विभागीय अध्यक्ष मनोहर कोरडे यांनी प्रारंभी या मान्यवरांचे प्रास्तविकात स्वागत केले आणि सभासद नोंदणीला मिळत असलेला प्रतिसाद कथन केला. यासाठी विक्रम कोठूळे, प्रा.राकेश कांबळे, वसंत अरिंगळे, विनोद देशमुख, प्रशांत वाघ, दिलीप भोसले, चैतन्य देशमुख, शंकर मंडलिक, संजय बोडके, रुपाली पठारे, नलिनी नाठार, रेखा बर्वे, अंजु तांजवडकर, नुरनिसा शेख, अर्पणा जाधव, बाळासाहेब भालेराव, बाळासाहेब शिंदे, अय्यास शेख, राजेंद्र लहामगे, तुषार फडोळ, नियामत शेख, कैलास आल्हाट, प्रथमेश पवार, जमशेद वस्ताद, प्रकाश थामेत, स्वप्निल कासार, गौतम पगारे, सोनू वायकर, मंगेश लांडगे, आकाश वराडे, ताहीर शेख, पवन कोराटे आदींनी सभासद नोंदणीसाठी विशेष प्रयत्न केले. सायंकाळ पर्यंत १२०० प्राथमिक सदस्य व २०० क्रियाशील पक्ष सदस्यांची नोंदणी करण्यात आल्याचे मनोहर कोरडे यांनी सांगितले.

# विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात ३९ हजार मतदारांची वाढ

**नाशिक : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पाठोपाठ मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर केला होता.आगामी स्तानिक स्वराज संस्थेच्या निवडणूका होऊ घातलेल्या असल्याने या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर मतदार नोंदरीने गती घेतल्यचे दिसून येत आहे. विधानसभा निवडणूकानंतरच्या पाच महिन्यांमध्ये तब्बल ३९ हजार मतदारांनी नोंदणी केली आहे. या नोंदणीमध्ये १६,१५९ मतदाराला पुरुष असून २३,५२२ महिलांनी पुढाकार घेतला आहे. यात मोठ्या प्रमाणात शहर परिसरातून नोंदणीचा ओघ असल्याचे दिसून येत आहे.

मतदान जनजागृती अभियानांतर्गत मतदारांची नोंदणी करणे हा महत्त्वाचा भाग निवडणूक प्रशासनाने जनजागृतीची मोहीम हाती घेतली आहे. त्या अंतर्गत २० नोव्हेंबर २०२४ रोजी ५० लाख ६१ हजार १८५ मतदारांची नोंदणी होती. ४ एप्रिल २०२५ रोजी हीच संख्या ५१ लाख ८८३ एवढ्या मतदारांची नोंद झालेली आहे. यात ३९ हजार ६९८ मतदारांनी नाव नोंदणी



वाढल्याचे दिसून येत आहे

नाशिक पश्चिम मतदार नोंदणीत आघाडी घेतली असून,५ महिन्यांमध्ये १०,६२२ मतदारांनी नोंदणी केली आहे. त्या पाठोपाठ देवळाली विधानसभा मतदारसंघात ५,७६४ मतदार नोंदणी झाली आहे.

नाशिक मध्य मध्ये ३,०१३, निफाड मध्ये ३,२६८, नांदगाव मध्ये २,८६६, मालेगाव बाह्य मध्ये २,७८६, येवल्यात २,२०८, इगतपुरी २,११२, दिंडोरीत २,६८१, सिन्नर मध्ये १,७७८, चांदवड मध्ये १,७४३, मालेगाव मध्ये १,५१९ अशी मतदार नोंदणी झाल्याचे दिसून येत आहे. जिल्हातील तृतीय पंथी मतदारांच्या संख्येतही १७ ने वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

## महत्त्वाचे

### परसूल येथे न्याय मागणी आंदोलकाला मारहाण; १५ जणांवर गुन्हा दाखल

**चांदवड :** तालुक्यातील परसूल येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर झोपडी उभारून न्याय मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या एका व्यक्तीला मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी चांदवड पोलिसांनी १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. राजेंद्र विश्वनाथ खांगळ (रा. परसूल) यांनी यासंदर्भात चांदवड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. आपल्या फिर्यादीत खांगळ यांनी म्हटले आहे की, त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे दाखल असलेल्या खोट्या तक्रारी अर्जाची चौकशी व्हावी, तसेच परसूल गावातील हनुमान मंदिर जीर्णोद्धारासाठी जमा झालेल्या देणगी निधीचा हिशोब मिळावा, यासाठी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ताडपत्री लावून झोपडी बांधून शांततापूर्ण मार्गाने आंदोलन सुरू केले होते. दरम्यान, भागवत आवारे, संजय निकम, ज्ञानेश्वर बरकले, मच्छिंद्र ठोंबरे, दशरथ वाघ, राजेंद्र निकम, विक्रम निकम, परशराम निकम, रामदास चव्हाण, शिवाजी आवारे, सोपान बरकले, पुंडलिक आवारे, दीपक बरकले, हिरामण जाधव आणि अण्णा जयराम बरकले (सर्व रा. परसूल) या १५ जणांनी त्यांना फायटर रिंगने मारहाण केली. इतकेच नव्हे, तर आंदोलनासाठी उभारलेली झोपडी तोडून तिचे नुकसान केले आणि जीवे मारण्याची धमकी देखील दिली, असे खांगळ यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. चांदवड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### मयूर गोऱ्हेंची नौदलात निवड



**त्र्यंबकेश्वर :** तालुक्यातील माळेगाव येथील मयूर गंगाराम गोऱ्हे यांची भारतीय नौदलात निवड झाली आहे. मयूरने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले. त्याच्या या घवघवीत यशाचे तालुक्यात कौतुक होत आहे. लवकरच तो देशसेवेसाठी भारतीय नौदलात रुजू होणार आहे. मयूरचे वडील महसूल सेवक आणि आई अंगण वाडी सेविका आहे.मयूरच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्र्यंबकेश्वर येथील कैलास राजा वसाहतीतील राहिवासीनी मयूर आणि त्याच्या माता पित्यांचा सन्मान केला. यावेळी त्याचे वडील गंगाराम गोऱ्हे, आई सौ. मंदा गोऱ्हे, कॉलनीतील रहिवासी साऊथ फिल्म ॲक्टर धनंजय प्रभुणे,अनंत उपाध्ये, विवेक खैरनार, शरमाळे, सोनवणे, शिरसाठ, उमेश देवरे, भास्कर चोथे, शांताराम मुर्तडक, मंत्री, विलास सोमठानकर, अमित मोरे, कल्पेश घोडके, कैलास भोसले, रवी भोसले, मोरे, पवार, मुंढे, शिवा भाडमुखे आदी उपस्थित होते.

### प्रहारचे दत्ता आरोटे भाजपाच्या वाटेवर

**निफाड :** प्रहार विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता आरोटे यांनी नुकतीच भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख राहुल आरोटे यांची भेट घेतली. जिल्हाध्यक्ष म्हणून प्रहार संघटनेचे काम पाहणारे आरोटे हे लवकरच भाजपात जाणार असल्याची चर्चा आहे.



भाजपच्या कामगार जिल्हाध्यक्षपदी राहुल आरोटे यांची नुकतीच वर्णी लागली. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता आरोटे हे त्यांच्या भेटीसाठी गेले होते. पक्षांतर्गत किरकोळ वाद विवादामुळे आरोटे नाराज असल्याची ही चर्चा आहे. अशातच आगामी जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांच्या तोंडावर दत्ता आरोटे हे भाजपात प्रवेश करणार का? अशी चर्चा आता रंगु लागली आहे. याआधी देखील दत्ता आरोटे हे तालुक्यातील भाजप नेते शंकरराव वाघ, सतिष मोरे, सारीका डेर्ले, किरण पवार, विनायक खालकर यांच्या कायम संपर्कात असल्याचे दिसून आले आहे. दत्ता आरोटे हे तामसवाडी गावचे भूमिपुत्र आहे. त्यांनी तामसवाडी ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच म्हणून काम पाहिले आहे.


### निफाड येथे सम्राट अशोक जयंती साजरी

**निफाड :** भारतीय बौध्द महासभा निफाड तालुका शाखतर्फे सम्राट अशोक यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी भारतीय बौध्द महासभा नाशिक जिल्हा संस्कार उपाध्यक्ष कृष्णाजी सोनवणे निफाड तालुकाध्यक्ष प्रकाश संसारे, नारायण साळवे, शाम पगारे, शशिकांत भोसले यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामूहिक धम्म वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. प्रमुख अतिथी कृष्णाजी सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. प्रकाश संसारे यांनी मार्गदर्शन केले. अशोक खडताळे यांनी सर्वांचा सत्कार केला. कार्यक्रमाला रवींद्र कटारे, अजय,गांगुर्डे,संजय निरभवणे, शिवनाथ चव्हाण, रामदास वाघ, अविनाश मोरे, महेंद्र गायकवाड, पांडुरंग निरभवने, बाळासाहेब सोनवणे आदी उपस्थित होते. मनोहर आहिरे यांनी सूत्रसंचालन केले. आभार छगन कटारे यांनी मानले.

### कसबेसुकेणेत अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ

**कसबे सुकेणे:** येथील सावता नगर येथे रविवार दि. १३ एप्रिल पर्यंत महाबली हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन हभप अण्णासाहेब महाराज आहेर हिस्वळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. सप्ताह कालावधीत मान्यवर महाराजांची कीर्तने होणार आहेत. पहाटे पाच ते सात काकडा भजन सायंकाळी सहा ते सात हरिपाठ रात्री नऊ ते अकरा या वेळेत हरिकीर्तन आदी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि. १३) सकाळी नऊ ते अकरा या वेळेत हभप अण्णासाहेब महाराज आहेर हिस्वळकर यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताह कालावधीत लक्ष्मण महाराज पडोळ, संजय महाराज तिडके, अशोक महाराज खापरे यांच्यासह पंचक्रोशीतील गायक, वादक भजनी मंडळी साथ करणार आहेत.

### पत्रकार निलेश छाजेड यांचा अपघाती मृत्यू




**नाशिकरोड : प्रतिनिधी**

एकलहरेचे पत्रकार निलेश बन्सीलाल छाजेड (५०) यांचे एकलहरा रोड वरील रेल्वे ट्रॅक्शन कारखाना जवळ अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, मुलगी, भाऊ असा परिवार आहे.

## निधन वार्ता

### केशवराव भंडारे

**कसबे सुकेणे :** निफाड तालुक्यातील कसबे सुकेणे येथील प्रगतिशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते केशवराव दगुजी भंडारे (७२) वर्षे यांचे अल्प आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, भाऊ, सून , नातवंडे असा परिवार आहे प्रगतिशील शेतकरी किरण भंडारे यांचे ते वडील होत



# शेतीबांधावर जात ना. भुसेंनी केली नुकसानीची पाहणी

## तत्काळ पंचनामे करण्याच्या सूचना

**नाशिक: प्रतिनिधी**

अवकाळी पावसाने मालेगाव तालुक्यातीलअनेक गावांतील पिकांचे मोठे नुकसान झाले.

नुकसानग्रस्त भागाची शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी महसुल विभागाच्या पथकासह पाहणी करीत शेतकऱ्यांशी चर्चा केली. दरम्यान, नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करुन अहवाल सादर करण्यासंदर्भात मंत्री भुसे यांनी संबधित विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांना सूचना केल्या आहे.



१८० हेक्टरवरील कांदा व डाळिंब पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. डोंगराळे, नागझरी, टिंगरी, भारदेनगर आदी भागात देखील पाऊस झाला आहे. शेतकऱ्यांनी काढून ठेवलेला कांदा भिजला गारांच्या तडाख्यात सापडल्याने तो भिजला आहे. यामध्ये ४० हेक्टर क्षेत्रावरील कांदा व १४० हेक्टर डाळिंब पिकाचे नुकसान झाले. तालुक्यात रब्बी हंगाम व उन्हाळी पिकांची काढणी सुरु असतांनाच आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पिकविलेला कांदा भिजल्याने हातातोंडाशी आलेला खास हिरावला गेला आहे. याशिवाय डाळिंबाचे फळ गारपीटीमुळे खाली पडले असून राहिलेल्या फळावर देखील रोग येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामळे शेतकरी चिंतेत असून त्यांचे मोठ्याप्रमाणात आर्थीक नुकसान झाले आहे.

या गारपीटीसह नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्याकरीता मंत्री भुसे यांनी अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ, शेतकऱ्यांसह थेट शेताच्या बांधावर जावून त्यांचे सांत्वन करीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना धीर दिला आहे. या पाहणी दौऱ्याप्रसंगी मंत्री दादा भुसे यांच्यासह तहसीलदार विशाल सोनवणे, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, कृषी अधिकारी भगवान गोर्डे, मंडळ अधिकारी राजेंद्र पालवे, राहुल जाधव, तलाठी शिरीष दळवी, कृषी सहायक प्रथमेश पाटील, कृषीसेवक कैलास पवार आदी उपस्थित होते.

**तालुक्यातील या गावांना फटका**

मालेगाव तालुक्यातील काटवन भागात विराणे, लुल्ले, चिंचवे, पोहाणे, निमशेवडीसह परिसरातील गावांमध्ये गारपीटीसह मुसळधार पाऊस झाल्याने कांदा, डाळिंबसह आदी पिके भूईसपाट झाली आहे.

# आ. भुजबळांच्या हस्ते येवल्यात अंगणवाडी सेविकांना नियुक्तीपत्र वाटप

**येवला : प्रतिनिधी**

समाजातील लहान लहान बालकांवर चांगले शिक्षण, संस्कार त्यांच्या पोषणाची महत्वपूर्ण जबाबदारी या अंगणवाडी सेविकांकडे आहे. हीच मुले आपल्या देशाचे उद्याचे भविष्य असून ते घडविण्याची महत्वपूर्ण जबाबदारी अंगणवाडी शिक्षिका व सेवकांची आहे असे प्रतिपादन आ. छगन भुजबळ यांनी केले. आ. भुजबळ यांच्या हस्ते नवनियुक्त अंगणवाडी शिक्षिका व सेविकांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.



यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, प्रांत अधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, नायब तहसीलदार पंकज मगर, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, कृषी अधिकारी शुभम बेरड, सहायक गटविकास अधिकारी सुरेश पाटेकर, बालविकास प्रकल्प अधिकारी वंदना शिंपी, गटशिक्षण अधिकारी कुसाळकर, येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, बाजार समितीचे माजी सभापती देविदास निकम, युवा नेते मकरंद सोनवणे, शहराध्यक्ष दीपक लोणारी, सचिन कळमकर, भगवान ठोंबरे आदी उपस्थित होते.

आ. भुजबळ म्हणाले की, जिल्ह्यातील अनेक खुल्या जागेवर अंगणवाडी भरत होत्या. जिल्ह्यात पालकमंत्रीपदाची जबादारी असताना सुमारे ३६ कोटी रुपये खर्चून शेकडो अंगणवाड्या इमारती बांधण्यात आल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

**आ. भुजबळांकडून संकुलाच्या कामाची पाहणी**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आ. छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून येवला शहरात भव्य दिव्य प्रशासकीय संकुल उभारण्यात आले आहे. या प्रशासकीय संकुलातील सर्व शासकीय कार्यालये आणि या परिसराची माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी पाहणी केली. यावेळी ते म्हणाले की, येवला मतदारसंघाचा विकास हा आपला ध्यास आहे. त्यादृष्टीने प्रशासकीय संकुलाची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रशासकीय संकुल परिसरात नियमित देखभाल दुरुस्ती करत स्वच्छता ठेवण्यात यावी तसेच प्रशासकीय संकुलाच्या व्हिलेज स्वरूपाच्या रचनेत कुठलेही बदल करू नये. याठिकाणी नावीन्यपूर्ण संकल्पना राबविण्यात याव्यात अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**आ. भुजबळांच्या हस्ते अग्निशामक वाहनाचे लोकार्पण**

येवला नगरपालिकेच्या नूतन अद्ययावत अग्निशामक वाहनाचे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी वाहनाची माहिती घेतली. यावेळी येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रस्त्याच्या कामाला नागरिकांचा विरोध

## शिवसेनेचा ठेकेदार आणि प्रशासनाला इशारा

**सिडको: विशेष प्रतिनिधी**

सिडको विभागातील प्रभाग २६ परिसरात सध्या सुरू असलेले सिमेंट काँक्रीटचे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असून, हे काम कोणतीही पूर्वतयारी न करता घाईघाईत केले जात असल्याचा आरोप शिवसेना उपमहानगर प्रमुख सुधाकर जाधव यांनी केला आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी नागरिकांना जागरूक राहण्याचे आणि शासनाच्या निधीचा अपव्यय होऊ न देण्याचे आवाहन केले आहे.

या भागात ठेकेदारांकडून जेसीबी मशिनद्वारे रस्त्यांचे खोदकाम सुरू असून, कोणतीही आवश्यक यंत्रणा उभारण्यात येत नाही. त्यामुळे रस्त्यांच्या खाली असलेल्या ड्रेनेज लाईन, पाण्याच्या पाइपलाइन आणि पावसाळी गटार व्यवस्था याकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. याचा त्रास पुढील काळात नागरिकांनाच सहन करावा लागणार असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

सुधाकर जाधव यांनी सांगितले की, जेसीबी मशिन खोदकाम करण्यासाठी रस्त्यावर उतरवली जात असेल, तर नागरिकांनी पुढील तीन गोष्टींची खात्री केल्याशिवाय खोदकाम करू देऊ नये. ड्रेनेज लाईन टाकण्यात येणार आहे का? पाण्याची लाईन ही ड्रेनेजपासून सुरक्षित अंतरावर नेण्यात येणार आहे का?पावसाळी गटार (स्टॉर्म वॉटर ड्रेनेज) व्यवस्थित बसवण्यात येणार आहे का?

या तीनही बाबींची खात्री झाल्यानंतरच जेसीबीने खोदकाम करावे, अन्यथा शासनाच्या निधीचा अपव्यय होतो आणि जनतेचा पैसाही वाया जातो, असे ते म्हणाले.

स्वामी समर्थ केंद्र परिसरात याआधी झालेलं निकृष्ट काम हे याचच उदाहरण असल्याचे जाधव यांनी सांगितले. त्या परिसरात रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण झाल्यानंतर काहीच दिवसांत ते उखडू लागले. त्यामुळं नागरिकांच्या तक्रारी वाढल्या असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

सध्या नाशिक महानगरपालिकेवर प्रशासकीय राजवट आहे आणि या कालावधीत दर्जेदार कामांची हमी मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. फक्त वरवर काँक्रीट टाकून रस्त्यांचे काम पूर्ण केल्याचे दाखवले जात आहे. वास्तविक, त्यामागे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार लपलेला आहे. असा आरोपही त्यांनी केला.

सुधाकर जाधव यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, जर काम दर्जेदार असेल, तरच त्याला सहकार्य करा. अन्यथा एकजूट होऊन अशा निकृष्ट आणि अपूर्ण कामांना विरोध करा.या पार्श्वभूमीवर कॉलनी रोड परिसरातील नागरिकांत असंतोष वाढताना दिसत असून, अनेकांनी सोशल मीडियावरही आपली नाराजी व्यक्त केली आहे. रस्त्यांच्या गुणवत्तेचा मुद्दा नाशिक शहरासाठी नवखा नाही, पण नागरिक जर सजग राहिले तरच निधीचा योग्य वापर होईल, असं त्याचं म्हणणं आहे.



# रामनवमीनिमित्त कावनई ते गोंदे दुमालापर्यंत शोभायात्रा

**इगतपुरी : प्रतिनिधी**

रामनवमी निमित्त इगतपुरी तालुक्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याचे मुळ स्थान असलेल्या कावनई येथून गोंदे दुमाला येथील श्रीराम मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सजन नाठे यांच्या नेतृत्वाखाली श्रीराम रथ शोभायात्रा काढण्यात आली होती.ही शोभायात्रा बाल वारकरी यांच्या टाळ मृदुंगाच्या गजरात निघाली होती.

या शोभायात्रेला कावनई येथुन सुरुवात होऊन मुकणे, पाडळी, जानोरी, नांदुरवैद्य, बेलगाव कु-हे, कु-हे गांव, सांजेगाव, मुरंबी, वाडीव-हे, गोंदे दुमाला आदी गावांत दिवसभर फिरून आल्यानंतर सायंकाळी गाव प्रदक्षिणा करून गोंदे येथील हनुमान मंदीरात महाआरती करून या शोभायात्रेची सांगता करण्यात आली. जसजशी यात्रा पुढे जात होती तसतसे प्रत्येक गावाच्या वेशीवर या शोभायात्रेचे भाविक यांचा ग्रामस्थांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात येत होते.

श्रीराम मित्र मंडळाचे अध्यक्ष सजन नाठे यांच्या नेतृत्वाखाली ही शोभायात्रा गेल्या तीन वर्षांपासून काढण्यात येत असुन नव्या पिढीला धार्मिकतेचे महत्व कळावे व प्रभू रामाचा जन्मदिवस म्हणून आपण रामनवमी साजरी करतो. सध्याच्या व येणाऱ्या तरुण पिढीला मर्यादा पुरुषोत्तम राम हे आचार विचारातून समजले पाहिजे. तरुणाईने धर्मांध न होता धर्म अभिमानी बनावे या ह्या हेतूने गेल्या तीन वर्षापासून आम्ही ही रथ यात्रा काढत आहोत. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी बारा गावातून ही रामरथ यात्रा काढण्यात येते.

तसेच प्रत्येक गावातून ही यात्रा मार्गक्रमण करत असताना गावातील नागरिक त्याचे स्वागत करून त्यात सम्मीलित होतात व जशी जशी यात्रा पुढे जाते तशी तिची भव्यता वाढत होती. या रथयात्रेत सजन नाठे, हिरामण नाठे, गणपत नाठे, तानाजी नाठे, प्रकाश नाठे, सुनिल नाठे, मोहन जाधव, मंगेश सोनवणे, परशुराम नाठे, नामदेव नाठे, संजय नाठे, पुरुषोत्तम मुर्ती, संतोष नाठे, शिवानंद महाराज, राजाराम पिठोबे, बंडु नाठे, विलास चोथे, संतोष राजोळे, नकुल चोथे, गणेश गवते आदी सहभागी झाले होते.

ही रथयात्रा सायंकाळी गोंदे दुमाला गावात गेल्यावर पवनपुत्र हनुमान यांच्या बरोबर भेट घडवून महाआरती होऊन रथ यात्रेचा समारोप होतो. यासाठी या शोभायात्रेचे आयोजन करण्यात येते अशी माहिती सजन नाठे यांनी दिली. शोभायात्रेच्या शेवटच्या टप्प्यात भक्तांची अमाप गर्दी झाली होती.

# राष्ट्रवादी युवक सभासद नोंदणी अभियानास सुरुवात

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सभासद नोंदणी अभियानास सुरवात झाली आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये कॅम्प उभारून अभियानांतर्गत राष्ट्रवादी युवक काँग्रेस उच्चांकी सभासद नोंदविणार असल्याचे जिल्हाध्यक्ष चेतन कासव यांनी राष्ट्रवादी भवन येथे पार पडलेल्या आढावा बैठकीत सांगितले.



जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सर्वाधिक आमदार निवडून आले आहेत. राष्ट्रवादी युवकची ताकद मजबूत करण्यासाठी युवकांची सभासद नोंदणी मोठ्या प्रमाणात करावी. राष्ट्रवादी पक्ष युवकांना संधी देणारा पक्ष आहे. आगामी निवडणुकीत पक्षाच्या वरिष्ठांनी आपल्याला संधी दिली पाहिजे .

यासाठी आपण केलेली कामे, आंदोलने लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी सोशल माध्यमांचा वापर करावा व जास्तीत जास्त सभासद नोंदणी करून राष्ट्रवादी युवक काँग्रेसची ताकद दाखवून द्यावी असे आवाहन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चेतन कासव यांनी केले. तसेच यावेळी जिल्हाध्यक्ष चेतन कासव यांनी सभासद नोंदणी चा अर्ज भरून राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या सभासद नोंदणीस सुरवात करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहित पाटील, युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज चव्हाण, गणेश पगार, जिल्हा सरचिटणीस गौरव जाधव, सागर वायंगणकर, जिल्हा संघटक आकिफ खान शाहबाझ खान, ओंकार थोरात आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृषी सौरसंचासाठी छोट्या शेतकऱ्यांची मोठी अडचण

## जादा जमीन धारणेची अट

**निफाड :अण्णा बोरगुडे**

महाराष्ट्र शासनाने कृषी पंपासाठी सौर संच बसवणे सक्तीचे केले आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना आणली आहे. दुसरीकडे जमिनीतील पाणी पातळी खालावल्यामुळे विंधन विहिरींसाठी पाच किंवा त्यापेक्षा अधिक अश्वशक्तीच्या (एचपी) मोटरची आवश्यकता भासत आहे. मात्र, त्यासाठी पाच एकरापेक्षा अधिक जमिनीची अट आहे. परिणामी, छोट्या शेतकऱ्यांची मोठी अडचण होत आहे. त्यांच्यासाठी सौर कृषी पंप योजना कुचकामी ठरत असल्याचे चित्र आहे.



पारंपरिक पद्धतीने वीज निर्मितीचा खर्च मोठा आहे. शिवाय पर्यावरणाची न भरून निघणारी हानी होत आहे. त्यामुळे सौर ऊर्जे कडे पर्याय म्हणून पाहिले जाऊ लागले. शासनाने सौर ऊर्जेचा वापर वाढवण्याचे धोरण अवलंबले. कृषी पंपांना विजेचा अधिक वापर होतो. ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना आणली. या योजनेच्या लाभासाठी तीन अश्वशक्तीच्या सौर कृषीपंपासाठी पाच एकरपर्यंत शेतजमिनीची तर पाच किंवा साडेसात अश्वशक्तीच्या सौर कृषी पंपासाठी पाच एकरपेक्षा अधिक शेतजमिनीची अट आहे.

वास्तविक काही वर्षांत विविध कारणांनी जमिनीची पाणी पातळी खालावली आहे. शेतकऱ्यांनी विंधन विहीर काढल्यास अपवाद वगळता ३०० ते ४०० फुटांपेक्षा खाली पाणी लागत आहे.

या विंधन विहिरीतून पूर्ण क्षमतेने पाणी उचलायचे झाल्यास तीन अश्वशक्तीचा पंप उपयोगी पडत नाही. पाच किंवा साडेसात अश्वशक्तीच्या पंपाची गरज लागते. पण, योजनेच्या अटीनुसार त्यासाठी पाच एकरापेक्षा अधिक शेतजमिनी आवश्यकता आहे. मग, छोट्या शेतकऱ्यांनी पाच एकरापेक्षा अधिक शेतजमिन आणायची कोठून की त्यांनी विंधन विहीरच करायची नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कृषीपंपासाठी सौर संच बसवणे सक्तीचे केल्यामुळे वीज वितरण कंपनीने आपल्या वीज वाहिनीवरून पूर्वीप्रमाणे कनेक्शन देणे बंद केले आहे. त्यामुळे छोट्या शेतकऱ्यांची अवस्था विचित्र झाली आहे. त्यांना ना वीज वितरण कंपनीकडून कनेक्शन मिळत आहे. ना सौर कृषी पंप योजनेचा लाभ घेता येत आहे. त्यामुळे छोट्या शेतकऱ्यांना अडचणीची ठरणारी योजनेतील शेतजमिनीची अट शिथिल करावी, अशी मागणी होत आहे.



# चैत्रस्वरात हिंदी मराठी भक्तीगीतांच्या सुरांनी भाविक मंत्रमुग्ध

**पंचवटी : वार्ताहर**

कृपा मजवरी ठेवा, गुरु एक जगी त्राता, जैसी गंगा वाहे, ठुमक चलत रामचंद्र वाजत पैजनिया, हरि म्हणा कुणी या आणि अशा मराठी व हिंदी विविध भक्तीगीतांच्या सुरांनी काळाराम मंदिर परिसराचे वातावरण निर्माण झाले.

श्री काळाराम मंदिर संस्थानतर्फे आयोजित वासंतिक नवरात्र महोत्सवात शनिवारी चैत्रस्वर हा श्रुतिका शुक्ल यांचा कार्यक्रम झाला. सुरेल भक्तीगीतांनी भक्तीरंगांची उधळण केली. भक्तीगीतांना रसिकांकडून दाद मिळाली. हरी म्हणा तुम्ही, गोविंद म्हणा, गुरूविना नाही थारा, कृपा मजवरी , वृंदावणी वेणू, पांडुरंग नामी, स्वामी कृपा कधी करणार आदी भक्तीगीतांचे गायन शुक्ल यांनी केले. त्यांना ज्ञानेश्वर कासार (संवादिनी), आदित्य कुलकर्णी (तबला), दिगंबर सोनवणे (पखवाज), भालेराव (तालवाद्य) यांनी संगीत साथ केली. एकनाथ कुलकर्णी, शुभम मंत्री, मंदार जानोरकर यांनी स्वागत केले. यावेळी बाळकृष्ण फुलरीया, पोलिस कर्मचारी राहुल लभडे, अभिजित पैठणकर यांचा सत्कार करण्यात आला. शिल्पा हासे यांनी सूत्रसंचालन केले.

महत्त्वाचे



## येवल्यात श्री रामनवमी कार्यक्रमाला समिर भुजबळ यांची भेट

**येवला :** श्री रामनवमीच्या निमित्ताने बेलदार समाज बांधवांच्या वतीने येवला शहरात भव्य दिव्य पालखीची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूक सोहळ्यास माजी खासदार समीर भुजबळ यांनी सहभाग घेतला. यावेळी प्रभू श्री रामचंद्रांचे मनोभावे दर्शन घेतले तसेच उपस्थित भाविकांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, स्वीय सहायक बाळासाहेब लोखंडे, उपाध्यक्ष दत्ता निकम, युवा नेते भुषण लाघवे, दिपक लोणारी, वाल्मीक कुमावत, बल्ली कुमावत, दत्तकुमार उटवळे, संतोष बेलदार, कालिदास अनवडे, सचिन सोनवणे, गोटू मांजरे, श्रीकांत वाकचौरे, गणेश गवळी आदीसह पदाधिकारी कार्यकर्ते व भाविक बहुसंख्येने उपस्थित होते.

## येवला कृउबात स्वच्छता अभियान प्रारंभ



**येवला:** महाराष्ट्र शासनाचे १०० दिवसांच्या ७ कलमी कृती कार्यक्रमा अंतर्गत येवला येथील कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य बाजार आवारात आज स्वच्छता अभियानाचा शुभारंभ बाजार समितीच्या सभापती सौ. सविताताई पवार, तसेच माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचे स्विय सहाय्यक बाळासाहेब लोखंडे, सहाय्यक निबंधक, विजयसिंग राजपुत यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला या प्रसंगी बाजार समितीच्या उपसभापती, संचालक, सचिव व बाजार समितीचे अधिकारी, कर्मचारी यांनी आवारात स्वच्छता केली. तसेच संपूर्ण आवाराची टप्प्याटप्याने साफसफाई करण्यात येणार असून शेतकरी व व्यापारी बांधवांसाठी आवश्यक त्या सेवा व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे बाजार समितीचे सचिव के.आर. व्यापारे यांनी बोलताना सांगितल. याप्रसंगी बाजार समितीच्या उपसभापती सौ. संध्याताई पगारे, संचालक किसनराव धनगे, वसंतराव पवार, रतन बोरनारे, ॲड. बापुसाहेब गायकवाड, कांतीलाल साळवे, महेश काळे, नंदकिशोर आट्टल, भरत समदडीया, सुरेंद्र वडे, बापुराव पगारे, दीपक लोणारी, बबनराव साळवे, प्रल्हाद बोरनारे लेखापाल रविंद्र बोडके, सिध्देश्वर जाधव, संजय खैरनार, गंगाधर आहेर, संतोष परदेशी, अनिल कांगणे, प्रविण चौधरी, सुरेश चौरे, किशोर गोविंद, सोपान कदम, श्रावण घुगे, दत्तु टोंगारे, जगन पवार, सुनिल साताळे, कैलास वाटाणे, राहुल घुगे, संकेत जाधव, दिवाकर आढाव, अमोल खराटे, अनिता पानसरे उपस्थित होते.

## मातोश्री फार्मसीत २८ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी



**येवला :** मातोश्री शिक्षण संस्थेच्या एकलहरे येथील मातोश्री कॉलेज ऑफ फार्मसी येथे मेगा कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी २८ विद्यार्थ्यांना मॅकलॉड्स फार्मास्युटिकल्स लि या कंपनीने नोकरी दिली असून प्रत्येकी अडीच लाखाचे पॅकेज देण्यात आले. विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा तसेच फार्मसी क्षेत्रात करियर करण्यासाठी सुलभ व्हावे यासाठी शिक्षण घेत असताना नोकरीची संधी मिळावी म्हणून महाविद्यालयातर्फे दरवर्षी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयाच्या पुढाकाराने मॅकलॉड्स फार्मास्युटिकल्स लि.(सेंटर ऑफ एक्सलंन्स) गुजरात या नामांकित कंपनीने कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले.या मेळाव्यात नाशिक जिल्ह्यातील विविध फार्मसी महाविद्यालयाचे १७० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी २८ विद्यार्थ्यांना कंपनीतर्फे प्लेसमेंट मिळाली.त्यात राहुल चौधरी, मनोहर पगार, प्रसाद धामणे,शेवाळे विशाल, सुर्यवंशी ज्ञानेश्वर, पवार अमोल, कोल्हे ऋषीकेश, साठे प्रसाद, दळवी वैभव, पैठणकर मयूर, पवार तेजस,बर्डे रोहित, सिंगर प्रशांत, चीन्कर निखील, जयेश वाघ, कुटे वैभवी, चौधरी जान्हवी, पुरकर निशा,शिंदे अथर्व, वाघ विशाल, बिरारी सुनील, पवार अनिकेत,निकम कुणाल, खैरनार दीपक,आहेर आकाश, निकम मयुरी, पाटील चंद्रकांत, मच्छिन्द्र सौरभ यापैकी एम फार्मसीचे ७ व बी फार्मसीचे २१ विद्यार्थ्यांची निवड झाली.

## मनेगाव शिवारातून सेंट्रिंगचे साहित्य चोरी

**सिन्नर :** सिन्नर बायपास रोडवर मनेगाव शिवारातून बुधवारी (दि.२) अज्ञात चोरट्याने ५३ हजारांचे सेंट्रिंगचे साहित्य लांबविल्याची घटना गुरुवारी (दि.३) उघडकीस आली. मनेगाव शिवारात सिन्नर बायपास रोडवर बांधकाम ठेकेदार मंजुर आलम शेख , रा. द्वारका, नाशिक यांचे बांधकाम साईटवरुन अज्ञात चोरट्याने बुधवारी (दि.२) सायंकाळी ६ नंतर रात्रीच्यावेळी ३० हजार रुपये किंमतीच्या ६० आर.सी.सी. प्लेट, १७ हजार ५०० रुपये किंमतीचे ६५ जॅक मुंडे, साडेपाच हजार रुपये किंमतीचे ११ स्पॅनर अँगल असे ५३ हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरुन नेले. गुरुवारी (दि.३) सकाळी ११ वाजता चोरीचा प्रकार उघडकीस आला. मंजुर शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सिन्नर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार वराडे करत आहेत.

## सिन्नरच्या गणेश पेठेतून मोटारसायकल चोरी

**सिन्नर :** शहरातील गणेशपेठेत देशी दारुच्या दुकानासमोरुन अज्ञात चोरट्याने हिरो पॅशन प्रो मोटारसायकल (क्र. एमएच-१५, जीवाय-८५९५) अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना बुधवारी (दि.२) दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी प्रकाश किसन रहाणे, रा. जानोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सिन्नर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास हवालदार आव्हाड करत आहेत.

## हिवरगावला दुचाकीस्वार ठार

सिन्नर : तालुक्यातील हिवरगाव येथे सिन्नर-हिवरगाव रस्त्यावर भरधाव वेगात जाणाऱ्या दुचाकीवरील ताबा सुटल्याने दुचाकी हॉटेलच्या शटरला धडकली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.३१) दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास घडली. योगेश अनिल माळी (३०), रा. कुरण, ता. संगमनेर, जि. अ.नगर असे मृताचे नाव आहे. योगेश माळी हा पॅशन प्रो मोटारसायकलने (क्र. एमएच-१७, एएस-७२३३) हिवरगाव-सिन्नर रस्त्यावरुन जात असताना त्याचा मोटारसायकलवरील ताबा सुटल्याने मोटारसायकल हॉटेल महाराष्ट्रच्या शटरला धडकली. या अपघातात योगेश माळी याच्या तोंडाला जबर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

# सिन्नरच्या उपजिल्हा रुग्णालयात आजपासून मोफत डायलिसिस सुविधा

## नाशिकनंतर जिल्ह्यातील ग्रामीण भागात सिन्नरमध्ये मिळणार सुविधा

**सिन्नर : भरत घोटेकर**

**मूत्रपिंडाचा (किडनी) आजार असलेल्या रुग्णांना 'डायलिसिस' मशिनद्वारे उपचाराची गरज असते. सिन्नरच्या उपजिल्हा रुग्णालयात कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या पुढाकारातून राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून डायलिसिस उपचाराची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नाशिक नंतर ग्रामीण भागात सिन्नर मध्ये पहिल्यांदा ही सेवा सुरू होत असल्याने डायलिसिस आवश्यक असलेल्या रुग्णांना आता नाशिकला जाण्याची गरज पडणार नाही.**



आज सोमवारी (दि.७) राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या सेवेचे लोकार्पण करण्यात येणार आहे. अलिकडच्या काळात मूत्रपिंडाशी संबंधित आजाराचे प्रमाण वाढत आहे. मूत्रपिंडाच्या आजारासाठी सुरूवातीच्या टप्प्यात गोळ्या, औषधी, रक्तदाब नियंत्रणात ठेवणे, हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविणे, वजन नियंत्रणात ठेवणे आदी उपचारपद्धतीवर भर दिला जातो. उपजिल्हा रुग्णालयात वातानुकूलित सुसज्ज ५ बेडच्या डायलिसिसची व्यवस्था करण्यात आली आहे. येथे एकूण ५ डायलिसिस मशीन आहेत. वैद्यकीय अधिकारी, किडनी विकार तज्ज्ञ, २ डायलिसिस तंत्रज्ञ, एक स्टाफ नर्स, स्वच्छता कर्मचारी अशा ६ जणांचा स्टाफ या डायलिसिस सेंटरसाठी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आला आहे. डायलिसिसची गरज असणाऱ्या रुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा देण्याच्या सूचना नेमलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती जिल्हा समन्वयक राजेंद्र काटे यांनी दिली.

### महिन्याकाठी होणार २४ हजारांची बचत

खासगी दवाखान्यात एका डायलिसिसचा खर्च हा ३ ते ४ हजाराच्या घरात जातो. म्हणजे आठवड्यात दोन वेळा डायलिसिस करणाऱ्या रुग्णाला महिन्याकाठी किमान २४ हजार रुपये तर आठवड्यात तीन वेळा डायलिसिस करणाऱ्या रुग्णाला महिन्याकाठी किमान ३६ हजार रुपये खर्च येतो. उपजिल्हा रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध होणार असल्याने सर्वसामान्य रुग्णांचा हा खर्च वाचणार आहे.

# पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांसंदर्भात लवकरच मंत्रालयात बैठक

## आढावा बैठकीत कृषिमंत्री कोकाटे यांचे आश्वासन

**सिन्नर : प्रतिनिधी**

आवाच्या सव्वा वीज देयकांमुळे पाणीपुरवठा योजना चालवणे अशक्यप्राय होऊन बसले आहे. त्यामुळे ज्या जीवन प्राधिकरणाच्या योजनांना सौर प्रकल्प मंजूर आहेत त्यांना वीज वितरणाने तातडीने ना हरकत देऊन हे सर्व प्रकल्प कार्यान्वित करावेत, अशा सूचना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिल्या.

सिन्नरला अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांचा आढावा शनिवारी (दि.५) घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा, गटविकास अधिकारी अशोक भवारी, सहाय्यक गट विकास अधिकारी विजय ढवळे, पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता अंकित जाधव, जीवन प्राधिकरणाचे उपाभियंता निकम, शाखा अभियंता पाटील, महावितरणचे कार्यकारी अभियंता राजेंद्र डोंगरे आदी उपस्थित होते.



महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महावितरणचे अधीक्षक अभियंता यांची पुढील आठवड्यात पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांसोबत तातडीने मुंबई येथे मंत्रालयात बैठक लावून पाणी प्रश्नी असलेल्या समस्या तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले. प्रत्येक पाणीपुरवठा योजनेनिहाय त्यातील असलेल्या अडचणी नमूद करून माहिती घेऊन अधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित राहावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. ज

या ठिकाणी जलजीवन मिशन योजनेच्या ठेकेदारांनी चुकीची कामे केली आहेत, त्यांच्यावर कारवाई करा.

मुदत उलटूनही योजना पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाई जाणवत आहेत. त्यामुळे दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवरही दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### जलजीवन मिशन, जीवन प्राधिकरणाच्या तक्रारी

जलजीवन मिशन योजनेची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याची तक्रार अनेक ठिकाणच्या सरपंचांनी केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामाबाबतही असाच सूर निघाला. त्यामुळे संबंधित कामांची तातडीने चौकशी करून ठेकेदारांवर कारवाई करण्याच्या सूचना कृषी मंत्री कोकाटे यांनी दिल्या.

### गैरहजर ग्रामसेवकांवर कारवाईचे निर्देश

पाणीपुरवठा विभागाच्या आढावा घेताना त्या गावचे सरपंच, ग्रामसेवक आणि ज्या विभागाची योजना आहे त्यांनी उपस्थित राहणे अपेक्षित आहे. मात्र जामगाव, पास्ते आणि निर्हाळे येथील ग्रामसेवक बैठकीला गैरहजर असल्याने तेथील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती जाणून घेता आली नाही. त्यामुळे कृषीमंत्र्यांचा पारा चढला. संबंधित ग्रामसेवकांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी गटविकास अधिकारी अशोक भवारी यांना दिले.



## सिन्नर महाविद्यालयात अग्निशामक वापर कार्यशाळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सिन्नर महाविद्यालयात अग्निशामकचा वापर कसा करायचा याची एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळासाठी प्रमुख वक्ते स्वस्तिक फायरसचे नारायण देवरे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आगीचे प्रकार आणि त्यासाठी कोणते अग्निशामक वापरण्यात येते याची माहिती दिली व अग्निशामकचा वापर करण्याची पद्धत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवले. या कार्यशाळेसाठी प्रभारी प्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार, विज्ञान शाखेचे प्रमुख प्रा. एस. टी. पेखळे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. मनोज गवारे, डॉ. अमोल काटेगावकर, प्रा. डी. जी. बहिरम, श्रीमती पल्लवी गडाख, श्रीमती स्वाती चतुर, श्रीमती वनिता कासार, अंकिता रायते, गायत्री हंडगे, सोनाली कांडेकर, जगदीश घोटेकर, श्रीमती कल्याणी मोरे, बाळासाहेब म्हस्के, दिपाली दाभने, रोहित पावरा, सुरेश वाकचौरे, अर्जुन जाधव, गोपाळ हिरे, ज्ञानेश्वर कापुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शंकरराव काळे म्हणजे कार्यकर्ते घडविणारे चालते बोलते विद्यापीठ

## १०४ व्या जयंतीनिमित्त कार्यकर्त्यांनी जागविल्या आठवणी

**वावी : वार्ताहर**

माजी खासदार कर्मवीर शंकरराव काळे साहेब यांची १०४ वी जयंती कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावरील स्मृती उद्यान येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येवून मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व कार्यकर्त्यांकडून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी त्यांच्या समवेत समाजकारणात सक्रीय सहभागी असणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांनी मनोगतातून आपल्या भावना व्यक्त करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

याप्रसंगी माजी आमदार अशोकराव काळे, अनिल शिंदे, स्नेहलताताई शिंदे, आ.आशुतोष काळे, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका चैताली काळे, कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण, उपाध्यक्ष नारायणराव मांजरे, ज्येष्ठ नेते छबुराव आव्हाड, पद्माकांत कुदळे, बाळासाहेब कदम, ॲड. प्रमोद जगताप, डॉ.पी.जी.गुंजाळ, संभाजीराव काळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण सर्व संचालक मंडळ उद्योग समुह व संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक, कर्मचारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी जिल्हा परिषद-पंचायत समिती सदस्य, माजी नगरसेवक, कार्यकर्ते, रयत संकुलातील शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी स्नेहलता शिंदे, कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण, उपाध्यक्ष नारायणराव मांजरे, कार्यकारी संचालक सुनील कोल्हे, बाळासाहेब कदम, पद्माकांत कुदळे, डॉ.पी.जी. गुंजाळ, डॉ.आय.के.सय्यद आदी मान्यवर व कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना कर्मवीर शंकरराव काळे यांच्या आठवणींना उजाळा देतांना सांगितले की, साहेबांचे विचार अतिशय प्रेरणादायी होते. ते नेहमी सांगत आपण पडलो तरी चालेल परंतु पडल्यानंतर उठता आले पाहिजे. साहेब आज शरीराने जरी आपल्यात नसले तरी, त्यांनी शिक्षण, सहकार, कृषी, सिंचन आदी क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाच्या, पाणी प्रश्नासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाच्या व प्रेरणादायी आठवणीच्या रूपाने ते कायम आपल्यात आहेत.



साहेब, कार्यकर्ते घडविणारं चालतं बोलतं ऑक्सफर्ड विद्यापीठ होते. या विद्यापीठात कर्तव्य, नैतिकता आणि परोपकाराची शिकवण देवून साहेबांनी अनेक कार्यकर्ते घडविले, त्यांना स्वत:ची ओळख निर्माण करून दिली असून सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात साहेबांच्या कार्यांचा सुगंध आजही दरवळत आहे. सामान्य कार्यकर्त्यांना मोठं केले, त्यांना राजकारणात संधी दिल्या आणि प्रत्येक कार्यकर्त्याला पोटच्या मुलापेक्षा जास्त प्रेम दिले. त्यांच्याकडे असणारे गुण कार्यकर्त्यांना बळ देणारे होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नंतर रयत शिक्षण संस्थेची सेवा करतांना रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांना दिलेला शब्द पूर्ण करून स्वत:च्या शिक्षण संस्था न काढता रयत शिक्षण संस्थेची भरभराट करण्यात त्यांनी धन्यता मानली. त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यानंतर कर्मवीर शंकरराव काळे यांनीच रयत शिक्षण संस्थेला मोठं केले. ते परीस होते त्यांच्या पदस्पर्शाने कारखाना परिसराचे नंदनवन झाले. समाजकारण करीत असतांना त्यानी कधीही जात, पात, धर्म पाळला नाही. आलेल्या व्यक्तींच्या अडचणी कशा सुटतील व त्याच्या चिंता कशा दूर होतील यासाठी ते शेवटपर्यंत प्रयत्न करीत असत. त्यांनी नेहमी सर्वसामान्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले म्हणूनच ते खऱ्या अर्थाने कर्मयोगी ठरले आहेत. कोपरगाव तालुक्याच्या विकासाला सातत्याने त्यांनी डोळ्यासमोर ठेवतांना पाणी प्रश्नासाठी आपलं आयुष्य वेचलं. साखर कारखान्याची उभारणी करून शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र आर्थिक परिवर्तन घडवून परिसराचे नंदनवन केले. सहकारी साखर कारखानदारी सक्षमपणे चालवितांना सहकार चळवळ जोपासली. कारखान्याला नफा नाही झाला तरी चालेल मात्र ऊस उत्पादक शेतकऱ्याचे नुकसान होणार नाही याची सदैव काळजी घेवून शेतकऱ्यांबरोबरच कर्मचाऱ्यांचे हित जोपासून समाजाप्रती असलेली आत्मीयता व दूरदृष्टी कशी असावी हे साहेबांकडे पाहिल्यास लक्षात येते. त्यामुळे ते केवळ कर्मवीरच नव्हे तर कर्मयोगी व राजकारणातील संत होते. पाणी प्रश्नासाठी ते आयुष्यभर लढले त्यांचे हेच गुण आ.आशुतोष काळे यांच्यामध्ये असल्याचे कार्यकर्त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.कार्यक्रमाचे स्वागत प्रास्तविक कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण यांनी केले. सूत्रसंचालन गोरक्षनाथ चव्हाण यांनी केले तर कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण यांनी आभार मानले.

### शंकररावजी काळे यांचा आदर्श विचार घेऊन कार्य

माजी खासदार कर्मवीर शंकरराव काळे व मा.आ.अशोकराव काळे यांच्या समवेत समाजकारणात सक्रीय असणाऱ्या कार्यकर्त्यांचे प्रेम, सहकार्य, मार्गदर्शन मिळत असल्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजतो. आजवर कार्यकर्त्यांच्या बळावर व जोरावर सामाजिक राजकीय वाटचाल करीत आलो आहे. मागील वर्षी पार पडलेली विधानसभा निवडणूक निवडणुकीप्रमाणेच लढलो. सर्व कार्यकर्त्यांनी अंग झटून केलेलं काम व सहकार्यामुळे ऐतिहासिक विजय मिळवून राज्यात क्रमांक पाच तर जिल्ह्यात नंबर एकचे मताधिक्य मिळवून इतिहास घडला आहे.सर्व कार्यकर्त्यांनी ज्याप्रमाणे शंकररावजी काळे व अशोकरावजी काळे यांना साथ दिली मार्गदर्शन केले. त्याप्रमाणेच मलाही आपली साथ व मार्गदर्शन द्या. आपण केलेला विकास जनतेने स्वीकारला आह. मात्र ही तर सुरुवात आहे. अजून आपल्याला अनेक महत्वाची विकास कामे करायची आहेत. कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या आदर्श विचारांवर व मा.आ.अशोकरावजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपला कारखाना प्रगतीपथावर आहे. आपले सहकार्य असेच ठेवा आपला मतदार संघ देखील असाच प्रगतीपथावर राहील.

**–आ.आशुतोष काळे.**

# पोकराच्या धर्तीवर राज्य शासन योजना राबवणार

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेकडे संधी म्हणून बघा : कृषीमंत्री कोकाटे

**सिन्नर : प्रतिनिधी**

जागतिक बँकेच्या ६ हजार करोड रुपये अर्थसाहाय्यातून राज्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच शेती समृद्ध करण्यासाठी पोकरा योजना राबवण्यात आली आहे. मात्र पोकरात ज्या गावांचा समावेश झाला नाही, अशा गावांसाठी राज्य शासनाच्या वतीने पोकराच्या धर्तीवर आणखी एक योजना राबवण्याच मानस असून त्या दृष्टीने शासन पातळीवर काम सुरू असल्याची माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा क्रमांक २ च्या सिन्नर येथील अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात शनिवारी (दि.५) पार पडलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा कृषी अधीक्षक शिवाजीराव आमले, कृषी संजीवनी योजनेचे उपविभागीय अधिकारी जयंत गायकवाड, निफाडचे कृषी विभागाचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र वाघ, तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा, गटविकास अधिकारी अशोक भवारी, सहाय्यक गटविकास अधिकारी विजय ढवळे, तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये अतिउपस्यामुळे भूजल सर्वेक्षण विभागाने विहीर खोदण्यास मनाई केली आहे. पोकरा योजनेत जलसंवर्धनाचे साठे भक्कम करून पाणी पातळी वाढवून ही गावे सुरक्षित पातळीवर आणण्यासाठी एक दिलाने काम करा. या गावांचा पुन्हा सर्वे करून तेथे



विहीर खोदण्यास परवानगी मिळवून देण्याचे आश्वासन कृषिमंत्री कोकाटे यांनी दिले.

प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे यांनी केले. पाणी फाउंडेशनचे राजेंद्र हिवरे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचा उद्देश, त्यात करावयाची कामे पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून शेती गटांनी केलेली कामे यावर मार्गदर्शन केले. गावाचा, शेतकऱ्यांचा आणि पर्यावरणाचा सर्वांगीण विकास करणारा पोकरा हा कामधेनु प्रकल्प असल्याचे जिल्हा कृषी अधिक्षक शिवाजीराव आमले यांनी सांगितले. राज्यातील २१ जिल्ह्यातील ७१७८ गावे तर एकट्या नाशिक जिल्ह्यातील ६१४ गावे या योजनेत समाविष्ट करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

### ग्रामविकास समित्यांमध्ये राजकारण नको

पोकरा योजना यशस्वी करण्यासाठी समाविष्ट गावांमध्ये ग्रामविकास समित्या स्थापन करावयाच्या आहेत. ज्या लोकांना काम करायची इच्छा आहे, अशाच लोकांचा या समितीत समावेश करावा. राजकारणाचा लवलेश येणार नाही, याची काळजी घ्यावी. सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक या यंत्रणांनी समन्वय ठेवून आदर्श काम उभे करावे, असा सल्ला कृषी मंत्री कोकाटे यांनी दिला.

### शेततळ्याचे अनुदान वाढवणार

शेततळ्याला खोदकामासाठी सध्या शासनाकडून ७५ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र ही रक्कम तोकडी असून शासनाकडून हे अनुदान दीड लाख करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबर शेती समृद्ध करताना पणन व्यवस्था निर्माण करण्यासाठीही शासन पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचे कृषिमंत्री कोकाटे यांनी सांगितले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी




आ. भुजबळांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटप पान ६



ना. भुसेंनी केली नुकसानीची पाहणी पान ६

gavakari.in gavkarinews.com
नाशिक, सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे

### सायबर सुरक्षा आणि गुन्हेगार आज विशेष व्याख्यान

**नाशिक :** डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, नाशिक जिल्हा यांच्या वतीने सायबर सुरक्षा व गुन्हेगारी या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून, सायबर सुरक्षेतील नव्या धोक्यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या व्याख्यानात सायबर सुरक्षा तज्ज्ञ ओंकार गंधे मार्गदर्शन करतील. सोमवार, दि.७ रोजी संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत औरंगाबादकर सभागृह, प.सा. नाट्यमंदिर मागील बाजूस, टिळक पथ, नाशिक येथे हे व्याख्यान होणार आहे. सायबर गुन्हेगारीपासून संरक्षण कसे करावे? डिजिटल माध्यमांचा सुरक्षित वापर कसा करावा? नवीन सायबर धोके कोणते आहेत? या आणि अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर या व्याख्यानात गंधे हे सविस्तर मार्गदर्शन करणार आहे.

### महावीर जयंतीनिमित्त व्याख्यानमाला

**नाशिक :** नाशिक येथील श्री जैन सेवा कार्य समितीच्या



वतीने महावीर जयंतीनिमित्त तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती गौतम सुराणा यांनी दिली. गुरुवार दिनांक १० एप्रिल रोजी माजी मंत्री व आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे लोकसभा व विधानसभेतील गंमती जमती या विषयावर, शुक्रवार दि.११ एप्रिल रोजी सोलापूरच्या खासदार प्रणितीताई शिंदे यांचे लोकशाहीची सद्यस्थिती या विषयावर तर शनिवार दि.१२ एप्रिल रोजी अरविंद सावंत यांचे भारतीय लोकशाहीचे भवितव्य या विषयावर व्याख्यान होणार आहे. प.सा. नाटयगृहात सायंकाळी सात वाजता ही व्याख्याने होणार आहेत. व्याख्यानमाला यशस्वी होण्यासाठी संयोजक गौतम सुराणा. अध्यक्ष सुनील बुरड,उत्सव समिती अध्यक्ष अशोक साखला, कार्याध्यक्ष सुभाष लुणावत, स्वागताध्यक्ष आशिष भन्साळी, अनिल नहार, आशय राका आदी प्रयत्नशिल आहेत. या व्याख्यानमालेत विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. सन १९९७ पासून सुरू झालेल्या या व्याख्यानमालेत न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. निर्मलकुमार फडकुले, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, नितीन गडकरी, मुख्तार अब्बास नक्वी, यशवंत सिन्हा,प्रकाश जावडेकर,पृथ्वीराज चव्हाण,मनोहर जोशी, उज्वल निकम, देवेंद्र फडणवीस, अच्युत गोडबोले, पुष्पा भावे, मेधा पाटकर, मुकेश खन्ना, जयंत पाटील आदींच्या व्याख्यानांचा लाभ नाशिककरांना झालेला आहे. या व्याख्यानमालेमुळे नागरिकांना नवनवीन विचार मिळत असल्याचे गौतम सुराणा यांनी सांगितले.

# सियावर रामचंद्र की जय

## लासलगावला श्रीरामनवमी उत्साहात; मुस्लिम बांधवांकडून पुष्पवृष्टी





लासलगाव : श्रीरामनवमीनिमित्त काढण्यात आलेली शोभायात्रा. (छाया : समीर पठाण)

**लासलगाव : वार्ताहर**

हिंदू बांधवांचे आराध्य दैवत प्रभू श्रीराम नवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव समिती व सकल हिंदू समाज लासलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'सियावर रामचंद्र की जय'च्या जय-घोषात श्रीराम नवमी पारंपारिक व मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातील विविध भागातून टाळ मृदुंगाच्या गजरात भव्य शोभायात्रा व पारंपारिक पालखी मिरवणूक काढण्यात आली.

रविवार (दि.) रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत हनुमान चालीसा पाठ झाल्यानंतर बाबा अमरनाथ मंदीर, एस.टी डेपो येथून संध्याकाळी ५ वाजता भव्य शोभा यात्रेला सुरवात करण्यात आली. विद्युत रोषणाई केलेल्या रथावार प्रभू राम, लक्ष्मण व सीतेचा जिवंत देखावा सादर करण्यात आला होता. यामध्ये रामाच्या वेशभूषेत सलोनी सुरज मालपाणी, लक्ष्मणाच्या वेशभूषेत श्रृष्टी विनोद दाभाडे आणि मातासीतेच्या वेशभूषेत आराध्या ऋषिकेश जोशी यांनी भूमिका साकारली. तसेच बॅण्ड, डीजे यांचे विद्रूपीकरण टाळून शोभायात्रेचे पावित्र्य जपण्यासाठी प्रभु श्रीराम नामाचा गजर करत ५०० वारकरी भजनी मंडळाचे टाळकरी तसेच शोभायात्रेचे मांगल्य वाढवण्यासाठी ५०० कलशधारी महिला यांच्यासह शहरातील सर्वच रामभक्त पारंपारिक पोशाख व भगव्या टोप्या तसेच महिला भगव्या साड्या व टोप्या परिधान करून या शोभायात्रेत सहभागी झाले होते. या शोभा यात्रेत वानरसेनेचे जिवंत प्रतिकृती दर्शन, शिवकालीन प्राचीन युद्ध कला प्रात्यक्षिक, प्रभू रामचंद्रांच्या अलौकिक रथाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते

शोभायात्रेची सांगता झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाप्रसाद भंडारा आयोजित करण्यात आला होता. या शोभायात्रेत व महाप्रसाद भंडाऱ्यात लासलगाव व पंचक्रोशीतील सर्व राम भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. श्रीराम नवमी यशस्वी होण्यासाठी सकल हिंदू समाज व राम भक्त व वारकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### श्रीराम मंदिरात महापूजा, कीर्तन व महाआरती

श्रीराम नवमी निमित्त येथील श्रीराम मंदिरात महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.या महापुजेत नवविवाहित जोडप्यांनी सहभाग घेतला.सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. पंडीत महाराज कोल्हे यांचे रामजन्माचे कीर्तन पार पडले.त्यांच्या प्रभावी आणि रसाळ निवेदनाने वातावरण भक्तिमय झाले.दुपारी १२ वाजता महाआरती पार पडली. कार्यक्रमानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आला.या वेळी राम मंदिर ट्रस्ट चे सर्व पदाधिकारी वर ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

### मुस्लिम बांधवांकडून शोभायात्रेवर पुष्पवृष्टी

लासलगाव शहरात हिंदू आणि मुस्लिमांमध्ये असलेली एकात्मता आणि एकमेकांबद्दलची आस्था पुन्हा समोर आली.हिंदू मुस्लिम बांधवांमध्ये एकोपा वाढवा या उद्देशातून श्रीराम नवमी निमित्त काढण्यात आलेल्या शोभा यात्रेवर मुस्लिम फाउंडेशन लासलगाव यांच्या वतीने पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच शोभयात्रेत सहभागी झालेल्या रामभक्तांना पाणी पिण्यासाठी पाण्याच्या थंड बाटल्या वाटप करण्यात आल्या.या उपक्रमातून सामाजिक एकोप्याच्या संदेश या वेळी देण्यात आला.



## इस्कॉन मंदिरात श्रीराम नवमी उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

द्वारका परिसरातील श्री श्री राधा मदन गोपाल मंदिर (इस्कॉन) येथे श्रीराम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिरातील श्रीश्री राधा मदन गोपालजी व श्री राम लक्ष्मण सीता हनुमान यांच्या उत्सव विग्रहांचा राम नवमीनिमित्ताने विशेष शृंगार करण्यात आला व गर्भगृहाच्या सजावटीसाठी विविध फुलांचा तसेच विविध फळांचा वापर करण्यात आला होता.

उत्सवाला पहाटे ५ वाजता मंगल आरतीपासून सुरुवात झाली व भाविकांनी देखील राम प्रहरापासूनच उत्सवानिमित्त दर्शनासाठी मंदिर परिसरात गर्दी केली होती. मंगल आरती नंतर हरे कृष्ण महामंत्र जप सत्र, गुरु पूजा व त्याला लागूनच भगवंताची श्रृंगार आरती झाली. त्यानंतर राम कथेचे प्रवचन झाले. यावेळी प्रवचनाकरीता खास मुंबई वरून श्रीमान गौरांग प्रभूजी हे उपस्थित होते. श्रीमान गौरांग प्रभू हे आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) चे जी. बी. सी. सदस्य आहेत. गव्हर्निंग बॉडी कमिशन (ऋइउ) हे इस्कॉनचे सर्वोच्च व्यवस्थापकीय आणि निर्णय घेणारे मंडळ आहे जे इस्कॉनच्या जगभरातील कार्यांवर देखरेख ठेवते.

श्रीमान गौरांग प्रभू यांनी श्रवणाचे महत्त्व सांगताना, तिरुपती येथे रामानुजाचार्य यांनी कशाप्रकारे त्यांचे गुरु श्री शैलापूर्ण यांच्याकडून राम कथेचे व राम कथेच्या तत्त्वांचे श्रवण केले व त्यांच्या संवादाचे वर्णन करताना मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री राम हे परम शरण्य आहेत हे सांगितले. त्यांना समर्पण केल्याने भगवंतांच्या सेवेचे फळ मिळते व राम भक्तांचा/ वैष्णवांचा आश्रय घेतल्यानेच त्यांची सेवा करता येते असे सांगितले. श्रीमान गौरांग प्रभू यांच्या मार्मिक प्रवचना नंतर श्री राम लक्ष्मण आणि सीता देविंचा पंचामृत व विविध फळांच्या रसाने अभिषेक झाला. भक्तांनी बनवून आणलेल्या तब्बल १०८ पदार्थांचा भगवंतांना नैवेद्य अर्पण करण्यात आला व नंतर महाआरती करण्यात आली. २५०० भाविकांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंदिराचे अध्यक्ष कृष्णधन प्रभू, गोपालानंद प्रभू, सहस्रशीर्ष प्रभू, सार्वभौम कृष्ण प्रभू, मुकुंदरस प्रभू, रणधीर कृष्ण प्रभू, राजा रणछोड प्रभू, आनंद चैतन्य प्रभू, राग कृष्ण प्रभू, सुमेध पवार, बलरामचंद्र प्रभू, सत्यभामा कुमारी माताजी, प्रेम शिरोमणी माताजी, देवेश गोरे, यश भडके, कृष्णा गुजराथी, ऋषिकेश हंपे आदींनी परिश्रम घेतले.

# आगर टाकळी येथे मुक्ताई हॉस्पिटलचे उद्घाटन उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर तपोवन आगर टाकळी लिंक रोड येथे पोतदार स्कूलजवळ सोनजे नगरात मुक्ताई हॉस्पिटलचे उद्घाटन करण्यात आले.

हॉस्पिटलचे संचालक डॉ. चेतन पाटील यांच्या मातोश्री विजया पाटील यांच्या हस्ते तसेच बी. एम. पाटील, रजनी पाटील, डॉ. दीपाली पाटील, डॉ. आविष्कार पाटील, डॉ. तुषार पाटील, प्रिशा पाटील, मानस पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून आमदार देवयानी फरांदे, प्रा. सुहास फरांदे, माजी आमदार निर्मला गावीत, अजय बोरस्ते, डॉ. हेमलता पाटील, डॉ. सुनील ढिकले, राहुल दिवे, नितीन साळवे, डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, डॉ. अतुल वडगांवकर, डॉ. नारायण देवगांवकर, डॉ. शोधन गोंदकर, डॉ. देवदत्त चाफेकर, डॉ. अनिल जाधव, डॉ. अशोक पिंगळे, डॉ. मनोज चौधरी, डॉ. राहुल कुटे, डॉ. शरद देशमुख, डॉ. योगेश गोसावी, डॉ. हिरालाल पवार, डॉ. हेमंत देवरे, डॉ. योगेश तांबट, डॉ. समिर चंदात्रे, डॉ. शिरीष आढाव, डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. मधुकर सावंत, डॉ. निवेदिता पवार, डॉ. सोनाली पाटील, डॉ. संकेत सोरते, डॉ. प्रशांत पवार, डॉ. समीर तुळजापूरकर, डॉ. अनुज नेहते, डॉ. नरसिंह माने, डॉ. आशुतोष साहु, डॉ. सपना नेरे, डॉ. गितांजली गोंदेकर, डॉ. जयदीप भंबारे, डॉ. प्रसाद सोनवणे, डॉ. सुशील बोरस्ते, डॉ. किरण ओस्तवाल, आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. चेतन पाटील व डॉ. दीपाली पाटील यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले.





नाशिक : मुक्ताई हॉस्पिटलचे उद्घाटन करतांना विजया पाटील समवेत बी.एम पाटील, रजनी पाटील हॉस्पिटलचे संचालक डॉ.चेतन पाटील, डॉ.दीपाली पाटील आदी. (छाया : जगदीश सोनवणे)

### हॉस्पिटलची वैशिष्ट्ये

५० बेडचे सुसज्य हॉस्पिटल असून सर्जिकल व मेडिकल अशा सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. ज्या नागरिकांना आरोग्यविषयी बाबींची गरज आहे त्या नागरिकांनी या हॉस्पिटलची सेवा घ्यावी, असे डॉ. चेतन पाटील यांनी बोलतांना सांगितले.

# हायपर टेन्शनमुळे हृदयविकारात वाढ

## आज आरोग्य दिन : चुकीची जीवनशैली, वाढत्या ताणतणावाचे कारण

**नाशिक : देवयानी सोनार**

हायपर टेंन्शन (उच्च रक्तदाब)मुळे हृदयविकाराच्या झटक्याचे प्रमाण वाढले आहे. वैद्यकीय अहवालांनुसार मागील काही महिन्यात हृदयविकाराच्या तक्रारीसाठी रुग्णालयांमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे. याचे प्रमुख कारण हायपर टेंन्शन (उच्च रक्तदाब) असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

हायपरटेंन्शन हा लवकर लक्षात न येणारा परंतु जीवावर बेतेल असा धोकादायक आजार आहे.यामुळे पॅरालिसीस, हार्टअटॅक, हृदय किंवा किडनी निकामी होणे किंव दृष्टी जाण्यासाठी कारणीभूत ठरू शकते.



एका व्हारल व्हिडीओत एका जोडप्याचा लग्नवाढदिवसाचे सेलिब्रेशन सुरू असतांना त्या व्यक्तीला हार्ट अटॅक आला.अनेकदा मोठमोठे कर्णकर्कश्य आवाज, नाचतांना, स्टेजवर, गाणी म्हणतांना, चालतांना अचानक हृदयविकाराचा झटका आल्याचे उदाहरणे पाहतो. हायपर टेंन्शन (उच्च रक्तदाब) ची कारणे मानसिक तणाव आणि चिंता, जास्तप्रमाणात मीठ, तेलकट आणि जंकफूडचे सेवन, धुम्रपान आणि मद्यपान, व्यायामाचा अभाव, आणि व्यस्त जीवनशैली, लठ्ठपणा आणि मधुमेह, अनुवांशिकता आणि वाढती वयोमर्यादा आदींमुळे उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होऊ शकते असे या विषयातील तज्ज्ञ सांगतात.

**नियमित व्यायाम करा**

हृदयविकार टाळण्यासाठी नियमित योगासने, संतुलित आहार, ताजे फळे, भाज्या, कमी मीठ आणि साखरेचे सेवन, तणावमुक्त राहण्यासाठी ध्यानधारणा आणि पुरेशी झोप, ध्रुमपान आणि मद्यपान टाळणे, नियमित आरोग्य तपासणी करून रक्तदाब नियंत्रित ठेवणे.

**डॉक्टरांचा सल्ला घ्या**

हायपर टेंन्शनवर वेळीच नियंत्रण मिळविण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे. नियमित औषधे घेणे, रक्तदाब नियमित मोजणे आणि हृदयाच्या कार्यक्षमतेवर लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. अत्यंत उच्च रक्तदाब असल्यास वैद्यकिय उपचारांसाठी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वाढत्या स्पर्धात्मक युगात, ताणतणावातून काही क्षण कुटुंब, सहली, मनोरंजन, वाचन, छंद जोपासणे आदींमधून काही क्षण तणावमुक्त राहण्याची कला अंगिकारली तर हृदयविकारच नाही तर अन्य आजारांपासूनही दूर राहता येऊ शकते.

### उपचार आणि वैद्यकीय मदत

हायपरटेंन्शनवर उपचार उपलब्ध असून अत्याधुनिक स्वरूपाची आरडीएन ही प्रक्रिया अद्यावत स्वरूपाच्या कॅथलॅबमध्ये तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली जाते.या प्रक्रियेमुळे आमुलाग्र आणि शाश्वत स्वरूपात रक्तदाबावर अनेक वर्षासाठी नियंत्रण मिळवता येऊ शकते.औषधांवरचे अवलंबित्व कमी होऊन रुग्णांचे जीवनमान सुधारण्यास मदत होते. या उपचारांमध्ये ए.आय.नियंत्रीत रेडिओ फ्रिक्वेन्सीच्या सहाय्याने स्पायरल कॅथेटर हे रेनल आर्टरीज व त्याच्या मुख्य शाखांमध्ये दाखल केल्या जातात.आणि या भागातील संवेदनशील धमण्या काढून टाकल्या जातात.भारतात आतापर्यंत ८६ रुग्णांवर ही उपचार प्रक्रिया करण्यात आली आहे.




ROC 78 AAROGYA




◀◀ यु.टी.आय. मिडकॅप फंड ◀◀ पान ३

नाशिक आज
# गांवकरी



◀◀ अस्थिव्यंग उपचारासाठी मुंबईत मिस्सो रोबोटिक प्रणाली ◀◀ पान ३

■ नाशिक, सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५

**महत्त्वाचे**

## प.पू.स्वामी स्वरूपानंद यांची आजपासून व्याख्यानमाला



**नाशिक :** फुलगांवच्या श्रृतीसागर आश्रम पुणे आणि शिवशक्ती ज्ञानपीठ त्र्यंबकेश्वरचे परमाचार्य प.पू.स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांची व्याख्यानमाला आज सोमवार दि. ७ एप्रिल ते रविवार दि. १३ एप्रिल दरम्यान सायंकाळी ६.३० ते ८ यावेळेत श्री शंकराचार्य न्यास ,गंगापूर रोड येथे होणार आहे. गणपती अर्थशीर्षातील अनेक मंत्रांचा गूढार्थ स्वामीजी विशद करणार आहेत. या व्याख्यानमालेस नाशिककर श्रोत्यांनी आवर्जून उपस्थित रहाव, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सातपूरला डीपीचा स्फोट



**सातपूर :** शहरातील वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या कार्बन नाका चौकातील गोल्डी कंपनी परिसरात इलेक्ट्रिक पोलवरील डीपीला भीषण आग लागून ती पूर्णत: जळून खाक झाल्याची घटना काल दुपारच्या सुमारास घडली. कार्बन नाका चौकातील इलेक्ट्रिक डिपीतून अचानक ठिणग्या पडून काही क्षणातच जोरदार आवाज होऊन डीपीने अचानक पेट घेतला. या आवाजामुळे परिसरातील नागरिकांनी चौकात मोठ्या प्रमाणात गर्दी केली. पाहता पाहता डीपीतून आगीचे लोळ उठत होते.घटनेची माहिती कळताच मात्र परिसरातील नागरिकांनी वीज वितरण कंपनीचे अग्निशमन पथक एक तास उशिरा झाले होते पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. उशीरापर्यंत आग विझविण्याचा प्रयत्न सुरू होते. आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र आगीत इलेक्ट्रिक डीपी पूर्णत: जळून खाक झाली. सुदैवाने कसलीही जीवितहानी झाली नाही मात्र परिसरातील नागरिकांनी वीज वितरण कंपनीची चे अग्निशमन पथक यांना फोन केल्यानंतर एकतास उशीरा दाखल झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर बघायला मिळाला.

## भिवानंद काळे यांना पुरस्कार

**सातपूर :** येथील विविध विकास सहकारी सोसायटीचे उपसभापती तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य भिवानंद काळे यांना संविधान हक्क परिषद व मंत्रालय वार्ता यांच्यातर्फे खासदार शरद पवार यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई मंत्रालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये खासदार चंद्रकांत हंडोरे, आनंदराज आंबेडकर, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, निशाताई भगत, अनिल दत्ताजी शिंदे, किशोरी शहाणे आदी मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## सातपूरला मोकाट कुत्र्यांचा उच्छाद



**सातपूर :** शहरात मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. शहरातील औद्योगिक वसाहतीत रात्री-अपरात्री कुत्रे दंगामस्ती करून नागरिकांची झोपमोड करीत आहेत. त्यामुळे या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. सातपूर शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. शहरातील मुख्य रस्ते, गल्ल्यांमध्ये जथ्थ्याने फिरणाऱ्या या कुत्र्यांमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच दुचाकीवरून जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालिका प्रशासनाने मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी एका एजन्सीची नेमणूक केली आहे, मात्र तरीही कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढताना दिसत आहे. सातपूर शहरात मोकाट कुत्र्यांनी सातपूर शहरातील औद्योगिक वसाहतीत तसेच काही स्लम भागाचा ताबा घेतला आहे. कुत्र्यांनी वृद्ध व्यक्तींना चावा घेतल्याच्या घटना घडल्याचे रहिवाशांनी सांगितले. सकाळ-संध्याकाळी सर्वच रस्त्यांवर कुत्र्यांची गर्दी दिसून येते. सातपूर परिसरात चिकन बिर्याणी, रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे लावण्यात येणाऱ्या चायनीज हातगाडीवाले टाकाऊ खाद्यपदार्थ रस्त्यालगत असलेल्या नाल्यात टाकून पसार होतात. त्यामुळे मोकाट कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

> सातपूर भागात मोकाट कुत्र्यांच्या आवाजामुळे रहिवाशांची झोप उडाली आहे. याविषयी पालिका आयुक्तांची भेट घेऊन उपाययोजना करण्यासाठी निवेदनाद्वारे मागणी करणार आहे
>
> **- विशाल भदर्गे,** सामाजिक कार्यकर्ते

## सुदाम डेमसेंच्या हस्ते प्रभू श्रीरामाची आरती



**सिडको :** मुंबई महामार्गावरील खत प्रकल्पाच्या प्रवेशद्वारावर असलेल्या श्रीराम मंदिरात रामनवमीच्या पवित्र दिवशी शिवसेनेचे माजी नगरसेवक सुदाम डेमसे यांच्या हस्ते प्रभू श्रीरामचंद्राची आरती करण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमात खत प्रकल्पावरील कर्मचाऱ्यांसह परिसरातील नागरिक आणि विविध मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी महानगरपालिका तांत्रिक विभागाचे अभियंता माळी, खत प्रकल्प व्यवस्थापन कंपनीचे मॅनेजर राठी, तसेच भास्कर बोराडे, संजय बोराडे, अमोल दाभाडे, मिलिंद खिल्लारे, महेश श्रीवास्तव आणि कंपनीतील सर्व कर्मचारी उपस्थित होते. या आरतीसाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आणि प्रभू श्रीरामचंद्राच्या चरणी प्रार्थना केली.







# राम जन्मला गं सखे राम जन्मला!

## सियावर रामचंद्रकी जयच्या घोषात जन्मोत्सव साजरा

**पंचवटी : वार्ताहर**

**काळाराम मंदिरात जय श्रीराम, सियावर रामचंद्र की जय, जय सीता राम सीता अशा नामघोषात दुपारी बारा वाजता श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी हजारो भाविकांनी काळारामाचे दर्शन घेतले. परिसरातील गोराराम, बायकांचा राम, श्रीराम अशा विविध मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पंचवटीतील काळाराम मंदिरात काल श्रीराम नवमीच्या दिवशी रामजन्मज्ञचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**



पहाटे पाच वाजता प्रभू रामचंद्रांची काकड आरती करण्यात आली. त्यानंतर काळारामाला अवभृत स्नान घालण्यात आले. यानंतर महाभिषेक आणि पूजा विधी करण्यात आले. हेमंतबुवा अनंत पुजारी यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. दुपारी बाराच्या ठोक्याला मंदिरातील मुख्य गाभाऱ्यातील श्री काळाराम यांच्या मूर्ती समोरील पडदा हटवून रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. तसेच याठिकाणी ठेवण्यात आलेल्या पाळण्यातील प्रभू रामचंद्रांच्या मूर्तीना झोका देऊन हलविण्यात आले.

यावेळी हजारो रामभक्तांनी श्रीरामाचा एकच जल्लोष करीत प्रभू रामचंद्र की जय, सियावर रामचंद्र की जय अशा घोषणा देत संपूर्ण मंदिर परिसर दणाणून सोडला. यासाठी कपालेश्वर येथील वाद्य पथक, पारंपारिक वाद्य, ढोल ताशे यांचा देखील याठिकाणी जल्लोष सुरु होता.


महिलांचा यावेळी सहभाग लक्षणीय दिसत होता. यावेळी माहेरवाशीण महिलांनी या काळाराम मंदिरात आपल्या पारंपारिक वेशभूषा धारण करून रामजन्माच्या गाण्यांवर नृत्य सादर केले. तर अनेक महिलांनी याठिकाणी फुगड्यांचा आनंद घेतला. संपूर्ण काळाराम मंदिराच्या प्रांगणात मोठ्या रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.

काळाराम मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येऊन फुलांनी सजावट केल्याने मंदिराच्या वैभवात भर पडली होती. रामजन्म झाल्यावर नागरिकांनी दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी पोलिस व होमगार्ड यांनी देखील तगडा पोलिस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता.

रात्री अन्नकुट मध्ये भगवान रामचंद्रांना ५६ पदार्थांचा नैवद्य (भोग) दाखविण्यात आला. या अन्नकुटसाठी मंदिराचे असलेल्या पुजाऱ्याच्या प्रत्येक घरातून एक पदार्थ बनवून आणण्यात आला होता. भाविकांनी काळारामाचे दर्शन घेण्यासाठी रात्री उशिरा पर्यंत लांबच लांब रांगा लावल्या होत्या.

संस्थानतर्फे याठिकाणी महाप्रसादाचे वाटप देखील करण्यात आले. यावेळी अध्यक्ष, श्री काळाराम संस्थान, नाशिक तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनिलकुमार लोकवानी, विश्वस्त, धनंजय पुजारी, मंगेश पुजारी ,नरेश पुजारी, मंदार जानोरकर, डॉ. एकनाथ कुलकर्णी अॅड.दत्तप्रसाद (अजय) निकम, दिलीप रंगनाथराव कैचे, सी.ए. शुभम मंत्री, शांताराम अवसरे, मिलिंद तारे उपस्थित होते. मंदिराचा मुख्य पूर्व दरवाजाने भाविकांना प्रवेश आणि उत्तर व दक्षिण दरवाजाने भाविकांना बाहेर सोडण्यात येत होते.

यावेळी पंचवटीचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



## प्रभू श्रीराम हे सर्वांचेच : सपकाळ

### संविधान हाती घेऊन मंदिरात प्रवेश

**नाशिक/पंचवटी : प्रतिनिधी**

नाशिकच्या ऐतिहासिक काळाराम मंदिरातील प्रवेशासाठी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आंदोलन केले होते पण तत्कालीन व्यवस्थेने त्यांना मंदिर प्रवेश नाकराला होता. आज रामनवमीचे औचित्य साधत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भारताचा नागरिक या नात्याने बाबासाहेबांनी लिहिलेले पवित्र संविधान हाती घेऊन काळाराम मंदिरात प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासोबत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू कॅप्टन कुणाल गायकवाड, खा. शोभा बच्छाव व शेकडो कार्यकर्त्यांनी प्रभू रामाचे दर्शन घेतले.

यावेळी महंत सुधीरदास यांनी १९३० साली मंदिरात प्रवेशापासून अडवणारे महंत हे माझे आजोबाच असल्याचे सांगून त्याबद्दल माफी मागून कुणाल गायकवाड यांचे मंदिरात स्वागत केले. यावेळी सपकाळ यांनी महंत सुधीरदास यांना भारतीय संविधानाची प्रत भेट दिली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना सपकाळ म्हणाले की, मर्यादा पुरुषोत्तम प्रभू राम हे सर्वांचे आहेत, ते भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग आहेत. आज राम नवमीनिमित्त काळाराम मंदिरात जाऊन प्रभू रामाचे दर्शन घेतले व देशात व राज्यात समतेचा, बंधुत्वाचा व संविधनाचा विचार नांदावा, अशी कामना व्यक्त केली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी १९३० ते १९३५ अशी पाच वर्ष १७ दिवस सत्याग्रह केला पण त्यांना मंदिरात प्रवेश नाकारला पण आज दादासाहेबांचे नातू कॅप्टन कुणाल गायकवाड यांच्यासह आम्ही प्रभू रामाचे दर्शन घेतले आणि मंदिरात महंतांनी आमचे स्वागत केले.

**शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणार**

शेतकरी आस्मानी आणि सुल्तानी संकटांनी हवालदिल झाला आहे. पिकविम्याचे पैसे न देऊन शेतकऱ्यांना सुल्तानी संकटात टाकले आहे. तर अवकाळी पाऊस गारपीट यामुळे शेतकरी संकटाचा सामना करत आहे. शासनाने शेतकऱ्यांना मदत करून दिलासा द्यावा, शेतकऱ्यांसाठी काँग्रेस आंदोलन उभारणार आहे.

**मूळ मुद्द्यावरून भरकटवण्याचा डाव**

मूळ मुद्द्यावरून जनतेला भरकटवण्याचे काम महायुती सरकार करत असल्याचा आरोप सपकाळ यांनी केला.राष्ट्रीय स्मारके सर्वांनी एकत्र येऊन जतन करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. महाराष्ट्रात जातीयता पसरवण्याचे काम केले जात आहे. महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा कायम रहावा, यासाठी सदभावना काँग्रेसकडून काढण्यात येणार असल्याचे सपकाळ म्हणाले.

# राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे

## शहरासह उपनगरांमध्ये रामनवमीचा उत्साह

**नाशिक : प्रतिनिधी**

**राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे। सहस्त्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने**

रामरक्षा स्तोत्राचे पठण, राम आयेंगे, रामजी की निकली सवारी आदी स्तोत्र रामगींतांनी रामनवमीचा काल शहरभर उत्साह पाहावयास मिळाला. मंदिरात तसेच सार्वजनिक ठिकाणी प्रभु श्रीरामाच्या गीतांनी वातावरण प्रसन्न झाले होते. प्रभु रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिकनगरीत काल रामजन्मोत्सव उत्साहात साजरा झाला.




पंचवटी येथील काळाराम मंदिरासह शहर आणि उपनगरातील राममंदिरांमध्ये भाविकांनी पहाटपासून दर्शनासाठी गर्दी केली होती. चैत्र शुद्ध नवमी अर्थात रामनवमीनिमित्त राममंदिरांची सजावट करण्यात आली होती. रांगोळी, फुलांचे तोरण, लायटींगच्या माळा आदींनी मंदिर परिसर सुशोभित करण्यात आला होता. दुपारी बारा वाजता श्रीरामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी आरती, अभिषेक, रामचरित मानस पाट, सुंदरकांड पाठ, महाआरती, महाप्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिर परिसरात हंगामी व्यावसायिक तसेच फळ, फुल, प्रसादाची विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. अयोध्येतील राममंदिर प्राणप्रतिष्ठेच्या पार्श्वभूमीवर रामलल्लाचे फोटो रामनवमीनिमित्त सूर्यतिलक यांचे फोटो, व्हिडिओ आदी शेअर, व्हायरल करण्यात आले. अयोध्या राममंदिरात भगवान राम लल्लांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाशिकच्या काळारामाचे दर्शन घेतल्यापासून राजकीय नेते, मान्यवरांच्या भेटींचा ओघ कायम दिसून येत असून रामनवमीच्या पार्श्वभूमीवरही शहरातील राजकिय नेत्यांसह सामान्य भाविकांनही दर्शन घेतल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले.

## काळाराम मंदिरात नेत्यांची मांदियाळी

**नाशिक : प्रतिनिधी**

**रामनवमीनिमित्त शहरातील काळाराम मंदिरात भाविकांबरोबरच राजकीय मंडळींनीही दर्शनासाठी काल गर्दी केली होती. रामनवमीमुळे राजकीय मंडळींची मोठी मांदियाळी येथे पाहावयास मिळाली. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, .खा. डॉ.शोभा बच्छाव यांच्यासह शिवसेनेचे नेते संजय राऊत, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही नाशिक दौऱ्यात काळाराम मंदिरात जाऊन दर्शन घेतले.**



रामनवमीमुळे काळाराम मंदिरात काल भाविकांबरोबरच राजकीय मंडळींनीही प्रभु श्रीरामाचे दर्शन घेतले. नाशिक पूर्वचे आमदार अॅड. राहुल ढिकले, आ. देवयानी फरांदे, आ. पंकज भुजबळ, माजी खासदार हेमंत गोडसे राष्ट्रवादी काँग्रेसचे रंजन ठाकरे, माजी आमदार वसंत गिते, शिवसेना उपनेते सुधाकर बडगुजर, शिवसेना जिल्हाप्रमुख डी.जी. सूर्यवंशी, माजी नगरसेवक विलास शिंदे यांच्याबराबेरच जिल्हाधिकारी जलज शर्मा, महापालिका आयुक्त मनिषा खत्री, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महापालिका विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र या अधिकाऱ्यांनीही काळारामाचे दर्शन घेतले.

## इंदिरानगरच्या दत्त मंदिरात कीर्तन महोत्सवाला प्रारंभ

**सिडको :** इंदिरानगर येथील श्री गुरुदेव दत्त मंदिराच्या रौप्य महोत्सवानिमित्त रामनवमी ते हनुमान जयंतीपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. सकाळी हभप प्रेरणा बेळे यांचे राम जन्माचे तर सायंकाळी स्मिता आजेगावकर यांचे कीर्तन झाले. मंगळवार दि. ८ रोजी संध्याकाळी विलास बुवा गरवारे,दि.९ रोजी रोहिणी परांजपे, दि.१० रोजी सात वाजता डॉ अवंतिका टोळे यांचे तर शुक्रवार दि ११ रोजी संध्याकाळी अंबिका लिंबेकर यांचे कीर्तन होणार आहे.दिनांक १२ रोजी संध्याकाळी सात वाजता सृजनानंद प्रस्तुत गदिमा आणि बाबूजी यांची अजरामर कलाकृती गीत रामायण संजय अडावदकर आणि सहकलाकार सादर करणार आहेत. ऋणमुक्तेश्वर महादेव मंदिर, स्वामी समर्थ नगर, ज्ञानेश्वर नगर, चेतनानगर येथील मंदिरातही राम नवमी सोहळा पार पडला



## अग्रलेख

# जागतिक व्यापार युध्द



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फोडलेल्या 'टॅरिफ बॉम्ब'चे परिणाम जगावर कसे आणि काय होणार? याचे उत्तर देणे तसे अवघड असले, तरी त्याचे तीव्र पडसाद जगभरात उमटू लागले आहेत. जगभरात आता व्यापार युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अमेरिका आणि चीन यांच्यात तसे सख्य नाहीच. अमेरिकन उत्पादनांवर ३४ टक्के अतिरिक्त शुल्क लावून चीनने ट्रम्प यांना जशास तसे उत्तर दिले आहे. अमेरिकेने 'जशास तसे' कर लावल्याप्रकरणी जागतिक व्यापार संघटनेत तक्रारही चीनने दाखल केली आहे. तसेच चीनने ११ अमेरिकन संरक्षण कंपन्यांना काळ्या यादीत टाकले असून १६ अमेरिकन कंपन्यांच्या निर्यातीवर नियंत्रण आणण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी ट्रम्प विराजमान झाल्यानंतर अमेरिका व चीनमध्ये तणाव वाढला आहे. अमेरिका आंतरराष्ट्रीय व्यापार नियमांचे पालन करत नाही. त्यामुळे चीनच्या कायदेशीर अधिकार व हिताला बाधा पोहचत असून अमेरिकेची कार्यवाही एकतर्फी असल्याचे चीनने म्हटले आहे. अमेरिकेने लादलेल्या शुल्काच्या बाबतीत व्हिएतनामचे उपपंतप्रधान वू वान निन लवकरच अमेरिकेला भेट देऊन ट्रम्प त्यांच्याशी चर्चा करणार आहेत. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा हेही अमेरिकेला जाणार आहेत. ट्रम्प प्रशासनाने संपूर्ण जगावर लादलेले आयात शुल्क अर्थशास्त्राच्या नियमानुसार नाही, असे अनेक देशांना वाटत आहे. हे सर्व कर/शुल्क मनमानी पद्धतीने लावलेले आहेत. असे अनेक देशांचे म्हणणे आहे. भारतावर अमेरिकेने २६ टक्के आयात शुल्क लावले आहे. भारत अमेरिकन वस्तूंवरील आयात शुल्क कमी करेल, अशी अपेक्षा ट्रम्प यांना असली, तरी भारताने अद्याप कोणतेही शुल्क अथवा तर कमी केलेले नाहीत. अमेरिकन वस्तूंवर भारताकडून मोठ्या प्रमाणात शुल्क लादले जाते, हा ट्रम्प यांचा आरोप जगजाहीर आहे. ट्रम्प आणि आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दोस्ती जगजाहीर असली, तरी कर आणि शुल्काच्या बाबतीत दोन्ही देश आपआपल्या भूमिकांवर ठाम असल्याचे दिसून येत आहे. ट्रम्प यांच्या या धोरणांकडे जगातील अनेक देश आपापल्या दृष्टिकोनातून पाहत आहेत. त्यातच आपली धोरणे कधीही बदलणार नाहीत, असे ट्रम्प यांनी जाहीर केल्याने त्यांची मनधरणी करणे आणि आपल्या देशावर लादलेले शुल्क कमी करण्याचा कोणत्याही देशाने प्रयत्न केला, तरी तो यशस्वी होण्याची शक्यता काही दिसत नाही. ट्रम्प यांच्या धोरणाचा परिणाम जागतिक शेअर बाजारांवर झाला आहे. अमेरिकन शेअर्समध्ये मोठी घसरण झाली आहे. एस अँड पी-५०० इंडेक्समध्ये ६ टक्के घसरण झाली. यामुळे गुंतवणूकदारांचे जवळपास ५ ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाले. भारतातील शेअर बाजारही घसरले आहेत. अमेरिकेत गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांबाबत कठोर भूमिका ट्रम्प यांनी घेतली आहे. गुंतवणूकदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असताना त्यांनी अमेरिकेत येणाऱ्या आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणाऱ्या अनेक गुंतवणूकदारांसाठी आपली धोरणे कधीही बदलणार नाहीत, असे स्पष्ट करताना श्रीमंत होण्यासाठी ही उत्तम वेळ आहे. पूर्वीपेक्षाही अधिक श्रीमंत होण्याची वेळ आली आहे, असे त्यांनी म्हटले आहे. मोठे व्यवसाय/उद्योग शुल्काबद्दल चिंतित नाहीत, कारण त्यांना माहित आहे की हे शुल्क कायम राहतील. त्यांचे लक्ष मोठ्या, महत्त्वाच्या करारांवर आहे, जे आपल्या अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला गती देतील, असेही ते म्हणाले. मूळात कोणत्याही देशाने आयात वस्तूंवर शुल्क/कर वाढविले, तर त्या वस्तू त्या देशातील लोकांना महाग पडतात. याचा विचार करता अमेरिकन लोकांना भारत, चीन, कॅनडा, मेक्सिको, व्हिएतनाम, जपान अशा अनेक देशांकडून आयात होणार्या वस्तू स्वस्तात मिळणार नाहीत. वस्तू महागात मिळत असतील, तर लोक स्वस्त वस्तूंचा बाजारात शोध घेतात. त्यामुळे त्या देशाचा आयात शुल्कातून मिळणारा महसूल कमी होत जातो. अमेरिकेच्या बाबतीत हेच घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. जगभरातील देश अमेरिकन वस्तूंवर भरमसाठ आयात शुल्क लादत असल्याने अमेरिकन वस्तूंना आंतराष्ट्रीय बाजारात मागणी वाढत नाही. हेच लक्षात घेऊन अमेरिकन वस्तूंवरील आयात शुल्क/कर कमी करावेत, अशी ट्रम्प यांची भूमिका आहे. पण, जगभरातील देश तसे काही करण्यास तयार नाहीत म्हणून ट्रम्प यांनी रेसिप्रोकल टॅक्स (परस्पर कर) लावण्याचा निर्णय घेतला. तुम्ही जितके कर लादाल तितकेच किंवा त्यापेक्षा अधिक कर आम्ही लादू म्हणजे 'जशास तसे' ही भूमिका ट्रम्प यांनी घेतली आहे. अमेरिकेने भारतावरील आयात करात कपात केली आहे. हा कर २७ वरून २६ टक्के केला आहे. यापूर्वी अमेरिकेच्या कागदपत्रानुसार, भारतावर २७ टक्के कर लावला होता. हा तर चीनपेक्षा कमी आहे. ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. पण, ट्रम्प यांच्या भूमिकेने जगावर आर्थिक मंदीचे सावटही आले आहे. 'टॅरिफ' वॉरमुळे २०२५ मध्ये जागतिक मंदी येण्याची शक्यता ६० टक्के आहे, असा अंदाज अमेरिकेतील जे. पी. मॉर्गन बँकेचे मुख्य अर्थतज्ज्ञ ब्रूस कासमॅन यांनी दिला आहे. गोल्डमन सॅकने येत्या १२ महिन्यांत मंदीची शक्यता ३५ टक्के असल्याचे जाहीर केले. अमेरिकेचा विकास दर घटणार असून, बेरोजगारीचा दर वाढेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याचा सरळ अर्थ संभाव्य जागतिक मंदीचा फटका अमेरिकेला बसण्याची शक्यता अधिक आहे. तरीही श्रीमंत होण्याची हीच वेळ असल्याचे ट्रम्प म्हणत आहेत. जगप्रसिद्ध गुंतवणूकदार व उद्योगपती वॉरेन बफे यांनी ट्रम्प यांच्या शुल्क धोरणावर गेल्या महिन्यात टीका केली होती. हे एकप्रकारे युद्धासारखे पाऊल असल्याचे त्यांनी म्हटले होते. शुल्क वाढीमुळे मोठ्या प्रमाणात महागाई वाढवू शकते आणि त्याचा थेट परिणाम सामान्य ग्राहकांवर होऊ शकतो. शुल्क म्हणजे वस्तूंवर एक प्रकारचा कर आहे, ज्याचा परिणाम शेवटी ग्राहकांवर होतो. हे एक प्रकारचे युद्धच आहे, असेही त्यांनी म्हटले होते. वस्तूंवरील कराचा भरणा ग्राहकांना करावा लागतो. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे दीर्घकालीन परिणाम समजून घेणे महत्त्वाचे आहे, असेही बफे त्यांनी म्हटले होते. कोण काय म्हणत आहे, याकडे ट्रम्प यांनी साफ दुर्लक्ष केले आहे. 'अमेरिका फर्स्ट' हे त्यांचे ध्येय आहे. त्यासाठी व्यापार युध्द छेडले गेले असेल, तर त्याचे परिणाम अमेरिकेसह संपूर्ण जगाला भोगावे लागतील.

# सम्राट अशोक : भारताचा तिसरा मौर्य सम्राट

(भाग : २)

अशोकाचे शिलालेख हे ब्राह्मी, खरोष्टी आणि अरेमाइक या तीन लिपींमध्ये आढळले आहेत. त्यातील अनेक अभिलेख हे ब्राह्मी लिपीतील असून ते जेम्स प्रिन्सेप यांनी वाचले, त्यातूनच या चक्रवर्ती सम्राटाच्या आयुष्याची आणि एकूणच मौर्य साम्राज्याविषयीची सखोल माहिती हीअभ्यासकांना मिळालेली आहे अशोकाने आपल्या शिलालेखामध्ये स्वतःला देवानाम प्रिय असे संबोधले आहे. कलिंग युद्ध कलिंग युद्धानंतर त्याचे झालेले मनपरिवर्तन, त्याने स्वीकार केलेल्या बौद्धधर्म, बौद्ध धर्माची तत्त्वे आणि एकूणच धर्मप्रसाराचे कार्य महान आहे, मात्र यांची नेमणूक या सर्व घटनांचा उल्लेख हा शिलालेखात आलेला आहे. सम्राट अशोक हा या काळातील भारतातील पहिला चक्रवर्ती राजा होय. सम्राट अशोकाने प्रशासकीय संदर्भाने अनेक महत्त्वपूर्ण बदल केले प्रशासनामध्ये महामांत्रा हे पद निर्माण करून धर्मप्रसाराला उत्तेजन दिले. आपल्या मुलांनादेखील धर्मप्रसारासाठी त्यांनी देशाबाहेर जाण्यासाठी प्रेरणा दिली प्रजा कल्याणाचे हेतूने अनेक उपक्रम हाती घेतले अनेक ठिकाणी धर्मशाळा बांधल्या रस्त्याच्या दुतर्फा झाडी लावून लोकांना आवश्यक त्या सुविधा देण्याचा प्रयत्न केला.

अशोक जसजसा सेनानी म्हणून परिपक्व होत गेला तसतसे त्याच्या भावांचा त्यावरील दुःस्वासही वाढत गेला. अशोकांनी मौर्य सैन्याच्या अनेक तुकड्यांचे यशस्वीपणे नेतृत्व केले होते. तसेच त्यांच्या एका मागोमागच्या मोहिमांमुळे त्यांची राज्यभर कीर्ती दुमदुमू लागली. त्यामुळे त्याच्या भावांना असे वाटले की बिंदुसार अशोकला सम्राट बनण्यास प्राधान्य देतील. बिंदुसारचा ज्येष्ठ पुत्र सुसीम हा अशोकचा दुःस्वास करण्यात आघाडीवर होता. सुसीमने अशोकला व्यस्त ठेवण्यासाठी जेथे सुसीम अधिकारी असताना अनेक उठाव झाले होते तेथे, तक्षशिला येथील मोहिमेवर पाठवण्यास सांगितले.

अशोक येण्याच्या बातमीने उठाव शमला व अशोकची कीर्ती अजून वाढत गेली. त्या भागात पुन्हा उठाव झाला परंतु तो क्रूरतेने चिरडला गेला. अशोकांच्या यशाने त्यांच्या भावांचा दुःस्वास अजून वाढला, घरातील वाढत्या अशांततेमुळे व सुसीमने बिंदुसारला अशोकाविरुद्ध भडकावले, या वादातून तात्पुरता मार्ग म्हणून



**५ ते १४ एप्रिल : अशोकाष्टमी.**
**सम्राट अशोक जयंती**
**सप्ताहानिमित्त विशेष लेखमाला.**

बिंदुसारने अशोकला काही काळ अज्ञातवासात जाण्याचा सल्ला दिला, तो त्यांनी पाळला. या काळात अशोकने कलिंगमध्ये जाऊन वास्तव्य केले. या काळात त्यांची कौरवाकी या कोळी मुलीशी ओळख झाली. ती नंतर अशोकची दुसरी अथवा तिसरी पत्नी बनली. अशोकच्या काही कोरीवकामांवर तिचे उल्लेख आहेत. मध्यंतरीच्या काळात उज्जैन मध्ये हिंसक उठाव झाला, बिंदुसारने अशोकला अज्ञातवासातून बाहेर येऊन हा उठाव शमवण्यास सांगितले. अशोक उज्जैनला गेला व एका लढाईत घायाळ झाला. त्या काळात असे मानतात की सुसीमद्वारे अशोकवर अनेक हिंसक हल्ले झाले, जे परतावून लावण्यात आले. अशोकची शुश्रूषा करण्यासाठी बौद्धधर्मी परिचारकांची नेमणूक करण्यात आली होती. यातील एक परिचारिका देवी हिच्याशी अशोकचा विवाह झाला. देवी ही विदिशा येथील एका व्यापाऱ्याची मुलगी होती. ती बौद्धधर्मी असल्याने बिंदुसाराला हा विवाह पसंत पडला नाही. त्याने अशोकला पाटलीपुत्रमध्ये रहाण्यास मनाई केली व अशोकला उज्जैन येथील प्रमुख करून टाकले. अशोकांची पुढील काही वर्षे शांततामय गेली. बिंदुसारचे इसवी सनपूर्व २७३ मध्ये निधन झाले व सुसीम अशोकचा काटा काढण्यास अजून सक्रिय झाला. या प्रयत्नांत देवीवर प्राणघातक हल्ला करण्यात आला, त्यात अशोकची आई मारली गेली. या घटनेने संतप्त झालेल्या अशोकाने पाटलीपुत्रवर आक्रमण केले व लवकरच पाटलीपुत्रचा पाडाव केला. आपल्या सर्व बंधूंची हत्या केली. यानंतर अशोकाची महत्त्वाकांक्षा वाढीस लागली. मगध साम्राज्याचा सम्राट बनून त्याने अनेक प्रांत एकामागोमाग पार करण्याचा सपाटा लावला. या काळात अशोकला चंड-अशोक म्हणू लागले व एक क्रूरकर्मा अशी त्याची ओळख तयार होऊ लागली.

**कृष्णकुमार निकोडे**
**९४२३७१४८८३**

राज्यारोहण झाल्यानंतर आठ वर्षांच्या काळात अशोकने अनेक प्रदेश मगध साम्राज्याला जोडले व मौर्य साम्राज्याचा विस्तार पूर्वेस ब्रम्हदेशाच्या सीमेपर्यंत तर पश्चिमेकडे बलुचिस्तान-इराणच्या सीमेपर्यंत, उत्तरेस अफगाणिस्तान व दक्षिणेस केरळ पर्यंत वाढवला. जवळपास सर्व भारत त्याने एका साम्राज्याच्या छायेत आणला व आपली एकछत्री सत्ता लागू केली. संपूर्ण हिंदुस्थानात एकछत्री साम्राज्य उभारणारा चक्रवर्ती सम्राट म्हणून अशोकाच्या नावाचा उल्लेख करावा लागतो रोमिला थापर यांनी अशोकाच्या कार्याचा विशेष गौरव केलेला आहे. बौद्ध धम्माचा स्वीकार व प्रसार: अशोकांनी कलिंगचे युद्ध पार पडल्यानंतर जिकलेल्या रणांगणाची व शहरांची पहाणी करायची ठरवली, व त्यावेळेस त्याने फक्त सर्वत्र पडलेले प्रेतांचे ढीग, सडण्याचा दुर्गंध, जळलेली शेती, घरे व मालमत्ता पाहिली. ते पाहून अशोकाचे मन उदास झाले व यासाठीच का मी हे युद्ध जिंकले, व हा विजय नाही तर पराजय आहे, असे म्हणून स्वतःला त्या प्रचंड विनाशाचे कारण मानले. हा पराक्रम आहे की दंगल? बायका मुले व इतर अबलांच्या हत्या कशासाठी? आणि यात कसला पराक्रम? असे स्वतःलाच प्रश्न विचारले. एका राज्याची श्रीमंती वाढवण्यासाठी दुसऱ्या राज्याचे अस्तित्वच हिरावून घ्यायचे? ह्या विनाशकारी युद्धानंतर शांती, अहिंसा, प्रेम, दया ही मूलभूत तत्त्वे असलेला बौद्ध धर्मीयांचा मार्ग अशोकाने अवलंबायचे ठरवले. त्याने स्वतः बौद्ध धर्माचा प्रसारक म्हणूनही काम करायचे ठरवले. यानंतर अशोकाने केलेले कार्य त्याला इतर कोणत्याही महान सम्राटांपेक्षा वेगळे ठरवतात. ज्यात क्रूरकर्मा राज्यकर्त्याचे महान दयाळू सम्राटात रूपांतर झाले. अशी कलिंगचे युद्ध ही इतिहासातील एक अतिशय वेगळी घटना समजली जाते. बौद्ध धर्माचा जगभर झालेल्या प्रसारास खूप मोठ्या प्रमाणावर अशोकाने केलेले कार्य जबाबदार होते असे बहुतेक इतिहासकार मानतात. अशोकाने पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलावली होती बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले अग्नीय अशिया आणि मध्य आशिया येथील देशांमध्ये त्याने धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्खू पाठवले होते त्याने अनेक स्तूप आणि विहार बांधले.

**(क्रमशः)**

# दररोज मंद विषाचे सेवन

आजच्या आधुनिक युगात माणसाने जशी प्रगती केली आहे, त्याच प्रमाणात, आरोग्याशीही तडजोड झाली आणि ती काळानुसार सतत वाढत आहे, ज्याचे कारण मानव स्वतः आहे. हृदयरोग, मेंदूचा झटका, कर्करोग यासारखे प्राणघातक आजार झपाट्याने वाढत आहेत, त्यासोबतच मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा, अशक्तपणा, आहारात पोषक तत्वांचा अभाव या समस्या शिगेला पोहोचल्या आहेत, त्यामुळे अकाली मृत्यूची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

प्रदूषण आणि अस्वच्छता आपला श्वास रोखत आहेत. २०२४ च्या एअर क्वालिटी इंडेक्सच्या आकडेवारीनुसार, भारत जगातील पाच सर्वात प्रदूषित देशांमध्ये समाविष्ट आहे. भारतातील सुमारे ७० टक्के पाणी प्रदूषित आहे आणि देशातील जवळजवळ अर्ध्या नद्या पिण्यासाठी किंवा सिंचनासाठी असुरक्षित आहेत, यामुळे, २०२४ च्या जागतिक जल गुणवत्ता निर्देशांकात भारत १२२ देशांपैकी १२० व्या क्रमांकावर आहे. २०२३ मध्ये बीएमजेमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले की भारतात दरवर्षी २.१८ दशलक्ष मृत्यू बाहेरील वायू प्रदूषणामुळे होतात. लॅन्सेट २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की भारतात ५,००,००० हून अधिक मृत्यू जल प्रदूषणामुळे झाले आहेत. देशात हजारो कोटी रुपयांच्या बनावट औषधांचा मोठा व्यवसाय आहे, मोठ्या सरकारी रुग्णालयांमध्येही रुग्णांना बनावट औषधे वाटली जातात. आशियातील सर्वात मोठ्या रुग्णालयांमध्ये समाविष्ट असलेल्या महाराष्ट्र राज्यातील नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ही घटना नुकतीच उघडकीस आली.

**डॉ. प्रीतम गेडाम**
**८२३७४१७०४१**

धान्य पिकवण्यापासून ते आपल्या ताटात वाढण्यापर्यंत, त्यांना अनेक हानिकारक रासायनिक प्रक्रियांमधून जावे लागते. देशात अशुद्ध अन्न आणि अस्वच्छतेची समस्या खूप मोठी आहे. लोक स्वार्थ आणि लोभात इतके आंधळे झाले आहेत की ते एका रुपयाच्या फायद्यासाठी देखील इतरांना विष पाजण्यास तयार आहेत. अलिकडेच कोल्हापूरमधून बातमी आली की मृतदेहांवर वापरला जाणारा बर्फ बाजारात मिळणाऱ्या थंड पेयांमध्ये वापरला जात आहे. आश्चर्यकारक आहे, की आपल्या देशात जेवळे दूध उत्पन्न होत नाही त्यापेक्षा जास्त दूध विकल्या जाते. देशातील ६८.७ टक्के दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये प्रदूषक आढळून आले आहेत. तेल, तूप, गोड, नमकीन आणि मैदा सारख्या अन्नपदार्थांची मोठी मागणी आहे, जेव्हाकी ह्या पदार्थांचा आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. मध, मसाले, चहापत्ती, तेल, दूध, मिठाई, तूप आणि केशर सारख्या अन्नपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ आहे. बाहेरील खाद्यपदार्थांचे रंग खूपच चटक आणि आकर्षक दिसतात. बहुतेक खाद्यपदार्थांना रंग देण्यासाठी नैसर्गिक रंगांऐवजी हानिकारक कृत्रिम रंगांचा वापर केला जातो. अन्नपदार्थांमध्ये वापरले जाणारे बाह्य बर्फ, पाणी, चटण्या, सॉसेज, खाद्यतेल हे बहुदा कमाल दर्जाच्या मानकांची पूर्तता करत नाहीत. देशातील बहुतेक स्ट्रीट फूड विक्रेत्यांना ग्लब्स न घालता थेट अन्नपदार्थांना स्पर्श करण्याची खूप वाईट सवय आहे. याचे गंभीर परिणाम ग्राहकांच्या आरोग्याला भोगावे लागत आहे. आपल्या सभोवतालचे वातावरण आणि आपली जीवनशैली आपल्याला अकाली मृत्यूकडे वेगाने घेऊन जात आहे. अनेक अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबद्दल शंका निर्माण होते, तरीही हे अन्नपदार्थ रस्त्यावर, रेल्वेवर, बसस्थानकांवर आणि सार्वजनिक ठिकाणी खुलेआम विकले जातात. आपले आरोग्य आणि आपल्या प्रियजनांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपली स्वतःची जबाबदारी आहे.

# मानवी संस्कृती धोक्यात आहे का ?

थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणाले होते, तिसऱ्या महायुद्धामध्ये कोणती शस्त्रास्त्रे वापरली जातील याची मला कल्पना नाही, मात्र चौथ्या महायुद्धात दगड आणि काठ्याचा शस्त्र म्हणून वापर होईल. अर्थात या वाक्यात आईन्स्टाईन यांनी शस्त्र स्पर्धा, देशा देशातील संघर्ष त्यातून पुन्हा जग महायुद्धाच्या दिशेने जाईल तर काय होईल याचे भाकित अत्यंत कठोर शब्दात मांडले आहे.जर पुढील महायुद्ध झाले,तर मानव पुन्हा हजारो वर्षे मागे जाईल.आज पर्यंत रचलेले प्रगतीचे मनोरे कोसळून पडतील.भूक, बेरोजगारी,संघर्ष,महामारी यांना पुन्हा मानव जातीला तोंड द्यावे लागेल. एकूणच मानवी संस्कृती धोक्यात येईल.

आज मानवी संस्कृती पुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. देशा देशातील शस्त्र स्पर्धा ही जागतिक राजकारण आणि अर्थकारण यांचे फलित आहे.मागील महिन्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोल्दोमिर झेलेन्स्की यांच्यात रशिया बरोबर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर बैठक झाली. त्यांच्यात शाब्दिक चकमकी झाल्या. ट्रम्प म्हणाले, आम्ही तुम्हाला ३५० अब्ज डॉलर्स दिले आहेत, लष्करी उपकरणं दिली आहेत. जर आम्ही लष्करी मदत दिली नसती,तर हे युद्ध दोन आठवड्यात संपले असते. तुम्ही जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या तोंडावर घेऊन जात आहात. त्यांचे हे संभाषण ऐकून जगाला वाटणारी चिंता पुन्हा एकदा अधोरेखित होते,की देशा देशातील युद्ध ही मानवी संस्कृतीच्या नरड्याला कधी नख लावेल सांगता येत नाही. गाजा पट्टीत मागील वर्षी इस्राईल आणि पॉलिशटाईन मधील हिजबुल्ला, हमास आणि हुती सारख्या संघटना विरुद्ध झालेल्या संघर्षात ४७ हजारापर्यंत निष्पाप लोकांचा बळी गेला. अशाप्रकारे देशा देशातील संघर्ष, वांशिक संघर्ष आणि दहशतवाद हा मानवी संस्कृतीला गिळंकृत करू शकतो.

**किशोर जाधव**
**सोलापूर**

श्रीलंका सारखा देश चार दशके बहुसंख्य सिंहली आणि अल्पसंख्यांक तमिळ यांच्यातील वांशिक संघर्षात होरपळून निघाला आहे. आता कुठे या देशाला शांतता निर्माण करता आली आहे. अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर झालेल्या ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर जगाला दशतवादाची तीव्रता जाणवू लागली. भारत पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध अनेक वर्षे लढत आहे.ज्यांनी दहशतवादाला पोसलं त्यांच्यावर दहशतवाद उलटण्याची उदाहरणे जगाने पाहिली आहेत. आजपर्यंत लाखो लोकांची हत्या दहशतवादी कृत्यांमध्ये झालेली आहे. एखाद्या देशात यादवी युद्ध का सुरू होते? याचा शोध घेतल्यास लक्षात येते की अंतरदेशीय राजकारण, राज्यव्यवस्था,बेरोजगारी, दुजाभावाची वागवणूक अशा अनेक गोष्टीतून देशांतर्गत यादवी युद्ध पुकारले जाते. बांगलादेश,नेपाळ या देशात यादवी माजल्याचे आपण मागील वर्षांमध्ये पाहिली आहे. पाकिस्तान मध्ये बलुचिस्तानमधील सर्वात प्रमुख फुटीरतावादी गटांपैकी एक म्हणून बलोच लिबरेशन आर्मी (बीएलए) उदयास आली आहे. या गटाने मागील महिन्यात पेशावर येथे जाणाऱ्या प्रवासी ट्रेनवर प्राणघातक हल्ला करून लोकांचे अपहरण केले. त्याचप्रमाणे अफगाणिस्तान हा देश अनेक वर्षापासून दहशतवाद, कट्टरवाद यामुळे अजून देखील मध्ययुगातच वावरत असल्यासारखे आपल्याला वाटते.भारताच्या ईशान्येकडील मणिपूर राज्यात मागील तीन वर्षापासून सुरू असलेल्या मैतेई आणि कुकी या दोन समुद्रात मधील संघर्षात २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

मानवी संस्कृती उत्क्रांतवादी असली पाहिजे,परंतु तिच्या उत्क्रांतीला हे सर्व गोष्टी अधोगतीकडे नेत आहेत. माणसा माणसातील आणि मानवी समुदायातील संघर्ष हा नेहमी मानवी संस्कृती विघातक असतो. असा संघर्ष उद्भवू नये अथवा उद्भवल्यास तात्काळ मिटवण्यासाठी जागतिक स्तरावरील संयुक्त राष्ट्र संघटनासारख्या संस्थानी वेळीच हस्तक्षेप केला पाहिजे.

'पर्यावरण ऱ्हास' हा देखील मानवी संस्कृतीच्या भवितव्या समोरील फार मोठी समस्या बनत आहे.सध्या पृथ्वीचे तापमान वाढत आहे.याचे प्रमुख कारण 'हरितगृह परिणाम' हे आहे. कार्बन डाय-ऑक्साइड, मिथेन, क्लोरोफ्लोरोकार्बन,सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड या वायूची औद्योगीकरणामुळे वातावरणातील प्रमाण वाढत असल्याने, वातावरणात उष्णता साठवून राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. याचा परिणाम म्हणून पुढील काळात समुद्रातील पाण्याची पातळी वाढू लागली तर मानवाचे अस्तित्व धोक्यात येईल.पृथ्वीभोवतीच्या ओझोनचा थर विरळ होत आहे. यामुळे देखील मानवी जीवन धोक्यात येऊ शकते.

हवा प्रदूषण आणि जल प्रदूषणाचा माणसाच्या आरोग्यावर दूरगामी परिणाम होत आहेत . आजच्या आपल्या ऊर्जेच्या वापराच्या हव्यासाचा परिणाम येणाऱ्या पिढ्यांना भोगावे लागणार आहे. त्यामुळे ' पर्यावरण टिकले,तर मानवी जीवन टिकेल', ही मानसिकता जनसामान्यात निर्माण होणे आवश्यक आहे. या सर्व जागतिक पातळीवरील समस्या आज मानवी संस्कृतीला धोक्यात घेऊन जात आहेत. याबाबत जागतिक आणि देश पातळीवरील नेतृत्वाबरोबरच सामान्य जणांनी देखील जागरूक होणे आवश्यक बनले आहे.

# 'मराठी' भाषेचा आग्रह धरावा लागतो हे दुर्दैव

**जनमनाचे प्रतिध्वनी**

महाराष्ट्र राज्य स्थापन झाले ते मराठी भाषिक राज्य म्हणून. भाषावार प्रांत रचनेनुसार महाराष्ट्र राज्याची भाषा मराठी.६५ वर्षांत महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेचा वापर शासकीय कामकाजात करावा म्हणून अनेकदा शासन निर्णय आदेश पारित केले तरही मराठी भाषिक असलेल्या राज्यात 'मराठी 'भाषेचा आग्रह धरावा लागतो हे दुर्दैव.

महाराष्ट्रात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना याच साठी केली.शिवसेना अंगीकृत स्थानीय लोकाधिकार महासंघ स्थापन करुन केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, निमशासकीय आस्थापनांमध्ये ८०% टक्के मराठी स्थानीक उमेदवारांना नोकरीत स्थान देण्यात यावे ही मागणी मान्य करुन घेतली.सुधीर (भाऊ) जोशी,गजानन कीर्तिकर यांनी लोकाधिकार समिती महासंघाचे धोरण केंद्र सरकारच्या बँका, आयकर खाते, पोस्ट आणि तार खाते, तेल कंपन्या, दोन्ही मार्गावरील मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, एअर इंडिया, पोर्ट ट्रस्ट, आयुर्विमा इत्यादी अनेक शासकीय, निमशासकीय कार्यालयातील नोकरीत भरतीत मराठी उमेदवारांना रोजगार मिळवून दिले. परप्रांतीय लोक मराठी भाषा उत्तम बोलणारे आहेत. पण आमचे मराठी भाषिक असून हिंदी, इंग्लिश, गुजराती भाषेत बोलून कोणाचा अपमान करीत आहेत याचे त्यांना भान नाही. शिवसेना संघटना मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी ५६ वर्षे लढली, शिवसेनेने लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून दिले याचा विसर पडला म्हणून की काय हाच मराठी माणूस शिवसेना सोडून जाताना दिसतो तेव्हाच परप्रांतीयांचे महत्त्व महाराष्ट्रात वाढीस लागत आहे. अजून वेळ गेलेली नाही. शिवसेनाप्रमुखांची धोरणे आजूबाजूच्या राज्यांनी अमलात आणली आहेत. तामिळनाडूतील हिंदी भाषेला विरोध, कर्नाटक सरकारने आपल्याच भाषिकांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील मराठी नेते याचा बोध घेतील काय ? आंदोलने करुन, मारझोड करुन मराठी भाषा किती परप्रांतीय बोलतील, सरकारनेच मराठी भाषेच्या बाजूने ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे.

७५ वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असे असतानाच मराठीत बोला म्हणून आंदोलन करावी लागतात हे योग्य वाटत नाही. महाराष्ट्र सरकारनेच मातृभाषेतून समन्वय साधण्यास बंधनकारक करावे. मराठी तरुण उमेदवारांना महाराष्ट्रातील शासकीय, निमशासकीय कार्यालयातील नोकरी दिली तर परप्रांतीय येणारच नाहीत. आज नोकरीतील परप्रांतीय उमेदवारांचा परिणाम मराठी उमेदवारांना भोगावा लागतो आहे.

**- महादेव गोळवसकर**

# खरा स्वार्थ साधतच नाही

पुष्कळ वाचले, ऐकले, पण कृतीत जर उतरले नाही तर त्याचा काय उपयोग ? कृतीशिवाय समाधान नाही. श्रवण कोणी केले? तर ज्यांनी त्याप्रमाणे कृती केली त्यांनी. संतांच्या सांगण्याचा आपण विचारच केला नाही, त्याचे मननच जर केले नाही, तर पुष्कळ सांगितले तरी त्याचा काय उपयोग? देह हा अनित्य आहे, असे सर्व संतांनी एकमुखाने सांगितले आहे, तरीसुद्धा आम्हांला देहाचे प्रेम सुटत नाही.संतांवर विश्वास नसेल तर स्वतःचा अनुभव पाहावा. देहापासून सर्व सुख आहे असे आपण विचाराने ठरविले, पण खरोखर अनुभव काय येतो ते पाहावे. आपण पाहतो ना, की लहानापासून मोठ्यापर्यंत मनुष्याची सारखी धडपड चालू असते, आणि ती म्हणजे समाधानासाठी. लहानाचे मोठे झालो, विद्या झाली, नोकरी मिळाली, पैसाअडका मिळतो आहे, बायको केली, मुलेबाळे झाली; ज्या ज्या गोष्टीत समाधान मिळेल असे वाटले, त्या त्याकरिता प्रयत्न केला. परंतु समाधान लाभले का? देहाच्या सुखाकरिताच जन्मभर आटापिटा करायचा हे योग्य नव्हे. आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही.



**विचारधन**

गांवकरी®
('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन




### अशोक सराफ आणि वंदना गुप्ते अभिनीत 'अशी ही जमवा जमवी'चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई :** प्रेमाला आणि मैत्रीला वयाची मर्यादा नसते. सहवासाची इच्छा सार्वत्रिक आहे आणि तिचा शोध जीवनाच्या कोणत्याही विशिष्ट टप्प्यापुरता मर्यादित नाही. अशीच एका नव्या प्रेमाची नवी परिभाषा आपल्याला मोठ्या पड्यावर अनुभवायला मिळणार आहे. राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत आणि लोकेश गुप्ते दिग्दर्शित बहुप्रतिक्षित असा अशी ही जमवा जमवी या सिनेमाचा ट्रेलर लॉन्च करण्यात आलाय. ह्या धमाल सिनेमात अनेक वर्षांनी दिग्गज अभिनेते अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांची जोडी रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. ट्रेलर मध्ये अशोक सराफ आणि वंदना गुप्ते ह्या दोघांची कमाल जुगलबंदी पहायला मिळते. सिनेमातील कथा जरा हटके आहे त्यामुळे सिनेमाचा उत्सुकता वाढवणारा हा ट्रेलर खास ठरतोय. ट्रेलर पाहून अंदाज येतो कि मनोरंजना बरोबरच हा एक कौटुंबिक चित्रपट सुद्धा आहे. नातेसंबंध कसे जुळतात आणि त्यांचा प्रवास कसा फुलत जातो, हे अतिशय रंजकतेने दाखवण्याचा प्रयत्न या सिनेमामध्ये केला गेलाय. अशी ही जमवा जमवी हा सिनेमा १० एप्रिल २०२५ रोजी आपल्या जवळच्या सिनेमागृहात भेटीला येणार आहे !

### तेनाली रामा' मालिकेत राजा चौधरीची एंट्री

**मुंबई :** सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेत तेनाली (कृष्ण भारद्वाज) या महान दरबारी कवी आणि चतुर रणनीतीकाराच्या वेधक गोष्टींनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. आत्ता एका नवीन साम्राज्य आणि त्याचा सामर्थ्यशाली राजा चौडप्पा राया (राजा चौधरी) यांच्या एंट्रीमुळे कथानकाला एक जबरदस्त वळण मिळाले आहे आणि एका थरार नाट्याची सुरुवात झाली आहे. कसलेला अभिनेता राजा चौधरी या मालिकेत चौडप्पा रायाच्या भूमिकेत दाखल होत आहे. तो केलाडी साम्राज्याचा समर्थ राजा आहे. त्याचा मोठा भाऊ थिरूमलाई राया (प्रदीप तिवारी) याच्या ऐवजी राजा म्हणून चौडप्पा रायाची निवड करण्यात आली आहे, पण लवकरच चौडप्पा रायाच्या शासनावर एका भयंकर शापाचे सावट येते. जो राज्यावर बसेल, त्याचा सर्वनाश होईल अशी कुजबुज राज्यात असते. यामुळे राज्यात घबराटीचे वातावरण पसरते. यावर तोडगा मिळवण्यासाठी आणि आपल्या शासनाला धोक्यात आणणाऱ्या नियतीच्या तावडीतून सुटण्यासाठी तो विजयनगरकडे निघतो. त्याच्या आगमनामुळे रहस्य, सामर्थ्य आणि चिकाटीची कथा उलगडू लागते.



### 'झापुक झुपूक' चित्रपटाचं शीर्षक गीत प्रदर्शित




**मुंबई :**जिओ स्टुडिओज् आणि केदार शिंदे यांच्या झापुक झुपूक या सिनेमाचा टिझर नुकताच रिलीझ झाला आहे. बिग बॉस मराठी सिझन ५ चा विनर सूरज चव्हाण या सिनेमाच्या माध्यमातून मराठी सिनेश्रुष्टीत पदार्पण करतोय. टिझर ला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आणि आता झापुक झुपूक या सिनेमाचं पहिलं गाणं प्रदर्शित झालंय. ज्याला यावर्षीचे पार्टी साँग म्हणता येईल. या गाण्याचे संगीतकार मराठी रॅप आणि हिप-हॉप संगीत बनवणारा, मराठमोळा कृणाल घोरपडे उर्फ क्रेटेक्स हे आहेत. तांबडी चामडीच्या यशानंतर, क्रेटेक्स आणखी एक ग्रूव्ही ट्रॅक घेऊन आला आहे. जो पुन्हा एकदा गाण्याच्या तालावर थिरकायला भाग पाडणार आहे. 'पट्या द डॉक यांनी हे गाणं गायलं आहे. तर गीतकार प्रतीक संजय बोरकर आहेत. झापुक झुपूक या चित्रपटात मनोरंजना सोबतच भरपूर काही अनुभवयाला मिळणार आहे. सिनेमा मध्ये सूरज सोबत मराठी कलाकार जसे जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, झापुक झुपूक हा सिनेमा येत्या २५ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्रतील सिनेमागृहांत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

### अहमदनगर मर्चंट बँकेला ७ कोटींचा नफा

**अहिल्यानगर :** अहमदनगर मर्चंट सहकारी बँकेला यंदा ७ कोटी ३ लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. नफ्यातून सभासदांना १५ टक्के लाभांश व सर्व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ११ हजार रुपयांचे बक्षीस बँकेकडून दिले जाणार आहे. बँकेचे संस्थापक अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी ही माहिती दिली. बँकेचे व्यवहार अधिक सुलभ पद्धतीने करता यावे त्यासाठी 'क्यूआर कोड' सुविधा सुरू करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रुपयांची ठेव पावती देण्यासाठी सहकार विभागाकडे परवानगी मागण्यात आली आहे. सहकार विभागाने सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यास सांगितली आहे. येत्या सभेत हा विषय मंजुरीसाठी ठेवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, बँकेला गत वर्षात ३९ कोटी १५ लाखांचा नफा झाला. करोनानंतर तीन वर्षांनी शून्य एनपीए झाला आहे. सर्व तरतुदी वगळून ७ कोटी ३ लाखांचा नफा झाला आहे. १३७ कोटींची वसुली अद्याप बाकी असली तरी नफ्यातून एनपीएची तरतूद केल्याने एनपीए शून्य टक्के झाला आहे. त्यामुळे बँकेला शेड्युल बँकेचा दर्जा मिळेल व बँकिंग सुविधा आणखीन वाढवता येतील.

### खनिज तेल कोरोना काळातील नीचांकाला

**नवी दिल्ली :** बिघडलेल्या जागतिक परिस्थितीमुळे खनिज तेलाचे दर शुक्रवारी करोना काळातील नीचांकी पातळीवर पोहोचले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेले कठोर व्यापार कर धोरण आणि तेल निर्यातदार देशांचा गट 'ओपेक प्लस'ने उत्पादन वाढवल्याने तेलाचे दर तीन वर्षातील नीचांकाला गडगडले. भारताकडून होणाऱ्या आयातीसाठी किंमत ज्या आधारे निर्धारीत होते त्या ब्रेंट क्रूड फ्युचर्सचे दर ३.३ टक्क्यांनी घसरून पिंपामागे ६७.८५ डॉलरवर घसरले.

# यु.टी.आय. मिडकॅप फंड

**७ एप्रिल २००४ ला सुरू झालेल्या या योजनेला २१ वर्षे पूर्ण होऊन योजना २२ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. मिड कॅप या प्रकारात सर्वात जास्त भांडवलवृध्दी मोतीलाल ओसवालने दिली आहे आणि त्यानंतर मग वेगवेगळ्या योजनांची नावे विचारात घ्यावे लागतील. एडलवीज, इन्व्हेस्को, फ्रँकलिन, ॲक्सिस, एच.एस.बी.सी. एल.आय.सी. मिड कॅप या योजनांनी चांगली कामगिरी केली आहे. यु.टी.आय.कडे या योजनेत १२ हजार कोटींची मालमत्ता व्यवस्थापनासाठी आहे आणि सर्वात महत्त्वाचे ५ लाख ५५८१५ गुंतवणूकदार खाती आहेत. वर्षानुवर्षे योजनेशी एकनिष्ठ राहिलेले अनेक गुंतवणूकदार आहेत.**




योजनेच्या कामगिरीत चढउतार खूप झालेले आहेत. कारण मिड कॅप हा गुंतवणूक प्रकार मोठ्या प्रमाणात चढउतार स्वीकारणे भाग पाडतो म्हणून मिडकॅप हा प्रकार सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी नाही.

#### गुंतवणूक कोणी करावी

जोखीम स्वीकारण्याची मानसिकता आहे. चढउतार सहन करता येतात आणि कमीतकमी ५ ते ७ वर्षे गुंतवणूक कायम ठेवण्याची आर्थिक मानसिक ताकद आहे. अशा गुंतवणूकदारांनी मिडकॅप योजना घ्याव्यात. इतरांनी घेऊ नयेत. नियमित पैसे काढून घेण्याची योजना (एसडबल्यूपी) हा प्रकार या योजनेत करू नये.

योजनेने कोणत्या शेअर्समध्ये गुंतवणूक केली आहे त्याची नावे खालीलप्रमाणे को फोर्ज पर्सिस्टंट, पी.बी. फिनटेक,




पॉलिकॅपस् डिस्कॉन टेक्नॉलॉजी इत्यादी प्रमुख कंपन्या आहेत.

यु.टी.आय.च्या माहिती पत्रकात एक अत्यंत चांगली माहिती असते आणि ती म्हणजे निर्देशांकापेक्षा कोणत्या शेअर्समध्ये म्युच्युअल फंडाने जास्त गुंतवणूक केली आहे किंवा निर्देशांकापेक्षा कमी गुंतवणूक केली आहे अशा कंपन्यांच्या शेअर्सची नावे प्रसिधद केली जातात. याचा योग्य उपयोग गुंतवणूकदार करू शकतो. विशेषत: कामगिरी चांगली झाली तर निर्देशांकापेक्षा जास्त गुंतवणूक करण्याची व्यवस्थापकाने तयारी दाखवली आणि त्याचा तो निर्णय योग्य ठरला म्हणून निर्देशांकापेक्षा जास्त चांगली कामगिरी हा फंड करू शकला. अशाच प्रकारे कामगिरी जर चांगली झाली नाही तर त्याची सुध्दा कारणे शोधता येतात.

लार्ज कॅप, मिडकॅप किंवा स्मॉल कॅप अशी वेगवेगळी विभागणी बाजाराच्या बाबत केलेली आहे. यामुळे मिडकॅप मधून काही कंपन्या लार्ज कॅपमध्ये प्रवेश करतात तर काही कंपन्या मिड कॅपमध्ये असल्या तरी त्या स्मॉल कॅप होऊ शकतात. म्हणून या सर्व प्रकाराकडे डोळसपणे बघितले पाहिजे. चांगला आणि खराब म्युच्युअल फंड असे जरी घडत असले तरी त्यात सुध्दा बदल होत असतात. थोडक्यात मिड कॅप सर्वांसाठी नाही.

#### क्षेत्रिय निर्देशांक

हेल्थ सेक्टर निर्देशांक वार्षिक वाढ १४ टक्के ५ वर्षांची वाढ ४ पट क्षेत्रीय निर्देशांक आणि गुंतवणूक असावी का? एका क्षेत्रातील गुंतवणूक ही संकल्पना म्युच्युअल फंडाच्या मूळ संकल्पनेच्या विरोधातली आहे. जोखीम कमी असावी यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात गुंतवणूक असावी. परंतु एका क्षेत्राची जोखीम घेणाऱ्या गुंतवणूकदारांना जास्त भांडवलवृध्दी मिळवता आली. मुंबई शेअर बाजार ३० शेअर्सचा संवेदनशील निर्देशांक जेव्हा वार्षिक वाढ फक्त १.५ टक्के राष्ट्रीय शेअर बाजाराचा ५० शेअर्सचा राष्ट्रीय निर्देशांक वाढ फक्त १.७ टक्के अशी आकडेवारी आहे.

कोणते क्षेत्र पुढील वर्षी चांगले चालेल याचा अंदाज करावा लागतो. अमेरिकेच्या अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयामुळे जगाच्या बाजारात जी उलथापालथ झालेली आहे. त्याचा विचार करून पुढील वर्षी कोणते क्षेत्र चांगले राहील. याचा हा फक्त अंदाज आहे. सल्ला आमचा निर्णय तुमचा.




१) एनर्जी १४ टक्के घसरण आहे. यात बदल होऊन ३१ मार्च २०२६ ला वाढ मिळू शकेल.

२) एफ.एम.सी.जी. सेक्टर एका वर्षाची वाढ फक्त १ टक्का आहे. पुढील वर्षात जास्त वाढ अपेक्षित आहे.

३) पॉवर ७.६ टक्के घट आहे. पुढील वर्षी घट कमी होऊन वाढ होऊ शकते.

४) ऑईल आणि गॅस १३ टक्के घट पुढील वर्षे चांगले जावे ही अपेक्षा.

इलेक्ट्रिक वाहने रस्त्यावर आली तरी पेट्रोल डिझेलची मागणी ताबडतोब कमी होणार नाही असे वाटते.

## स्टार्टअप्सकरिता टेकएक्स्पेडाईटचे व्यासपीठ

**मुंबई :** ऑनलाईन गेमिंग उद्योगातील आघाडीची टेक-फ्रंट कंपनी, गेम्स 24X7 ने आपल्या टेकएक्स्पेडाईट एक्सिलिरेटर प्रोग्रामच्या पिच डेचे आयोजन करून १२ उदयोन्मुख स्टार्टअप्सना त्यांची नाविन्यपूर्ण सोल्युशन्स गुंतवणूकदार, उद्योगक्षेत्रातील दिग्गज आणि सरकारी हितधारकांचा समावेश असलेल्या एका प्रतिष्ठित पॅनलसमोर सादर करता येईल असे व्यासपीठ पुरवले.

कोयरा, मॅपल डॉट एआय, ग्लोवाट्रिक्स, लियाप्लस एआय, गॅबीफाय, आर्फिकस, कायरोव्हिजन, चिटटू, नोहा डॉट एआय, स्पोडा, झ्युरॉन डॉट एआय आणि बीएबल हेल्थ ही निवडण्यात आलेली स्टार्टअप्स आहेत.

या स्टार्टअप्सना प्रोत्साहन देताना महाराष्ट्र सरकारचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कामकाज विभागाचे मंत्री, आशिष शेलार यांनी सांगितले,

पुढील पिढीच्या कल्पनांना खतपाणी घालण्यासाठी, भारताच्या डिजिटल परिवर्तनाला चालना देण्यासाठी आणि विकसित होत असलेल्या स्टार्टअप इकोसिस्टिमला प्रोत्साहन देण्यासाठी टेकएक्स्पेडाईटसारखे उपक्रम आवश्यक आहेत. हे उपक्रम सक्षम करणारे मंच निर्माण करून उद्याच्या आघाडीच्या तंत्रज्ञान उद्योगव्यवसायांसाठी कॅटॅलिस्ट म्हणून काम करण्याच्या सरकारच्या व्हिजनला अनुरूप आहेत. या प्रोग्रामचा प्रभाव आणि त्यांनी ज्यांना पाठिंबा दिला आहे अशा अतुलनीय स्टार्टअप्सचे यश पाहण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आशादायक उपक्रमांना मौल्यवान संसाधने, मार्गदर्शन आणि उद्योग अनुभव प्रदान करून सक्षम करणे आहे.

देशभरातील निवडक स्टार्टअप्सनी त्यांची नाविन्यपूर्ण सोल्युशन्स गुंतवणूकदार आणि उद्योगातील नेत्यांच्या उपस्थितीत प्रतिष्ठित प्रेक्षकांसमोर सादर केली. या उद्योजकांनी एक क्युरेटेड मेंटरशिप प्रोग्राम केला आहे, जिथे त्यांना सर्वोत्तम तंत्रज्ञान संसाधने आणि तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध झाले. हे उद्योजक भारतीय स्टार्टअप इकोसिस्टममधील नावीन्य आणि नवोपक्रमाचे प्रतिनिधित्व करतात.

सह-सीईओ भाविन पंड्या म्हणाले, टेकएक्स्पेडाईटला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादातून भारतातील स्टार्टअप इकोसिस्टममधील प्रतिभेची प्रचंड खोली स्पष्टपणे दिसून येते. २४ राज्यांमधून भरभरून अर्ज आले, हे खरोखरच प्रेरणादायी आहे. गेम्स२४द७ मध्ये, आम्ही ही अफाट क्षमता जोखतो.

## अस्थिव्यंग उपचारासाठी मुंबईत मिस्सो रोबोटिक प्रणाली




**मुंबई :** कापडिया हॉस्पिटल'ने गुढघा बदल शस्त्रक्रियेसाठी भारतात रचना झालेली मिस्सो (एमआयएसएसओ) ही प्रगत रोबोटिक प्रणाली स्थापित करुन आपल्या अस्थिरोग शुश्रूषा अधिक उत्तम बनवली आहे. मुंबईत प्रथमच स्थापित झालेल्या या मिस्सो प्रणालीत आधुनिक तंत्रज्ञान आणि शस्त्रक्रिया नैपुण्य यांचा संगम असून त्यामुळे शस्त्रक्रियेत उच्च अचूकता येते, रुग्ण जलद बरा होतो आणि लोकांना दर्जेदार आरोग्यसुरक्षा मोठ्या प्रमाणात प्राप्त करता येते.

पंतप्रधान मोदी यांनी कौतुक केलेली 'मिस्सो' प्रणालीची कृत्रिम बुद्धिमत्ता चलित अचूकता व किमान छेदन दृष्टीकोनामुळे रुग्ण जलद बरे होण्यास तसेच शस्त्रक्रियांची सुधारित फलिते मिळण्यास मदत होते. केंद्रीय उद्योग व पुरवठा मंत्री मा. श्री. पियूष गोयल यांच्या हस्ते सादर झालेल्या मिस्सो प्रणालीने रोबोटिक सांधेबदलात गुणवत्तेचा नवा मापदंड स्थापित केला आहे.

'मिस्सो'ची रचना व निर्मिती भारतात झाली असून त्यात शस्त्रक्रियांचे त्रिमित मापन करण्यासाठी प्रगत संगणन व तत्काळ माहितीसाठा यांचा वापर केला जातो ज्यामुळे शल्यविशारदांना अचूक छेद घेण्यास व रोपण करण्यास मार्गदर्शन होते. प्रणालीतील सिक्स-जॉइंट रोबोटिक आर्म, ट्रॅकिंग कॅमेरा व सुरक्षा वैशिष्ट्यांमुळे तत्काळ सुधारणा करता येतात आणि सांध्यांची स्थिर व नैसर्गिक हालचाल साध्य होते. किमान छेदन दृष्टीकोनामुळे उतिंचे नुकसान, रक्तस्राव व बरे होण्याचा कालावधी कमी होतो आणि रुग्णांना वेगाने दैनंदिन जीवन सुरळित जगण्यास मदत होते. मिस्सो प्रणाली वैद्यकीय तंत्रज्ञानातील भारताच्या अभिनवतेचे प्रतिक असून त्यामुळे जागतिक दर्जाच्या रोबोटिक शस्त्रक्रिया लोकांपर्यंत अधिक प्रमाणात पोचू शकतील.

## टोन्बो इमॅजिंगने उभारला १७५ कोटींचा निधी

**मुंबई :** धोरणात्मक संरक्षण तंत्रज्ञानातील जागतिक स्तरावरची आघाडीची कंपनी Tonbo Imaging ने आपली सिरिज डी प्री आयपीओ फंडिंग फेरी यशस्वीरित्या पूर्ण केली असून फ्लोरीनट्री ॲडव्हायजर्स, टेनासिटी व्हेंचर्स आणि एक्सपोर्ट - इम्पोर्ट बँक ऑफ इंडिया कडून १७५ कोटी रु. चा निधी उभारला आहे.

या गुंतवणुकीमुळे अत्याधुनिक इन्फ्रारेड सेन्सर्सच्या विकासाला गती मिळेल, उच्च-शक्तीच्या मायक्रोवेव्ह तंत्रज्ञानाच्या व्यावसायिक उपयोजनास मदत होईल. त्यायोगे आधुनिक युद्धक्षेत्रातील धोक्यांचा सामना करता येईल आणि सध्या कार्यरत कार्यक्रमांच्या जागतिक विस्तारासाठी कार्यकारी भांडवलाला पाठबळ मिळेल.

वेगाने वाढणाऱ्या आणि गतिशील C4ISR बाजारातील ऑर्गनिक आणि इनऑर्गनिक अशा दोन्ही संधींचा लाभ घेण्यासाठीचे एक धोरणात्मक पाऊल असलेला आयपीओ Tonbo Imaging सादर करण्याच्या तयारीत असताना हा निधी आला आहे.

याआधी आर्टीमन, क्वालकॉम, सेलेस्टा, एडलवाईज आणि एचबीएल इंजिनिअरिंग यांसारख्या गुंतवणूकदारांकडून ३०० कोटी रु. हून अधिक निधी उभारलेल्या Tonbo Imaging ने युद्धप्रसंगी सिद्ध झालेल्या प्रणालींचा जागतिक पुरवठादार म्हणून विश्वासार्ह स्थान मिळवले आहे.

कंपनीचे तंत्रज्ञान ३० हून अधिक देशांमध्ये प्रतिष्ठित संरक्षण दलांकडून वापरले जाते. त्यामध्ये इस्त्रायली डिफेन्स फोर्सेस, अमेरिकन नेव्ही सील्स, नाटो, अर्मेनियन मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स आणि इंडियन मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स यांचा समावेश आहे. Tonbo च्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाने उरी सर्जिकल स्ट्राईक, IDF च्या दहशतवाद विरोधी मोहिमा यासारख्या महत्वपूर्ण मोहीमा, भारताच्या अर्जुन मेन बॅटल टँकचे आधुनिकीकरण, भारत डायनॅमिक्सचा ॲंटी टँक गायडेड मिसाईल कार्यक्रम आणि नाटोच्या अनेक सक्रिय मोहिमांसह प्रमुख लढाई मोहिमांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यामुळे Tonbo Imagingने एक अग्रगण्य संरक्षण नाविन्यपूर्ण निर्माते म्हणून आपले स्थान मजबूत केले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद लक्ष्मीकुमार म्हणाले: Tonbo ची स्थापना उच्च श्रेणीच्या संरक्षण तंत्रज्ञानाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून केली गेली.

आधुनिक युद्धक्षेत्र सुलभ, स्वायत्त गुप्तचर आणि लक्ष्य साधणाऱ्या प्रणालींकडे झुकत असल्यामुळे अधिक चांगले सेन्सर्स, कमी शक्तीवर कार्य करणारे संगणक दर्शन आणि अपारंपरिक शस्त्रे महत्त्वाची ठरणार आहेत. ही गुंतवणूक इन्फ्रारेड इमेजिंग मधील नाविन्यपूर्णता आणखी वाढवायला आणि आमचा जागतिक विस्तार वाढवताना ऊर्जा उपायसुविधांमध्ये दिशादर्शन करायला आम्हाला सक्षम करते.

फ्लोरीनट्री कॅपिटलचे संस्थापक मॅथ्यू सिरीॲक म्हणाले, Tonbo Imaging हे संरक्षण तंत्रज्ञानाचे भविष्य दर्शवते. इमेजिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि स्वायत्त प्रणालींमध्ये सखोल कौशल्य असलेली ही कंपनी उदयोन्मुख जागतिक सुरक्षा आव्हानांना उत्तरे देण्यासाठी उत्तम पद्धतीने तयार आहे.

## मार्चमध्ये सेवाक्षेत्राची गती मंदावली

**नवी दिल्ली :** देशाच्या अर्थव्यवस्थेचे मुख्य इंजिन असलेल्या सेवा क्षेत्राची चक्रे मंदावली आहेत. सेवा क्षेत्राच्या सक्रियतेने मार्च महिन्यात त्यांच्या सात महिन्यातील उच्चांकी पातळीवरून माघारी फिरला आहे, असे शुक्रवारी जाहीर झालेल्या मासिक सर्वेक्षणातून समोर आले.

देशातील सेवा क्षेत्रातील खरेदी व्यवस्थापकांचा कल दर्शविणारा एचएसबीसी इंडियाचा पीएमआय निर्देशांक मार्च महिन्यात ५८.५ गुणांवर नोंदला गेला. याआधी फेब्रुवारीमध्ये हा गुणांक ५९ राहिला होता.

मार्च २०२५ मध्ये भारताच्या सेवा क्षेत्राची वाढ जोरदार राहिली असली, तरी फेब्रुवारीच्या तुलनेत ती थोडी कमी गतीने होती. हा निर्देशांक ५० गुणांवर असल्यास विस्तारपूरक आणि ५० गुणांखाली असल्यास त्यामध्ये आकुंचन झाल्याचे मानले जाते. हा निर्देशांक २०१३ च्या मध्यापासून ५० गुणांवर राहिला आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ या अखेरीस भारताच्या सेवा क्षेत्रातील आर्थिक परिस्थिती अनुकूल राहिली. मजबूत मागणी आणि नवीन व्यवसाय कार्यादेशामुळे क्रियाकलापांमध्ये वाढ होत राहिली, असे निर्देशांकाच्या आकडेवारीने अधोरेखित केले आहे. तथापि, फेब्रुवारीच्या तुलनेत विक्री मंद गतीने वाढली. तरीही, सर्वेक्षण सहभागींनी ही वाढ अजूनही चांगली असल्याचे म्हटले आहे. त्याच वेळी, सेवा आणि उत्पादन क्षेत्राचा एकत्रित करणारा एचएसबीसी इंडिया संयुक्त पीएमआय निर्देशांक फेब्रुवारीमध्ये ५८.८ वरून मार्चमध्ये ५९.५ वर पोहोचला. गेल्या सात महिन्यांतील ही सर्वोच्च पातळी आहे.

## जागतिक आरोग्य दिनानिमित्त कलाकारांच्या हेल्थ टिप्स

**मुंबई :** जागतिक आरोग्य दिनी सोनी सबचे कलाकार- नवीन पंडिता, आरव चौधरी, प्रियंवदा कांत आणि आदित्य रेडिज आपला फिटनेस मंत्र सांगत आहेत. त्यांच्यासाठी आरोग्य हे ध्येय नाही, तर जगण्याची रीत आहे. अत्यंत धकाधकीची दिनचर्या असूनही आहार संतुलित ठेवण्यापासून ते आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे अभिनव मार्ग हे कलाकार शोधून काढतात. ते शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याला देखील तितकेच प्राधान्य देतात. त्यांची गोष्ट ऐकून आपल्याला जाणवते की वेलनेस ही तर नित्यनेमाने साधण्याची गोष्ट आहे. कणखर आणि प्रेरित राहण्यासाठी हे कलाकार काय करतात, हे त्यांच्याकडूनच ऐकू या!



'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत अश्विन पटेलची भूमिका करणारा नवीन पंडिता म्हणतो, माझ्यासाठी, फिटनेस म्हणजे समतोल! मी एक दिवसाआड वेट लिफ्टिंग करतो, आणि जेव्हा मी ते करू शकत नाही, तेव्हा तरीतरीत राहण्यासाठी किमान ८००० पावले चालण्याची काळजी घेतो. मला खायला आवडते, पण मी विचारपूर्वक खातो आणि शिस्त पाळतो. फिटनेस म्हणजे केवळ शारीरिक आरोग्य नव्हे! मानसिक शांती आणि स्थिरता म्हणजे देखील फिटनेस. त्यावर मी दररोज डोळसपणे मेहनत घेतो.



'वीर हनुमान' मालिकेत केसरीची भूमिका करणारा अभिनेता आरव चौधरी म्हणतो, फिटनेससाठी शिस्त सर्वात महत्त्वाची आहे. विशेषतः अशा उद्योगात, जेथे कामाच्या वेळेला फारशी शिस्त नाही आणि लांबलचक शेड्यूलमुळे तुमचे शरीर थकते. त्यामुळे मी विचारपूर्वक आहाराची निवड करतो, केवळ जिभेचे चोचले न पुरवता मला ऊर्जा देतील असे पोषक पदार्थ निवडतो. तसेच हायड्रेटेड राहणे देखील फार महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे मी तरतरीत राहतो आणि आरोग्य चांगले राहते. शारीरिक आरोग्याबरोबरच मी पुरेसा आराम करण्याला देखील प्राधान्य देतो. कारण व्यायामाइतकीच रिकव्हरी देखील गरजेची असते. माझ्यासाठी, फिटनेस केवळ तो नाही, जो तुमच्या बाह्य रुपातून दिसतो. तर फिटनेस म्हणजे तुम्हाला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या आतून सक्षम वाटते. आणि त्याच्यामुळे मी दररोज माझे सर्वोत्तम देऊ शकतो.



'तेनाली रामा' मालिकेत शारदा ही भूमिका साकारणारी प्रियंवदा कांत म्हणते, फिटनेस हा दैनिक व्यायामापेक्षा वेगळा असतो. फिटनेस ही जीवन जगण्याची रीत आहे. अगदी धकाधकीच्या दिवशी केलेला छोटासा प्रयत्न देखील मौल्यवान असतो. तो प्रयत्न म्हणजे झटपट वर्कआउट असो, स्ट्रेचिंग असो किंवा चालणे असो, असा प्रत्येक क्षण योगदान देत असतो. केवळ शारीरिक सामर्थ्य नाही, तर विचारपूर्वकता महत्त्वाची आहे. मन आणि शरीर यांच्यात सुसंवाद असला पाहिजे. कारण मन शांत असले की ते शरीराला निरोगी ठेवण्यात मदत करते. क्रिएटिव्ह वर्कआउट करून मी व्यायामातील रोमांच जपते. त्यासाठी डान्सिंगपासून योग वगैरे करते. जेव्हा फिटनेस आनंददायक असतो, तेव्हाच तो तुम्हाला प्रेरित ठेवतो. माझ्यासाठी आरोग्य म्हणजे संतुलन - शरीराचे पोषण करणे, योग्य प्रमाणात शरीराला आराम देणे आणि पडद्यावर किंवा पडद्याच्या मागे नेहमी तरतरीत, आनंदी राहणे.




'तेनाली रामा' मालिकेत राजा कृष्णदेवरायाची भूमिका करणारा आदित्य रेडिज म्हणतो, माझ्यासाठी फिटनेस म्हणजे केवळ कसरत नाही. फिटनेस म्हणजे अंतर्बाह्य तरतरीत वाटणे. शिस्त आणि नियमितता यांना मी पहिल्यापासून महत्त्व दिले आहे, जेव्हा फारसा उत्साह वाटत नाही, तेव्हाही. वर्कआउट आणि क्रिएटिव्ह हालचाली, जशा की डान्स, हायकिंग किंवा सक्रिय जीवनशैली यांचे संतुलन साधण्याचा माझा प्रयत्न असतो. मानसिक आरोग्य देखील तितकेच महत्त्वाचे आहे. एक छानसा वॉकने देखील कधी कधी घडी नीट बसते.

# डीजेचे करायचे काय?







मनातलं
अशोक थोरात
लखमापूर (बागलाण)
७५८८०४०३६३

लग्न म्हटले तर दोन्ही बाजुला हत्तीचे बळ येते. जमिन विकेल पण लग्न जोरात काढेल. लोकांनी तोंडात बोट घातले पाहीजे असा नादान विचार करणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. अशा वेळी आठवण येते कोरोनाची. पैशांची बचत कोणताच फालतुक विषय नव्हता. काही नातेवाइकांना लग्नानंतर बाळ झाल्यावरच लग्नाचे माहीत होत होते. पण कोरोना संपला आणि आता हे दुसरेच संकट आले.पूर्वीपेक्षा मोठे लग्न व दोन ऐवजी तीन दिवस लग्न चालतात. मेंहदी दुसऱ्या दिवशी मांडव हळद, तिसऱ्या दिवशी सकाळी वैदीक विवाह व ३ वाजता परत लग्न. समाज व समाजाचा वेळ पैसा शारीरीक त्रास याचा विचार करणेच सोडून दिले आहे.

लग्नातील आचारी काय खायला घालतात अनेकांना आजारी पाडतात. सर्वात मोठी गंभीर समस्या लग्नाची वाजंत्री. पूर्वी थोडा आवाज करणारे वेगळे प्रकार होते. पिपाणी म्हणत नंतर कमी आवाजाचे बँड नंतर मोठ्या आवाजाचे बँड व आता डी.जे. नावाची मोठी आयशर गाडी. डीजे सुरू झाला तर तीन किलोमीटरपर्यंत राहणाऱ्यांना प्रचंड त्रास होतो. घरात आपसात बोलता येत नाही एवढा आवाज. छाती व कानांना हादरे बसले. घरच हलते अशा ठिकाणी जाणे म्हणजे मुर्खात निघणे झाले आहे. जे नातेवाईक, मित्र वर्ष दोन वर्षात या निमित्ताने भेटतात पण त्यांनी बोलायचे नाही. कानात बोट घालून या डीजेपासून स्वतःचा बचाव करायचा. दु;ख याचे वाटते समाजाला दिशा देणारे जबाबदार यात लक्ष घालत नाहीत. अलिकडेच मला हा अनुभव जास्तच आला. माझ्या शेतातील बंगल्याजवळ छान मंगल कार्यालय तयार झाले. माझ्या घरा जवळच मंदिर आहे. तेथे डी.जे. व नवरदेव तास दोन तास थांबतात. दोन तास माझ्या सह शेजारच्यांना जीवघेणा त्रास सहन करावा लागतो. पोलिसात तक्रार करायची अडचण. मंगल कार्यालय वाला नाराज होईल. अशी अवस्था अनेकांची होते पण सहनच केले जाते. आता पोलीसांनीच या डीजेकडे लक्ष घालून जनतेला होणारा त्रास मिटवावा एवढीच अपेक्षा करावी लागेल. आता बरेच समाज दुरूस्ती करीत आहेत. जेवणाच्या मेनु वर निर्बंध आणुन चांगले काम केले तशीच दुरूस्ती सर्व गावात व्हावी व डी.जे.ला प्रवेशच नसावा. पण हे शक्य नाही राजकारणी कुणालाच दुखवत नसतात ते भविष्यातील मतांचा विचार करतात.

विवाह जुळवतांना दहा जागी कुंडल्या तपासतात. छान मुहुर्त काढतात पण मुहुर्त पाळणारे अर्धा टक्का पण नाहीत मग मुहुर्त काढतातच कशाला. लोक पण हुशार आहेत. येतात गेटवर नमस्कार घेतात व दुसऱ्या गेटने रफु चक्कर होतात. लावा लग्न केंव्हा पण म्हणजे फक्त हजेरी बस.

**कांदा रडवणारच!**

कांदा बऱ्याच वेळा खूप हसवतो. कधी कधी रडवतो. आता सध्या थोडा रडवतच आहे. कारण खरे बोलल्याचा कुणालाही राग येतो.उन्हाळी कांदा १५०० रू. दराने गेला तर रडायचे कारण नाही. खूप हसायचे पण कारण नाही.

कारण किरकोळ अपवाद वगळता या भावाने समाधानकारक पैसे मिळतात. पण या वर्षी मात्र सुरूवातीची कांदा रोपे पावसाने सडवली. उशिरा कांदा बियाणे टाकून लागवड झाली. साधारणपणे १० डिसेंबरनंतर लावलेला कांदा थंडी कमी मिळाली. हळुच वातावरण खराब झाल्याने बारीकच राहील्याने एकरी उत्पादनात किमान पन्नास क्विंटलची घट आली म्हणुन मोठे नुकसान झाले. नफा खूप घटला. आता सध्या १२०० ते १५०० चा दर मिळत आहे. केंद्र सरकारणे एक एप्रिल पासुन सर्व खर्च रद्द केल्याने कदाचीत भावात ३०० रू.वाढ होईल व कांदा उत्पादकांना बरे समाधान मिळेल. सरसगट २००० रुपये दर मिळत गेला तर नाराजीचे कारण नसते. नाफेड व इतर संस्था कांदा घेतात. तो खासगी कंपन्यामार्फत ती यंत्रणा कांदा उत्पादकांना नुकसानकारक आहे.

# फास्टफुडमुळे वाढतोय कर्करोगाचा धोका





दृष्टिक्षेप
श्याम ठाणेदार
९९२२५४६२९५

सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी संशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे. आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेषतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. तीन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुडचा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदार्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

# केवळ नोकरीसाठीच शिक्षण हवे?

बुध्दभूषण कांबळे

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे. ते खरेही आहे. कारण आजघडीला आपल्याला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणानेच आपला सर्वांगीण विकास होणार आहे. आपल्या बुद्धीला चालना मिळणार आहे आणि आपल्या बुद्धीच्या कक्षा रुंदावत जाणार आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून आपल्याला जगाला घडवण्याची प्रेरणा मिळणार आहे. म्हणून प्रत्येकाने शिक्षण हे घेतलेच पाहिजे. कारण माणसाला जगण्यासाठी ज्याप्रमाणे अन्न व पाण्याची गरज असते. त्याप्रमाणेच जीवन जगण्यासाठी बुद्धीला ज्ञानाची गरज असते. ती गरज भागवण्याचे काम आपल्याला शिक्षण करणार आहे.

आपल्याला मानवी जीवन मिळणे ही निसर्गाची देण आहे. पण त्या जीवनाला आकार देण्याचे काम शिक्षण करणार आहे. म्हणून प्रत्येकाने शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे. शिक्षणाशिवाय माणसाचा व्यवहार हा रानटी पशुप्रमाणे होय. शून्यातून विश्व उभारण्याची ताकद फक्त आपल्याला शिक्षणातूनच मिळू शकते. शिक्षणच माणसाच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते. म्हणून आजच्या युवकांनी इकडे तिकडे भरकटत जाण्यापेक्षा शिक्षणाची कास धरायला हवी. एकदा का आपली बुद्धी प्रगल्भ झाली की, मग आपण कोणत्याही क्षेत्रात झपाट्याने प्रगती करू शकतो. परंतु शिक्षण हे केवळ नोकरीसाठीच शिकायचे का? तर नाही, कारण जर डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण हे केवळ नोकरीसाठीच घेतले असते, तर ते भारतीय संविधानाचे शिल्पकार व आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते झाले असते का? नाहीतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर नोकरीच करत बसले असते तर, हे सगळं शक्य होतं का? डॉ.बाबासाहेब आंबेडकर इतके ज्ञानाचे भुकेले होते की, त्यांनी आयुष्यभर आपल्या बुद्धीला ज्ञानाचा खूराक देण्याचे काम केले. जीवनभर विद्यार्थी म्हणून ज्ञान घेण्याचे व ज्ञान देण्याचे पवित्र असे काम केले. म्हणूनच त्यांना संपूर्ण जग आदराने ज्ञानाचे प्रतीक असं म्हणते. या जगात जेवढे महापुरुष होऊन गेले त्या महापुरुषांनी केवळ नोकरीसाठीच शिक्षण घ्यायचे, असे म्हटले होते का? आणि ते जर केवळ नोकरीच करत बसले असते तर जगाचे कोहिनूर झाले असते का? तर मंडळी आपल्याला नाहीच म्हणावं लागेल.

कारण शिक्षण घेतलेल्या माणसाला या जगाच्या पाठीवर कुठेही गेले तर मरण नाही. तो काहीही करून आपले व आपल्या कुटुंबाचे आनंदाने पोट भरू शकतो. इतकी बुद्धिमत्ता त्याच्याकडे असते. कारण आज जर बघितले तर आपल्याला असे दिसून येईल की, काही सुशिक्षित युवक, नोकरदारांना मागे पाडून जगात नंबर एकचे उद्योगपती म्हणून मिरवत आहेत. काही सुशिक्षित तरुण जागतिक स्तरावर संशोधन करत आहेत. तर काही तरुण शिक्षणाच्या पाठबळावर मोठमोठ्या क्षेत्रात क्रांती घडवून आणत आहेत. म्हणून प्रत्येकाने शिक्षण घेऊन जागतिक क्षेत्रात दिमाखाने वावरले पाहिजे.

पण खेदाची बाब म्हणजे ग्रामीण भागात आजही बहुतांश तरुण तरुणी नोकरी लागत नाही म्हणून शिक्षण अर्ध्यावर सोडून बसले आहेत. त्यांना शिक्षणाचा खूप कंटाळा आला आहे. दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे काही मुलांचे आईवडील आपल्या मुलांना कुठे नोकरी लागते का? म्हणून शिक्षण सोडून द्यायला सांगतात. तर असे बोलणे साफ चुकीचे आहे. कारण शिक्षणानेच मनुष्याचा उध्दार होतो, हे अगोदर त्यांना कळायला हवे. म्हणून समस्त पालकांना विनंती आहे की, आपण शिक्षणाचे महत्त्व वेळीच ओळखून आपल्या मुलांना शाळेत पाठवा आणि त्यांना उच्च शिक्षणाचे धडे गिरवू द्या. कारण यापुढे शिकणारेच वाचतील बाकीचे अलगद फसतील!

# बालविवाह : एक सामाजिक शाप



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि.सांगली

लहान वयात मुलींचे विवाह होणे ही केवळ चिंताजनक बाब नाही, तर हे त्यांचे बालपण हिरावून घेणारे एक गंभीर सामाजिक संकट आहे. या समस्येचे परिणाम शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सामाजिक स्तरांवर दूरगामी असतात. बालविवाह रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजनांची अंमलबजावणी आणि समाजाच्या मानसिकतेत बदल करणे अत्यंत आवश्यक आहे.

बालविवाहामागे अनेक कारणे असली तरीही त्याच्या मुळाशी गरिबी आणि आर्थिक अस्थिरता असते. काही काळापूर्वी राजस्थानमधील दौसा जिल्ह्यात एका पित्याने आपल्या अल्पवयीन मुलीचे लग्न लावण्याचा निर्णय घेतला, कारण त्याला वाटले की भविष्यात महागाई वाढेल आणि तो तिचे संगोपन करू शकणार नाही. अशा परिस्थितीत मुलींचे शिक्षण दुय्यम ठरते आणि पालक त्यांना आर्थिक ओझे समजून त्यांच्या बालपणीच लग्न लावण्याचा निर्णय घेतात. अल्पवयीन मुलींच्या शरीराची वाढ अद्याप पूर्ण झालेली नसते. अशा अवस्थेत गर्भधारणेच्या धोक्यामुळे या मुलींचे आरोग्य मोठ्या गंभीर संकटात सापडते.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ च्या आकडेवारीनुसार, बालविवाह झालेल्या २९.३% महिलांना घरगुती हिंसाचाराला सामोरे जावे लागले, तर ६.८% महिलांना सक्तीच्या गर्भधारणेला तोंड द्यावे लागले. अशा मुली गर्भधारणेदरम्यान अनेक गुंतागुंतींचा सामना करतात. अनेक वेळा बाळ कुपोषित जन्मास येते किंवा गर्भपात होतो. प्रसंगी मुलीचा मृत्यूदेखील होतो.

बालविवाह केवळ शारीरिक नाही, तर मानसिक स्तरावरही मुलींवर परिणाम करतो. जबरदस्तीने लादलेल्या जबाबदाऱ्या, शिक्षणाचा अभाव आणि स्वातंत्र्य हरवणे या सर्व गोष्टी मुलीच्या मानसिकतेवर खोल परिणाम करतात. त्या परिस्थितीशी झगडत राहतात आणि अनेकदा आत्मसन्मान गमावतात. बालविवाह झाल्यावर बहुतांश मुलींचे शिक्षण थांबते. शिक्षण हे समाजाच्या विकासाचे आणि आर्थिक स्थिरतेचे प्रमुख साधन आहे. एका मुलीला शिक्षणापासून दूर ठेवल्यास तिच्या पुढील पिढ्यांवरही त्याचा विपरीत परिणाम होतो.

आर्थिकदृष्ट्या पाहता, बालविवाह झालेल्या मुलींना कोणतेही कौशल्य मिळत नाही, त्यामुळे त्या स्वावलंबी बनू शकत नाहीत. परिणामी, त्या आयुष्यभर दुसऱ्यांवर अवलंबून राहतात आणि पुढच्या पिढ्यांसाठीही दारिद्र्याचा वारसा ठेवतात. वर्ल्ड बँक आणि 'इंटरनॅशनल सेंटर फॉर रिसर्च ऑन वुमन'च्या संशोधनानुसार, प्रत्येक तीन मुलींपैकी एकीचे लग्न अठरा वर्षांपूर्वी होते, तर पाचपैकी एक मुलगी अठरा वर्षांपूर्वीच आई बनते.

सरकारकडून बालविवाह रोखण्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ', 'समग्र शिक्षा', 'सुकन्या समृद्धी योजना', 'बालिका समृद्धी योजना' यांसारख्या योजनांमुळे मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यात येत आहे. काही राज्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी विशेष आर्थिक मदतीच्या योजना लागू केल्या आहेत: उत्तर प्रदेश: 'मुख्यमंत्री कन्या सुमंगला योजना' अंतर्गत नवजात मुलीला ५,००० रुपये आणि शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर आर्थिक मदत दिली जाते. पश्चिम बंगाल: 'कन्या श्री प्रकल्प योजना' अंतर्गत अविवाहित मुलींना १९ वर्षांपर्यंत शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. राजस्थान: 'मुख्यमंत्री कन्यादान योजना' अंतर्गत मुलीच्या लग्नाच्या वेळी ३१ ते ४१ हजार रुपये दिले जातात. कन्या विवाह सहयोग योजना: २१ वर्षांवरील मुलीच्या लग्नासाठी १०,००० रुपये, तर अनुसूचित जातीतील १८-२१ वर्षे वयोगटातील मुलींसाठी ५,००० रुपये दिले जातात. महाराष्ट्रात बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर पदवीपर्यंत मोफत शिक्षण देण्याच्या घोषणादेखील झाल्या आहेत.

बालविवाहाला केवळ कायद्यांनी रोखता येणार नाही, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या मदतीने मुलींना सक्षम करणे, पालकांना जागरूक करणे आणि पितृसत्ताक परंपरांचा प्रभाव कमी करणे हे महत्त्वाचे टप्पे आहेत. 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' यांसारख्या अभियानांमुळे समाजाची मानसिकता बदलण्यास मदत झाली आहे, मात्र अजूनही खूप पल्ला गाठायचा आहे.

बालविवाह हा केवळ एक सामाजिक प्रश्न नाही, तर तो मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि भविष्यातील संधींवर गंभीर परिणाम करणारा एक शाप आहे. हा प्रथा थांबवण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येणे आवश्यक आहे. आर्थिक मदत, शिक्षणाच्या संधी, कठोर कायदे आणि समाजात जनजागृती हे या समस्येवरचे प्रभावी उपाय आहेत. मुलींना शिक्षण आणि स्वातंत्र्य मिळाल्यासच समाजाचा खरा विकास होईल आणि बालविवाहाचे दुष्टचक्र संपुष्टात येईल.

(भाग १)

# विस्मरणात गेलेला सम्राट





जयंती
॥ डॉ. संजय धुर्जड
९८२२४५७७३२

मौर्य राजवंशातील सर्वात प्रभावशाली व परिवर्तनकारी शासकांपैकी एक असलेल्या सम्राट अशोकाच्या जन्माचे स्मरण करून, अशोक जयंती हा भारतात एक महत्त्वाचा प्रसंग म्हणून उदयास येतो आहे. मुख्यतः भारताच्या काही भागात, विशेषतः बिहारमध्ये साजरा केला जाणारा हा दिवस अशोकाच्या विजयी राजापासून शांती, अहिंसा आणि बौद्ध धर्माच्या समर्थकात रूपांतरित होण्यात त्यांच्या योगदानाचा सन्मान करतो. दरवर्षी चैत्र महिन्यातील अष्टमी अशोक जयंती म्हणून साजरी केली जाते आणि यावेळी अशोक जन्मोत्सव ५ एप्रिल रोजी साजरा केला गेला.

या वर्षी अशोक जयंतीचे महत्त्व आणखी वाढले आहे, कारण हजारो बौद्ध अनुयायी जवळजवळ दोन महिन्यांपासून बिहारमधील बोधगया येथे 'महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलना' साठी निदर्शने करत आहेत. ही तीच पवित्र भूमी आहे जिथे सम्राट अशोकाने भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झालेल्या ठिकाणी मंदिर बांधले होते. बौद्ध धर्म आणि धार्मिक स्वातंत्र्याचा प्रचार करण्याचा अशोकाचा वारसा पुढे नेणाऱ्या या युनेस्को जागतिक वारसा स्थळाच्या व्यवस्थापनात अधिक स्वायत्ततेची मागणी निदर्शक करत आहेत. सम्राटाच्या जयंतीची वेळ आध्यात्मिक वारसा आणि संस्थात्मक नियंत्रण यांच्यातील चालू संघर्षावर प्रकाश टाकते, ज्यामुळे अशोक जयंती एका समयोचित चळवळीचे व्यासपीठ बनत आहे. भारताच्या राष्ट्रीय प्रतीकांमध्ये सम्राट अशोकाची छाप खोलवर आणि कायम स्वरूपाची आहे. सुमारे २६८ ईसापूर्व ते २३२ ईसापूर्व पर्यंत असे ६४ वर्षे राज्य करणाऱ्या मौर्य राजवंशाच्या या महान शासकाने केवळ प्राचीन भारताचे एकीकरण केले नाही, तर त्यांच्या कारकिर्दीत स्वीकारलेल्या मूल्यांचा वारसाही सोडला आहे, जो आजही देशाच्या प्रतीकांमध्ये प्रतिबिंबित होतांना दिसतोय. अशोकाच्या शिलालेखांवरून आणि त्याने उभारलेल्या स्तंभांवरून निर्माण झालेली दोन प्रमुख राष्ट्रीय चिन्हे - अशोक चक्र आणि अशोकाचे सिंह प्रतीक असलेला स्तंभ - ही भारताच्या ओळखीचे अविभाज्य भाग बनले आहेत. प्रामाणिक आणि सत्यापित माहितीवर आधारित हा सविस्तर अहवाल, ही चिन्हे काय आहेत, ती कशाचे प्रतिनिधित्व करतात आणि भारत अशोकाचा आभारी का आहे हे स्पष्ट करतो.

**सम्राट अशोकाने प्रेरित राष्ट्रीय चिन्ह**

स्वातंत्र्यानंतर भारताने आपली राष्ट्रीय ओळख परिभाषित करण्यासाठी अशोकाच्या चिन्हांची निवड केली. ही चिन्हे केवळ ऐतिहासिक महत्त्वच म्हणूनच नाही, तर अशोकाने त्याच्या कारकिर्दीत स्थापित केलेल्या मूल्यांचे प्रतिबिंब देखील पाडतात. चला या प्रतीकांना सविस्तरपणे समजून घेऊया:

**अशोक चक्र (राष्ट्रध्वजाचे चाक)**

ते काय आहे?: अशोक चक्र हे भारताच्या राष्ट्रीय ध्वजाच्या मध्यभागी असलेल्या पांढऱ्या पट्ट्यावर कोरलेले २४ आर्यांचे निळे वर्तुळ आहे. ते मूळतः सारनाथ येथील अशोक स्तंभावरील चक्र म्हणून अस्तित्वात होते, जे सुमारे २५० ईसापूर्व उभारले गेले होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्यानंतर, ते ध्वजात समाविष्ट करण्यात आले, ज्याला संविधान सभेने मान्यता दिली.

प्रामाणिक स्रोत: हे चक्र अशोकाच्या शिलालेख आणि बौद्ध प्रतीकात्मकतेतून घेतले आहे. बुद्धांच्या पहिल्या प्रवचनाच्या स्मरणार्थ अशोकाने बांधलेला सारनाथ शिला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (-डख) द्वारे जतन केला गेला आहे आणि त्याची सत्यता निर्विवाद आहे.

ते कशाचे प्रतिनिधित्व करते?: अशोक चक्र धम्मचक्र (धर्माचे चाक) चे प्रतीक आहे, जे बौद्ध धर्मातील सत्य, नैतिकता आणि प्रगती दर्शवते. २४ आरे दिवसाचे २४ तास दर्शवतात, जे सतत गती आणि जीवनचक्राचे प्रतीक आहेत. स्वतंत्र भारतात ते शाश्वत प्रगती आणि शांतीचे प्रतीक बनले.

ऐतिहासिक संदर्भ: अशोकाच्या १३ व्या शिलालेखात कलिंग युद्धानंतर अहिंसा आणि धम्माच्या त्यांच्या वचनबद्धतेचा उल्लेख आहे, ज्यामुळे ते बौद्ध धर्मात आले. हे चक्र त्याच धम्माचे प्रतीक आहे जे त्याने त्याच्या साम्राज्यात राबवले.

**अशोक स्तंभ (राष्ट्रीय चिन्ह)**

ते काय आहे?: सिंह शीर्ष असलेला अशोक स्तंभ हे भारताचे राष्ट्रीय चिन्ह आहे, ज्यामध्ये वर्तुळाकार पायावर उभे असलेले चार आशियाई सिंह आहेत. हे मूळतः सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या वरच्या बाजूला स्थापित केले गेले होते. आज फक्त तीन सिंह दिसतात, कारण चौथा सिंह मागे तोंड करून दृश्यापासून लपलेला आहे.

प्रामाणिक स्रोत: हे प्रतीक थेट सारनाथ येथील अशोक स्तंभावरून घेतले आहे, जे २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान सभेने राष्ट्रीय चिन्ह म्हणून स्वीकारले होते. मूळ मूर्ती अजूनही सारनाथ संग्रहालयात जतन केलेली आहे.

ते कशाचे प्रतिनिधित्व करते?: चार सिंह शक्ती, धैर्य, आत्मविश्वास आणि अभिमानाचे प्रतीक आहेत. त्याच्या तळाशी आणखी इतर प्राणी (घोडा, बैल) तसेच अशोक चक्र कोरलेले असल्याने ते एकता, शांती आणि प्रगतीचा संदेश देते. त्याखाली लिहिलेला मंत्र, सत्यमेव जयते (सत्याचाच विजय होतो), जो मुंडक उपनिषदातून घेतला गेला आहे, तो अशोकाच्या धम्माच्या तत्वांशी सुसंगत आहे.

ऐतिहासिक संदर्भ: अशोकाने त्याच्या साम्राज्यात अनेक स्तंभ उभारले, ज्यावर त्याचा धम्माचा संदेश कोरलेला होता. यापैकी सर्वात प्रसिद्ध सारनाथचा स्तंभ आहे, जो बौद्ध धर्माच्या प्रसाराची आणि अशोकाच्या प्रशासकीय धोरणांची साक्ष देतो.

**भारत अशोकाचा आभारी का आहे?**

भारताची अशोकाबद्दलची कृतज्ञता, त्यांनी स्थापित केलेल्या मूल्यांमध्ये आणि त्यांच्या दूरदर्शी प्रशासन धोरणांमध्ये आहे, जी आजही देशाच्या नीतिमत्तेवर प्रभाव पाडत आहेत. यातील काही प्रमुख कारणे असे की:

**शांती आणि अहिंसेचा संदेश:**

कलिंग युद्धानंतर (२६१ ईसापूर्व) त्यांनी हिंसाचाराचा त्याग केला आणि अहिंसेचा स्वीकार केला हे अशोकाचे सर्वात मोठे योगदान होते. त्याच्या १३ व्या शिलालेखात असे म्हटले आहे की युद्धामुळे झालेल्या विध्वंसामुळे - १००,००० हून अधिक लोकांचा मृत्यू आणि १५ लाख लोकांचा निर्वासन - त्यांना बौद्ध धर्माकडे घेऊन गेले. हा बदल भारताच्या शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या तत्वज्ञानाचा आधार बनला, जो महात्मा गांधींसारख्या नेत्यांनी देखील स्वीकारला. या शांतीच्या राष्ट्रीय प्रतीकांमध्ये अशोक चक्राच्या रूपात दिसून येते, जे हिंसेपेक्षा प्रगती आणि नैतिकतेवर भर देते.

**सामाजिक कल्याण आणि समानता:**

अशोकाच्या आदेशांमध्ये (जसे की दुसरा आणि सातवा आदेश) त्याने सुरू केलेल्या कल्याणकारी कामांचा उल्लेख आहे - जसे की रुग्णालये, रस्त्यांवरील झाडे, विहिरी आणि शिक्षणाचा प्रसार. तो त्याच्या प्रजेला आपल्या मुलांप्रमाणे समजत असे, यावरून त्याच्या राज्याकडे पाहण्याचा त्याचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. सिंहाचे प्रतिकृती असलेला अशोक स्तंभ आणि त्याखाली लिहिलेले सत्यमेव जयते हे सत्य आणि न्यायावर आधारित त्यांच्या शासन धोरणाचे प्रतिबिंब आहे.

**धार्मिक सहिष्णुता:**

अशोकाच्या १२ व्या शिलालेखात सर्व धर्मांबद्दल आदर आणि सहिष्णुतेचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यांनी विविध पंथांमधील संवादाला प्रोत्साहन दिले, जो भारताच्या बहुलवादी संस्कृतीचा आधार बनला. राष्ट्रीय चिन्ह हे सहिष्णुता आणि एकतेचे प्रतीक म्हणून प्रतिबिंबित करते, विविधतेत एकतेच्या भारतीय आदर्शाला बळकटी देते.

**राष्ट्रीय एकतेचे प्रतीक:**

अशोकाने आपले विशाल साम्राज्य एकत्र केले, जे सध्याच्या भारताच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक एकतेचा पाया बनले. त्यांची प्रतीके आधुनिक भारतात ही एकता जिवंत ठेवतात. वरच्या बाजूला चारही दिशांना पाहणारे सिंह देशाच्या सर्वदिशात्मक शक्ती आणि दक्षतेचे प्रतीक आहेत. सम्राट अशोकाने असा वारसा सोडला आहे जो हिंसाचाराने नव्हे तर शांती, न्याय आणि कल्याणाने शक्तीचे मोजमाप करतो. अशोक चक्र आणि अशोक स्तंभ ही केवळ प्रतीके नाहीत तर, भारताला नैतिक आणि एकसंध राष्ट्र म्हणून आकार देणाऱ्या तत्वज्ञानाचे ते वाहक आहेत. अशोक चक्र आपल्याला शाश्वत प्रगती आणि शांतीकडे घेऊन जाते तर अशोक स्तंभ, सत्य आणि धैर्याने राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करते. ही चिन्हे आपल्याला आठवण करून देतात की २३०० वर्षांपूर्वी एका सम्राटाने पाहिलेले स्वप्न आजही भारताच्या लोकशाही आणि एकतेचा आधार आहे. अशोकाचे हे योगदान केवळ भारतासाठी अभिमानाचे कारण नाही तर जगासाठी देखील प्रेरणादायी आहे. **(क्रमशः)**